# अर्धमागधी - प्राकृत

## इयत्ता–अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.


(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी - ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. १९.३.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# अर्धमागधी - प्राकृत

## इयत्ता- अकरावी




**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**

**पुणे - 411004**


R6A2T7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

© प्रथमावृत्ती : २०१९
पहिले पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**संयोजक :**
श्रीमती सविता अनिल वायळ,
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती संध्या विनय उपासनी,
सहायक विशेषाधिकारी, हिंदी

**चित्रकार :**
श्री. गौरव गोगावले

**मुखपृष्ठ :**
श्री. विवेकानंद शिवशंकर पाटील

**निर्मिती :**
श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र पांडलोस्कर, सहायक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
बलदेव कंप्युटर्स, मुंबई

**कागद :**
७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**अर्धमागधी-प्राकृत भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. बाळासाहेब भानुदास भगरे (अध्यक्ष)
श्रीमती वनमाला बाळासाहेब भगरे
श्रीमती सरोज श्रीपाल पाटील
श्रीमती उज्ज्वला प्रदिप मगदूम
श्रीमती सुनंदा अशोक चौगुले
श्रीमती अरुणा अरविंद पाटील
श्री. सदाशिव कमकेरी
श्री. महावीर पाटील
श्रीमती संध्या विनय उपासनी
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य - सचिव)

**: प्रकाशक :**
**श्री. विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## पइण्णा

भारहो मम देसो अत्थि। सव्वे भारह-वासिणो मम बंधवा संति।

मज्झ मम देसम्मि पेम्मं अत्थि। मज्झ देसंसि विज्जमाणाणं समिध्दाणं विविहयाए विभूसियाणं च परंपराणं मे अहिमाणो अत्थि। तेसिं परंपराणं रक्खगो होउं समत्थो होज्ज अहं निच्चं पयत्तं करिस्सामि।

अहं मज्झ पालगाणं गुरुयणाणं जेट्ठगाणं च सम्माणं करिस्सामि, पच्चेगेण सध्दिं सुयणत्तणेण य आयरिस्सामि।

मम देसे, मम देस-बंधवाणं च मह निट्ठा-रक्खणस्स अहं पइण्णं करेमि। तेसिं कल्लाणे समिध्दीए य मज्झ सोक्खं समाविट्ठं होइ।

# प्रस्तावना

अर्धमागधी-प्राकृत ही एक प्राचीन भारतीय बोलीभाषा होय. या बोलीभाषेत भगवान महावीरांनी आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान सांगितले. शिवाय आपल्या शिष्य-प्रशिष्यांनाही या प्राकृत भाषेतूनच धर्मोपदेश करण्यास सांगितला. त्यामुळे या प्राकृत भाषेचा विकास होत जाऊन ही भाषा भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचली.

या भाषेतच सम्राट अशोकांनी आपले शिलालेख कोरून घेतले. शिवाय सम्राट अशोक, सम्राट खारवेल, सातवाहन आदी राजांनी राजदरबाराची भाषा म्हणून, प्राकृत भाषेला सन्मानित केले. त्यामुळे या भाषेत विविध प्रकारचे साहित्य लिहिलेले दिसून येते. या साहित्याच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय समाजाचा, तसेच संस्कृतीचा, रूढी परंपरेचा, राजकीय, भौगोलिक, नैतिक इत्यादींचा परिचय होण्यास मदत होते.

याशिवाय भाषाशास्त्रीयदृष्ट्याही प्राकृत भाषा महत्त्वपूर्ण असल्याने आधुनिक भारतीय भाषांच्या उत्पत्तीच्या अभ्यासासाठी ही भाषा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार जून २०१९ पासून इ.अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे.

या पाठ्यपुस्तकामध्ये प्रत्येक पाठाच्या प्रारंभी प्रस्तावना, पाठाचा उद्देश, कठीण शब्दार्थ, स्वाध्याय इ. दिलेले आहेत. शिवाय परिशिष्टामध्ये प्राकृत वर्णमाला, वर्णबदल, काळ, विभक्ती, संधी, प्राकृत वाक्यरचना, निबंध, अपठित उतारे, शिवाय प्राकृत नाट्यसाहित्यांचा (सट्टके) संक्षिप्त परिचय इ.चा समावेश केलेला आहे. त्यामुळे या प्राकृत भाषेचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांमध्ये प्राकृत विषयाविषयी गोडी निर्माण होत राहील.

अर्धमागधी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमातून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागातील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. त्यांच्या आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले.

अर्धमागधी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मन:पूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

या पाठ्यपुस्तकाबरोबर अभ्यासाला पूरक असे भरपूर दृक-श्राव्य साहित्य आपल्याला पहिल्या पानावर असलेल्या Q.R. Code च्या माध्यमातून उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करून घ्यावा.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ, १९४१

## अर्धमागधी-प्राकृत

# भाषाविषयक क्षमता

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांमध्ये अर्धमागधी-प्राकृत भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | |
|---|---|
| श्रवण | • अर्धमागधी-प्राकृत साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृतातील विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे.<br>• परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण | • अर्धमागधी-प्राकृतातील उच्चार वैशिष्ट्यांना अनुसरून योग्य अशा गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे.<br>• अर्धमागधी-माध्यमात अध्ययनकृतींना व विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे.<br>• अर्धमागधी प्राकृत भाषेत चर्चा करता येणे. |
| वाचन | • विरामचिन्हांची दखल घेऊन योग्य गतीने अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>• अर्धमागधी साहित्यातील विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेणे.<br>• संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'ई' साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे. |
| लेखन | • लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>• भाषा नियमांना अनुसरून संवाद / वर्णन / लघुपरिच्छेद लिहिता येणे.<br>• माध्यम भाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे. |
| अध्ययन कौशल्य | • कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत शब्दजाल निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत कथापूर्ती करता येणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत अनुवाद करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक संदर्भांचा व माहितीचा अभ्यासासाठी वापर करता येणे. |
| भाषाभ्यास | • इयत्ता दहावीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.<br>• अर्धमागधी-प्राकृत भाषेत सरळ संवाद करणे.<br>• एक ते शंभर (1-100) अंक (क्रम) जाणून घेणे. |

# शिक्षकांसाठी

अर्धमागधी-प्राकृत इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेणे अपेक्षित आहे. शिक्षकांनी स्वतः या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

शिक्षकांनी स्वतःच्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठातील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

अर्धमागधी-प्राकृत इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अणुक्कमणिया


| अनु. क्र. | सुगम-पाइयं | पान क्रं. |
|---|---|---|
| 1 | वत्थू नामं | 1 |
| 2 | रुक्ख नामं | 2 |
| 3 | पक्खी नामं | 3 |
| 4 | अवयव नामं | 4 |
| | **गज्ज विभागो** | 5 |
| 1 | भगवं महावीरो | 6 |
| 2 | पडिसद्दो | 9 |
| 3 | साहु-रक्खियं पज्जावरणं | 12 |
| 4 | संबोहेसु अंतरं | 16 |
| 5 | सच्चवाणस्स सावित्ती | 19 |
| 6 | अयहारय-दिट्ठंतं | 23 |
| | **पज्ज विभागो** | 26 |
| 1 | रट्ठभत्ती | 27 |
| 2 | अभयदाणं | 30 |
| 3 | नीइवज्जा | 34 |
| 4 | पुत्ताण-परिक्खा | 38 |
| 5 | कूड-नीई | 42 |
| 6 | किसिवालस्स जीवणं | 46 |
| | **परिसिट्ठं** | 51 |
| | **(अ) व्याकरण विभाग** | 52 |
| 1 | प्राकृत वर्णमाला | 53 |
| 2 | सर्वनामे | 62 |
| 3 | काळ | 67 |
| 4 | विभक्ती प्रत्यय | 72 |
| 5 | संख्या | 77 |
| 6 | प्राकृत संधी | 83 |
| | **(ब) लेहण-कोसल्लं** | 87 |
| 1 | अर्धमागधी-प्राकृतात कृती करा | 88 |
| 2 | निबंध लेखन | 89 |
| 3 | अपठित उतारे | 92 |
| | **(क) प्राकृत सट्टक (नाट्य) साहित्य परिचय** | 97 |

# सुगम–पाइयं

## (1) वत्थु–नामं



कंदुग



डोला



आलोयण



तुला



सगड



असिय



हल



कुद्दलिया



अक्खरफलक



दूरदंसण



भमणझुणि




संगणय

## (2) रुक्ख-नामं



ईडणिंब



बबूल




आमरुक्ख



कंकेली



वडरुक्ख



पणस/फणस




जंबूरुक्ख



कप्परुक्ख




इक्खू



पूगतरू



तालरुक्ख



सागरुक्ख

## (3) पक्खी–नामं


काग


बग


मऊर


मऊरी


कीर


कोइला


सेण


गिद्ध


पारेवय


गरुल


चक्कवाय


सारिया

# (4) अवयव–नामं



मत्थय



णिडाल



नयण



नासा



कण्ण



वयण/मुह




जीहा



गीवा



हणू



कटी




जाणू



हत्थ

# गज्ज - विभागो



# 1. भगवं महावीरो



भगवान महावीर हे जैन धर्मातील 24 वे तीर्थंकर होत. त्यांचा काळ साधारणपणे इ. स. पूर्व 5-6 व्या शतकाचा मानला जातो.

भगवान महावीरांनी धर्मोपदेशासाठी अर्धमागधी भाषेचा अवलंब केला. त्यांनी आपल्या धर्मोपदेशातून अहिंसेचा पुरस्कार केला. केवलज्ञानाची प्राप्ती झाल्यानंतर भगवान महावीरांनी आपल्या दिव्यवाणीने त्रिकालाबाधित तत्त्वज्ञानाचा उपदेश भव्यजीवांना करण्यास सुरुवात केली.

चारित्र्यबल वाढवा, संयम पाळा, वासनांवर विजय मिळवा. असामाजिक प्रवृत्तींचा नाश करा आणि राग-द्वेष मनातून काढून टाका. संयमरूपी तप करा. असे त्यांनी प्रतिपादन केले.

बाहेरील शत्रूशी लढाई करणे सोपे आहे पण आपल्यामध्ये असलेल्या विकारांचा नाश करणे खूप कठिण आहे. यासाठी वीरतेची आवश्यकता असते. महावीरांनी स्वत:मध्ये या शक्तीचा विकास केला व त्याचा आदर्श संपूर्ण जगासमोर ठेवला. त्यांचा संक्षिप्त परिचय या पाठात पुढीलप्रमाणे दिलेला आहे.

अत्थि इहेव भारहे-वासे कुंडिणपुरे सिद्धत्थो नाम खत्तिय-गणाहिवई । तस्स तिसला नाम देवी। सा य सुसिला सुरूवा य। चेत्त-सुद्ध-तेरसयाए सोहणे दिणे सुप्पहाए सा सव्व-गुण-संपन्नं पुत्तं पसूया। जाव सो तिसलाए गब्भे आगओ ताव सिद्धत्थमहारायस्स विहवो पइदिणे वड्ढइ । तेण तस्स बालस्स वद्धमाणो त्ति नाम कयं । अग्गओ सो बालो अप्पणो वीरत्तेण ‘महावीरो’ त्ति पसिद्धो जाओ। तीस वरिसाए णंतरं महावीरेण मुणिदिक्खा गहिया। कढिण-तवं करणत्थं सो वणं गओ। तत्थ भगवं महावीरेण दुवालसवरिसे उग्गं तवं कयं। तवग्गिणा विविह-कम्माइं विणासिऊण भगवं महावीरो केवली होइ। भगवं महावीरेण सव्वाणि इंदियाणि रागदोसाइं कसायाइं जियाणि । अओ सो ‘जिणो’ त्ति पसिद्धं होइ।

गोयमाइ एक्कारस-माहणा भयवं महावीरस्स पमुह-सीसा संति। ते गणहर त्ति नामेण पसिद्धा। भयवं महावीरस्स समोसरणं गामाणुगामं चलइ। तम्मि समोसरणे भयवं महावीरो अद्धमागही भासाए उवएसं देइ।

‘पच्चेग-जीवो निय-कम्मस्स कत्ता भोत्ता य। सो च्चिय अप्पणो मित्तो अमित्तो य। जीवो जं जं

कम्मं करेइ तं तं सुहासुह-फलं भुंजइ। सुहं दुक्खं च पावेइ। जीवो सुकम्मेण सेट्ठत्तं पावेइ न जम्मेणं। अओ भो जीवा! निच्चं सुकम्मं करेह।'

'सव्वे जीवा सुहं इच्छंति न दुक्खं । तेण इयरा न पीडेइ। हिंसाए दूराओ चाएज्जा। अहिंसा सव्व-धम्माणं मूलं अत्थि। तेण अहिंसा-जुत्तो धम्मो च्चिय परमो धम्मो होइ। अहिंसा धम्मेण सव्व जीवेसु मेत्ती होइ। हिंसाए वेरभावं वड्ढइ य। अओ अहिंसा धम्मस्स आयरणं करेह' त्ति उवएसं देइ। एवं पयारेण सव्वजीवाणं सुहावह-धम्मं कहिऊण भगवं महावीरो पावाउरे ठाणे निव्वाणं पावइ।

## शब्दार्थ

**अओ** – म्हणून
**अणायार** – अनाचार
**अग्गओ** – पुढे
**इयरा** – इतर
**इहेव** – येथे
**एक्कारस** – अकरा
**खत्तिय** – क्षत्रिय
**गणाहिवइ** – समूहाचा प्रमुख
**गहिया** – ग्रहण केली
**चाएज्जा** – त्यागावी
**तवग्गिणा** – तपाग्नीने
**तेरस** – तेरा
**दुवालस** – बारा
**पसूया** – जन्म दिला
**माहणा** – ब्राह्मण
**विहवो** – वैभव
**वेरभावं** – वैरभाव
**समोसरण** – तीर्थंकरांची धर्मसभा
**सोहण** – शुभ, चांगले
**सुहावह** – सुखावह

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) महावीरांना 'महावीर' या नावाने का संबोधण्यात येऊ लागले?

2) भगवान महावीरांना 'जिन' म्हणून का ओळखले जाऊ लागले?


3) भगवान महावीरांनी कोणता उपदेश केला व का?

**2 प्राकृत भाषेत रूपांतर करा.**


त्रिशला | चैत्र | वर्धमान | निर्वाण

## 3 रेखाजाल पूर्ण करा.

अ)




ब)




## 4 रिकाम्या जागा भरा.

1) सव्वे जीवा सुहं इच्छंति न.....।

2) ..... सव्व-धम्माणं मूलं अत्थि ।

3) पच्चेग-जीवो ..... कम्मस्स कत्ता भोत्ता य ।

4) भगवं महावीरेण...... वरिसे उग्गं तवं कयं।

# 2. पडिसद्दो



‘पडिसद्दो’ (प्रतिध्वनी) ही एक लोककथा असून डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांनी ती अर्धमागधीत रूपांतरित केली आहे. डॉ. खरवंडीकर हे संस्कृत व अर्धमागधी या विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. संस्कृत काव्यलेखना व्यतिरिक्त त्यांनी काही संस्कृत व अर्धमागधी पाठ्यपुस्तकांचेही संपादन केले आहे. ‘संस्कृत पंडित’ म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला आहे. त्यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांपैकी एन. सी. इ. आर. टी. चे दोन आणि आकाशवाणीचे दोन हे मुख्य पुरस्कार होत. शास्त्रीय संगीताचाही त्यांचा व्यासंग आहे.

परमेश्वराकडे मागणे मागताना ज्याचा जसा भाव असेल तसे त्याला फळ मिळते. हे सत्य पाठातील तीन लोकांच्या उदाहरणांवरून दिसून येते. म्हणून प्रत्येकाने मनात नेहमी चांगलेच भाव ठेवावेत असे या पाठातून स्पष्ट केलेले आहे.

आसि कस्सि पि अहिट्ठाणे सिवालओवकंठे एगं मुहरं गोउरं। तत्थ गंतूण जो कोइ जं किं पि वयइ तस्स पडिसद्दो तहेव सुणइ। पडिसद्दाणुरोहेण फलं पावइ त्ति जणाणं वीसासो । अह एगया गामंतर-आगया तिण्णि जणा तस्सिं गोउरे कमेण गच्छिंसु । तेसिं एगो जीवण-जत्ताए उव्विग्गो णिरासाए तत्थ आगओ । बीओ लुद्धगो देवदंसणेण अहिगं दव्वं लहिस्सामि ति वियारेण तत्थ आगओ। तइओ उण नाणी साहगो नवरं मणसंति लहिउं सिवालयं पत्तो ।

तेसिं पढमो एगंते ईसरसुमरणं करिऊण ताररवेण वयइ तव कए णाहं किं पि करिउं समत्थो । ता खमसु मं। तक्खणे पडिसद्दो उट्ठिओ। 'तव कए णाहं किं पि करिउं समत्थो। ता खमसु मं।' भयवओ इयं पडिवयणं आयण्णिऊण सो नरो, अहिगं दुक्खं आवण्णो चिंतेइ, 'अहो! ईसरो वि णाम असमत्थो, तत्थ का कहा साहारणजणस्स ।

बीओ लोलुओ नरो एवं भणइ । अहं तव कए किंचि दव्वं अवस्सं देमि । परं तुमं मए पहूयं धणं देज्ज। तओ पडिसद्दो वि तारिसो चेव समुट्ठिओ । तया विम्हिओ सो नरो चिंतेइ –'अहो, सयं भगवं महेसरो वि धणं जायइ। सो मे धणं दाउं कहं पहवेज्जा ।

अणंतरं तइओ नाणी साहगो विणएण भासइ – 'जं जं मम समीवे अत्थि तं तं सव्वं तव चेव। अहं ते दासो म्हि । तओ पडिसद्दो वि तहेव समुप्पण्णो । सो नाणी साहगो पीऊसगब्भं तं वयं णिसम्मं अच्चंतं परितुट्ठो समाणो अप्पाणं कयत्थं मण्णइ। अहवा सच्चं एवं उच्चइ।

जारिसी कामणा जस्स फलं लब्भइ तारिसं ।
कुओ कडुय-बीयाओ भवेज्जा महुरं फलं ।।

## शब्दार्थ

**अहिट्ठाण** – नपुं (अधिष्ठान) स्थान, जागा
**सिवालअ** – पुं (शिवालय) शंकराचे मंदिर
**आयण्णिऊण** – (त्वान्त अ.) ऐकून
**गोउर** – नपुं. (गोपुर) नगर किंवा किल्ल्यांचा दरवाजा
**पडिसद्दाणुरोह** – पु. (प्रतिध्वनिरोप) प्रतिध्वनीच्या अनुरोधाने
**वीसास** – पु. (विश्वास) श्रद्धा, विश्वास
**गामंतर-आगय** – वि (ग्रामान्तरागत) दुसऱ्या गावाहून आलेला
**पहव** – क्रि. (प्रभव) समर्थ असणे.
**साहग** – पु. (साधक) साधना
**समीवे** – अ. (समीप) जवळ असणे
**उव्विग्ग** – वि. (उद्विग्न) त्रासलेला, कंटाळलेला
**णिरासा** – स्त्री (निराशा) निराशा पावलेला.
**लुद्धग** – पुं (लुब्धक) लोभी
**देवदंसण** – नपुं (देवदर्शन) देवाचे दर्शन
**अहिगं** – अ (अधिकम) अधिक जास्त
**दव्वं** – नपु (द्रव्य) संपत्ती. वैभव, पैसा
**उट्ठिय** – वि.(उत्थित) उठला, उत्पन्न झाला.
**उवकंठ** – नपुं. (उपकण्ठ) जवळ
**मुहर** – वि. (मुखर) बोलके
**साहारणजण** – (साधारणजन) सामान्य लोक
**नर** – पु. (नर) माणूस
**पहूय** – (प्रभूत), भरपूर खूप
**महेसर** – पु (महेश्वर) महेश्वर
**जायइ** – (याचति) याचना करणे.
**कमेण** – पुं. (क्रमेण) क्रमाने, एकामागून एक
**जीवणजत्ता** – स्त्री (जीवनयात्रा) आयुष्य
**दास** – पुं. (दास) दास, गुलाम, सेवक
**पीऊसगब्भं** – वि. (पीयुषगर्भम) अमृतासम
**अच्चंतं** – अ (अत्यंत) अतिशय
**परितुट्ठो** – कर्म भू. धा. वि. संतुष्ट
**अप्पाणं** – पुं (आत्मानं) स्वत:ला.
**कयत्थं** – वि. (कृतार्थम) धन्य, सफल
**कामणा** – स्त्री (कामना) इच्छा
**समत्थ** – वि. (समर्थ) समर्थ असणे.

**वियार** – पुं (विचार) विचार
**नाणी** – वि. (ज्ञानी) ज्ञान मिळविलेला
**मणसंति** – स्त्री (मन:शांती) मानसिक समाधान
**एगंत** – पु. एकान्त
**ईसरसुमरण** – नपु. ईश्वरस्मरण
**ताररव** – पु. (ताररव) उंच स्वर, मोठा आवाज
**करिऊण** – त्वान्त अव्यय (कृत्वा)
**तक्खणे** – अ (तत्क्षणे) त्याचक्षणी, तत्क्षणी
**खमं** – क्षमा
**जारिसी** – वि. (यादृशी) जशी
**कुओ** – अ (कुत:) कोठून
**कडुयबीयाओ** – नपु. (कटुकबीजात्) बियांपासून
**महुर** – वि (मधुर) गोड
**आवण्ण** – वि. (आपत्न), प्राप्त झाला.

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

1) शिवालयात कोण आले?
2) गोपुरात असलेल्या पहिल्या माणसाने कोणती याचना केली?
3) लोभी माणसाने देवाकडे काय मागितले.

**2 असे कोण म्हणाले.**

1) "जे जे माझे आहे, ते ते सर्व तुझेच आहे."
2) "मी तुझ्यासाठी काही करू शकत नाही, मला क्षमा करा."
3) "अरे रे ! ईश्वरही असमर्थ आहे."
4) "अहो, साक्षात भगवान महेश्वर धनाची याचना करत आहे."

**3 समानार्थी शब्द लिहा.**

1) ईसर –
2) सिव –
3) दव्वं –
4) संतुट्ठ –

**4 अर्धमागधीत शब्द लिहा.**

1) प्रतिध्वनी 2) क्षमा 3) भगवंत 4) महादेव 5) लालची 6) ज्ञानी

**5 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

1) 'अहो, सयं भगवं महेसरो वि धणं जायइ। सो मे धणं दाउं कहं पहवेज्जा ।'
2) 'जं जं मम समीवे वट्टइ तं तं सव्वं तव चेव । अहं ते दासो म्हि।'

**6 आकृती पूर्ण करा.**

गोपुरात आलेले तीन लोक

# 3. साहु-रक्खियं पज्जावरणं



नवनवीन संशोधनांमुळे दिवसेंदिवस मानवी जीवन सुखी होत असले तरी मानव नैसर्गिक घटकांचा अपरिमित विनाश करत आहे. त्यामुळे निसर्गातील पर्यावरणाचा समतोल बिघडून सर्व प्राणिमात्रांचे जीवन धोक्यात येणार आहे. म्हणून प्रत्येकाने पर्यावरणास अनुकूल अशा नैसर्गिक घटकांचे रक्षण केले पाहिजे. मनुष्य ज्या सृष्टीत राहतो ती सृष्टी व मनुष्य यांच्यातील संबंध जोपर्यंत सामंजस्यावर आधारलेले आहेत तोपर्यंत दोहोंचे सहजीवन सौख्यपूर्ण असेल. गेल्या काही वर्षांत लोकसंख्येत होत असलेली बेसुमार वाढ, आणि त्याचप्रमाणे सुखासीन आयुष्य जगण्यासाठी माणसाने केलेल्या सुधारणा यांमुळे निसर्गाचा समतोल ढासळत आहे. पर्यायाने पर्यावरणात बिघाड होत आहे. पर्यावरण हा शब्द नवीन असला तरी त्याच्याशी संबंधित विचारधारा ही प्राचीन भारतीय साहित्यातही प्रतिबिंबित झालेली आढळते. प्रस्तुत उताऱ्यात मानवाच्या कल्याणासाठी पर्यावरण किती महत्त्वाचे आहे हे दाखविले आहे. तेव्हा प्रत्येकाने आपापल्या शक्तीनुसार पर्यावरणाचे रक्षण करावे असे या पाठातून स्पष्ट केले आहे.

**(पत्ताणि – जणगो, कन्ना – कमला)**

**जणगो** – कमले, अयि कमले! अहो! न जाणामि, कत्थ गया एसा । कल्लं जेव सा पज्जावरणविसए मं किंचि पुच्छित्था। कमले सिग्घं आगच्छ।

**कमला** – ताय, एसा आगया ।

**जणगो** – कमले, दिग्घं कालं जाव हं हक्कारेमि। अवि अज्जतणियं वट्टपत्तं तुमे पढियं? कल्लं एव पाढसालाए पज्जावरण-पाढो अज्झाविओ त्ति तुमे वुत्तं।

**कमला** – सच्चं तं! किं?

**जणगो** – तमेव वोत्तुं इच्छामि। पज्जावरण-विसए जेव सा वट्टा। सुण- पज्जावरण-विक्खेव-कारणा गिद्ध-विसेसाणं कवोय-विसेसाणं च जाईओ लुप्पप्पाया, नट्ठपाया वा हवंति।

**कमला** – अहह । कहमिणं जायं?

**जणगो** – कमले, एत्थ ताव माणवस्स रसलोलुवत्तणं, आखेडाइसओ य कारणं वट्टइ। माणवो भक्खणट्ठं गिद्धाणं कवोयाणं च वहं करेइ। एवं अप्पेणेव कालेणं वग्घजाई वि दुल्लहदंसणा

भविस्सइ त्ति मे तक्को। जओ वग्घस्स चम्मं नहाणि य मणुस्सो नियगलाहत्थं पउंजइ।

**कमला** – ताय, वग्घाणं विणासं विरुंधिउं सासणेण वग्घरक्खण-पकप्पा उवक्कंता।

**जणगो** – सच्चमेव तं। कमले, किं तुमं जाणसि, वग्घविसए अम्हं पुव्वएहि किं भणियं? हं पढामि –

**निव्वणो हण्णइ वग्घो, निव्वग्घं छिज्जइ वणं।**
**वग्घो वणं हि रक्खेज्जा, वणं वग्घं च रक्खउ ।।**

वग्घाहिणो पसुणो सयाहरियाणि य वणाणि महणिज्जाणि एव!

**कमला** – ताय, किंतु वट्टमाणपत्तेसु भूयो भूयो पढिज्जइ जं वग्घा नयरवसइए पविसिऊण पसुणो बालगा य भक्खेंति। तं सहावकायरेहि नरेहि किं कायव्वं? वग्घाणं हणणं विणा का अण्णा गई?

**जणगो** – नेयं उइयं। जह माणवा तह अण्णे वि पसुपक्खिणो पयइ-देवयाए अवच्चाणि संति। वणाइं जेव जं सच्चं पसुपक्खिणं निवासत्थं उवकप्पियाइं। तत्थ वि सत्थलोलुवेण नरेण अक्कमणं कयं। एवं ठिए तवस्सिणो पसुपक्खिणो किं नाम कुज्जा। सव्वे वि पाणिणो निय जीवियजत्तं सुहेण अइक्कम्मिउं इच्छंति। एत्थ माणवो खु पज्जावरणविक्खेव-कारणा अवरज्झइ।

**कमला** – कहमेयं?

**जणगो** – पस्स –

**अवणी अवणीकाउं उज्जुत्तो खलु माणवो ।**
**अप्पाणं आवई गत्ते खिवइ त्ति न संसओ ।।**

वणाणं विणासेण पाउसमाणं पि खिज्जमाणं दीसइ। एवं पज्जावरण-पण्हो जडिलो कओ मणुस्सेणं।

**कमला** – किं किं, मणुस्सेण? कहमेयं?

**जणगो** – पज्जावरणविक्खेवस्स पहाणं कारणं अत्थि पदूसणं। तं च तिविहं । वाउपदूसणं, जलपदूसणं, झुणिपदूसणं च। पदूसणं च माणवो एव कुव्वेइ।

**कमला** – ताय, पदूसणं निराकरणत्थं अत्थि को वि उवाओ?

**जणगो** – एत्थ सासणं करेइ एव जहासत्तिं उवाअजोयणं। पज्जावरणदिणं, वसुंधरादिणं, वणमहूसवो, अभयारण्ण-पकप्प-आईणो अणेगा उवक्कमा सासणेण समारद्धा। पज्जावरणविसओ अज्झयणक्कमे वि समावेसिओ । किंतु नेयं पज्जत्तं। जह एयं पुहवीयलं माणवस्स कए होइ तह तं अण्णेसि कए वि वट्टइ। सव्वेसिं अविरोहेण जइ सो निवसेज्जा तो पज्जावरणस्स पण्हो न पुणो उब्भविस्सइ।

**कमला** – ताय, मए पज्जावरणस्स माहप्पणं सम्मं जाणियं।

**जणगो** – साहु! साहु!

(उभावि निक्कंता)

## शब्दार्थ

**साहु-रक्खियं** – चांगल्या प्रकारे रक्षण केलेले

**सिग्घं** – त्वरित

**हक्कारेमि** – क्रि. बोलावतो

**वट्टपत्त /वट्टमाणपत्त** – वर्तमानपत्र

**अज्जतणियं** – आजचे

**पढियं** – वाचले

**अज्झाविओ** – शिकविले

**भक्खणट्ठं** – खाण्यासाठी

**वहं** – हत्या, वध

**तक्को** – तर्क

**चम्मं** – (चर्म) कातडे, चामडे

**पउंजइ** – वापरले जाते

**निरुंधिउं** – थोपविण्यासाठी

**उवक्कंता** – सुरू केल्या आहेत

**निव्वणो** – रक्षण करणे, संरक्षण करणे, वनरहित करणे

**वुत्तं** – सांगितले

**वट्टा** – वार्ता

**विक्खेव** – (विक्षेप) हस्तक्षेप

**गिद्ध** – गिधाड

**कवोय** – कबूतर

**लुप्प** – लुप्त,

**आखेडाइसओ** – शिकारीत होणारी वाढ.

**उइय** – योग्य, उचित

**पयइ** – निसर्ग, सृष्टी

**अवच्चाणि** – अपत्ये

**उवकप्पियाइं** – योजलेली

**सत्थलोलुव** – स्वार्थ लोलुप

**तवस्सिणो** – गरीब, बिचारे, तपस्वी

**जीवियजत्तं** – आयुष्यक्रम

**समारद्धा** – सुरू केले आहेत.

**पज्जत्तं** – पुरेसे

(**गाथा भावार्थ** – जंगलातून बाहेर पडलेल्या वाघाला ठार करतात, जंगलात वाघ नसेल तर जंगलतोड करतात. खरोखर वाघाने वनाचे रक्षण करावे व वनानेही वाघाचे रक्षण करावे.)

## स्वाध्याय

### कृती करा


**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) वाघाविषयी पूर्वज काय म्हणत होते?


ब) पर्यावरणाच्या रक्षणासाठी शासनाने कोणकोणते उपक्रम चालू केले?

**2 आकृती पूर्ण करा.**

अ)



ब)





## 3 समानार्थी शब्द लिहा.

1) पुहवि –
2) नर –
3) पक्खि –
4) जणय –
5) कवोय –

## 4 अर्धमागधीत शब्द लिहा.

1) पर्यावरण –
2) रक्षण –
3) वाघ –
4) पृथ्वी –

## 5 आकृती पूर्ण करा.




## 6 उपक्रम :–

(i) पर्यावरणावर आधारित प्रकल्प तयार करा.

(ii) प्राणिसंग्रालयास भेट द्या.

# 4. संबोहेसु अंतरं



जैन धर्मामध्ये एकूण चोवीस तीर्थंकर आहेत. त्यांना देवदेवतांच्यापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले जाते. तीर्थंकरांच्या सर्व प्रतिमा पद्मासनात एकसारख्याच दिसतात. त्यामुळे कोणती प्रतिमा कोणत्या तीर्थंकरांची आहे हे समजण्यासाठी त्या त्या प्रतिमेच्या पादपीठ पट्टीवर वेगवेगळी लांछन (चिन्हे) कोरलेली असतात. या चिन्हांच्या माध्यमांतून त्या त्या तीर्थंकरांचा परिचय होण्यास मदत होते.

या चिन्हांचे स्पष्टीकरण करण्यासाठी प्रस्तुत पाठात साधू आणि वानर यांच्या संवादाची एक अत्यंत मनोरंजक व बोधप्रद अशी रूपांतरित कथा आलेली आहे. त्यातून मानवी स्वभावाचे दर्शन घडते. सदर कथा ही आचार्य विद्यानंद मुनींच्या गुरुवाणीतून घेतली आहे.

एगम्मि गामे चउवीस-तित्थयराण पडिमाए जुत्तं एगं जिणालयं अत्थि। एगया एगो वाणरो तं जिणालयम्मि पवेसिओ । सो वाणरो जिणालयम्मि सव्वे पडिमाए दट्ठूण अईव विम्हिओ होइ। सो ताणि सव्वाणि मुत्तीए निरिक्खिउं लग्गा। तओ को पडिमाए पायपीढ-पट्टीए उवरिं वसभो, को वि पडिमाए अस्स, ता को वि पडिमाए हत्थि-सिंहाइ चिण्हं दिट्ठइ। तयणंतरं निय-चित्तं दट्ठूण अईव विम्हिओ जाओ।

तं दिट्ठिऊण सो वाणरो जिणालयस्स बाहिरं आगंतूण रण्णे गओ। सव्व पसु-पक्खिणो सद्दाविऊण ते सव्वाण नियसमं घेत्तूण तं जिणालयम्मि आगओ । जस्स तस्स सरूवेण तं तं पडिमाए चिण्हं पासे तं तं पसू-पक्खिं च चिट्ठावेइ।

किंचि वेलाए तम्मि जिणालए एगा महिला तित्थयरस्स दंसणत्थं आगया। तं जिणालए विविहा पसु-पक्खिणो दट्ठूण सा महिला भयभीयं होऊण मुच्छिया जाया। तयणंतरं तत्थ एगो साहू तं तित्थयर-पडिमाए दंसणत्थं आगओ।

सो साहू दंसणत्थं जिणालयम्मि पवेसइ जिणालयम्मि पच्चेगा पडिमाए पासे विविह-पसुपक्खिणं दट्ठूण वि सो भयभीयं न होइ। निब्भय-चित्तेण, सव्व-पडिमाए दंसणं करेइ। जाव सो साहू

अहिणंदण-पडिमाए पासं वंदणत्थं नमइ ताव तत्थ उवविसो तं वाणरो अईव हरिसिऊण निय-हत्थं उवरिं करिऊण साहुं आसीवायं देइ। तं दट्ठूण सो साहू वाणरं भणइ, 'भो वाणरो! तुब्भे ण वंदामि । अहं एयं भगवं पडिमाए वंदामि । तं साहुस्स वयणं सुणिऊण वाणरेण भणइ, 'जइ अहं भगवं नत्थि तो वि इमाए पडिमाए मम चिण्हं किं चित्तारेइ? तं वाणरस्स वयणं सुणिऊण साहु भणइ, 'इमा पडिमा पासाणस्स अत्थि इमम्मि कहिं भगवं अत्थि?'

तओ साहु वुत्तं, 'एए अहिणंदणप्पभू अत्थि। वाणरेण भणइ, 'एयं तुमं कहं जाणसि? साहू भणियं 'पडिमाए पायपीढपट्टीए उवरिं वाणर-चिण्हेण अहं जाणामि। तं सुणिऊण वाणरेण भणिया, 'भगवं अहिणंदण-प्पभुस्स पडिमाए समीवं ममं वि चित्तं अत्थि तेण अहं वि भगवं अत्थि! एवं पयारे साहू वाणरो य दुवे वि बहुलं कालं विवादं करेन्ति।

तयणंतरं साहू भणइ, 'मणुस्साण सरीरस्स आकारं समाणं अत्थि। तेण कारणेण कस्स वि परिचयं न होन्ति। अओ पडिमाए उवरिं मणुस्सस्स चिण्हं ण चित्तारेन्ति। पसुपक्खिणा सरीर-आकारं भिन्न-भिन्नं अत्थि। तेण कारणेण पडिमाए परिचयकरणत्थं सुलभं होइ। तेणं पच्चेग-पडिमाए पायपीढ-पट्टीए उवरिं विविहं चिण्हं चित्तारेन्ति।

तं साहू वयणं सुणिऊण वाणरेण वुत्तं, 'अज्ज मए एगं फुडं होइ, मणुसा बाहिरं आकारेण एगसरिसा दिट्ठंति किंतु अंतरमणेण भिन्न-भिन्नं होन्ति। सव्वे पसुपक्खिणावि बाहिरं आकारेण भिन्नं भिन्नं सरीरा होन्ति किंतु हियएण एगसरिसा होन्ति। अओ माणवाओ वि पसुपक्खिं सेट्ठं अत्थि। तेण कारणेण भगवं पडिमाए समीवं ठाणं पावेइ।

## शब्दार्थ

**तित्थयर** – तीर्थंकर
**फुडं** – स्पष्ट होणे
**विम्हय** – आश्चर्य
**रण्ण** – जंगल
**पडिमा** – प्रतिमा
**पासाण** – दगड
**हियय** – हृदय
**सेट्ठं** – श्रेष्ठ
**वयणं** – बोलणे
**पायपीढ** – मूर्तीखालील दगडपट्टी

## स्वाध्याय

### कृती करा

**1 अर्धमागधीत समानार्थी शब्द लिहा.**

1) विम्हय
2) पक्खी
3) रण्ण
4) महिला

**2 घटनाक्रम लिहा.**

1) एगा महिला तित्थयरस्स दंसणत्थं आगया ।

2) एगो वाणरो तं जिणालयम्मि पवेसिओ ।

3) अहं एयं भगवं पडिमाए वंदामि।

4) एगो साहू तं तित्थयर-पडिमाए दंसणत्थं आगओ ।


5) एगम्मि गामे चउवीस-तित्थयराण पडिमाए जुत्तं एगं जिणालयं अत्थि।

**3 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) "भो वाणरो! तुब्भे ण वंदामि।"

2) "जइ अहं भगवं नत्थि तो, वि इमाए पडिमाए मम चिण्हं किं चित्तारेइ?"

**4 आकृती पूर्ण करा.**




**5 गटात न बसणारा शब्द ओळखा.**

| | | | |
|---|---|---|---|
| हत्थि | गज | वराह | कुंजर |
| सीह | सारंग | हरि | केसरि |

**6 उपक्रम :- विविध मंदिरांना भेटी देऊन त्यांची माहिती संग्रहीत करा.**

# 5. सच्चवाणस्स सावित्ती



'सावित्री' म्हटले की, आपल्या डोळ्यांसमोर सावित्रीबाई फुले आणि सत्यवानाची सावित्री यांचे कणखर, धैर्यशील, बुद्धिमान व संकटकाळातही संयम न सोडणारे व्यक्तिमत्व उभे राहते.

दुष्टांना आणि रूढी परंपरांना न जुमानता सावित्रीबाई फुलेंनी महिलांसाठी शाळा चालवून अज्ञानाच्या जोखडीतून स्त्रियांची मुक्तता केली तर सत्यवानाच्या सावित्रीने यमाच्या मृत्युफाशातून स्वत:च्या पतीची मुक्तता केली. अशा या धैर्यशील, बुद्धिमान, चतुर व्यक्तिमत्व असलेल्या सत्यवानाच्या सावित्रीचा परिचय नवीन पिढीला होणे गरजेचे आहे.

सत्यवानाची सावित्री ही अश्वपतीची एकुलती एक मुलगी. ती तारुण्यात आल्यावर आपल्या जीवनसाथीदाराची निवड ती स्वत:च करते. परंतु दुर्दैवाने तिचा पती अल्पायुषी ठरतो. यमराज आपल्या पतीचा प्राण घेऊन जात असताना सामान्य स्त्रीप्रमाणे ती आक्रोश करत न बसता यमाच्या पाठीमागून जाऊ लागते. तेव्हा यम आणि सावित्री याच्यांत जो संवाद झाला तो सावित्रीची बुद्धिमत्ता, धैर्य, संयम इ. विविध गुण स्पष्ट करणारा असून प्राचीनकालीन भारतीय स्त्रियांचे श्रेष्ठत्व स्पष्ट करणाराही आहे. तो संवाद संक्षिप्तपणे या पाठात अनुवादित केलेला आहे. तेव्हा तो आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आजच्या तरुण भारतीय स्त्रियाही प्रतिकूल स्थितीवर मात करून आपणही सत्यवानाच्या व फुलेंच्या सावित्रीप्रमाणे धैर्यशील, बुद्धिमान, सबला स्त्रिया असल्याचे दाखवून देतील असा  या पाठाचा उद्देश आहे.

**जमराय –** सावित्ती तुमं मम मग्गे किं एसि? तव पइस्स मच्चू होइ। तओ पइस्स देहस्स अंतसक्कारं करेह।

**सावित्ती –** पइस्स मग्गे निरंतरं गच्छह त्ति भारहीय नारीए धम्मं अत्थि। तेण अहं मम पइस्स मग्गे एमि।

**जमराय –** तुज्झ पइणिट्ठा दट्ठूण ममं अच्चंतं आणंदं होइ। तओ पइस्स पाणं मुंचिऊण अण्णं कोवि वरं मग्गसु।

**सावित्ती –** मम ससुरं दिट्ठी नत्थि तस्स दिट्ठिं देह।

**जमराय –** 'आमं ति।' एण्हिं तुमं गच्छ। चलणस्स निरत्थकं कट्ठं न घेसि।

**सावित्ती –** मम पई जत्थ गच्छिस्सइ तत्थ अहं वि गच्छिस्सामि। पइसमं गच्छंताण मम किंचि वि कट्ठं न होइ। बीओ तुमं सहावं वि सुपुरिसाण इव अत्थि तेण अहं तुमं समं बोल्लामि।

**जमराय –** भो सावित्ती ! तुज्झ वयणेण मम हिययं पसन्नं होइ। पइस्स पाणं मुंचिऊण अण्णं को वि वरं मग्गसु।

**सावित्ती –** मम ससुरस्स गय–विहवं पुणो पाविस्सइ।

**जमराय –** तहेव च्चिय होउ। एण्हिं ता तुमं गच्छ।

**सावित्ती –** जमराय तुमं सव्वं धम्म–नियमं जाणसि तेण तुमं यमं त्ति नामेण संबोहइ। बीओ तुमं सत्तुस्स वि हियं चिंतसि। दीणजणाण उवरिं वि अणुकंपा करेसि।

**जमराय –** सावित्ती! तुज्झ वयणं तण्हाजीवस्स जलं इव अत्थि। तं सुणिऊण मम हिययं संतुट्ठं होइ। तओ सच्चवाणस्स पाणाए विणा अण्णं वरं मग्गसु ।

**सावित्ती –** मम पिउणो वंसवड्ढीए एगं वि पुत्तं नत्थि । ताव तस्स पुत्तं भविस्सइ।

**जमराय –** तहेव च्चिय होउ। एण्हिं ता वि तुमं गच्छसु।

**सावित्ती –** मम पइ तुमं समीवं अत्थि। पइं मुंचिऊण अहं कहिं गच्छामि? बीयं तुमं मम सव्वं इच्छा पुण्णं करेसि। अण्णं, तुमं मम सव्ववयणं सुणिऊण तेण पमाणं करित्था। तओ एवं पयारस्स दयावंतस्स मुंचिऊण अहं अण्णत्तं कहिं ण गच्छामि।

**जमराय –** सावित्ती, एवं पयारस्स तुज्झ वयणं सुणिऊण मम वि हियए दयाभावं निम्माणं होइ। तओ वरं मग्गसु।

**सावित्ती –** मए पुत्तं होस्सइ।

**जमराय –** तव इच्छा सिग्घं पुण्णं होउ। एण्हिं ता गच्छ।

**सावित्ती –** एयं विस्सं संत–सुपुरिसस्स आयार–वियारेण धम्मनीईएण च्चिय तरइ। भारहीय सक्कईए पइस्ससमं च्चिय पुत्तं मण्णइ। एयं तुमं पि जाणसि।

**जमराय –** भो चरित्तसंपण्ण–इत्थीए! तुमं एयं वयणेण अहं अहियं आणंदं होमि। ता वरं मग्गसु!

**सावित्ती –** तुम्हे मए पुत्तस्स वरं देसि। तेण अहं तुमं आभारं मण्णामि। किंतु मम पई मए समं नत्थि। ता मए पुत्तं कहं होइ? जइ इयराओ पुरिसाओ पुत्तं पावइ ता लोगा मए असइं संबोहिस्सन्ति। बीयं पइस्स विणा अहं मयवयं अत्थि। तओ पइविणा मए किंपि इच्छा नत्थि।

**जमराय –** सावित्ती! तुमं अच्चंतं चउरा इत्थि अत्थि। तुमए मए संभासणम्मि जियसि। तुमं सच्चं सव्वसेट्ठं इत्थी अत्थि। तव एयं पि इच्छा पुण्णं होउ त्ति भणिऊण संतुट्ठ–हियएण जमराएण सावित्तीए पइस्स पाणं वि देइ।

## शब्दार्थ

**मच्चू** – मृत्यू

**पई** – पती

**मुंचिऊण** – सोडून

**वरं** – इच्छा, अपेक्षा, आकांक्षा

**ससुर** – सासरे

**आमं** – कबूल करणे, मान्य करणे

**कट्ठं** – कष्ट

**निरत्थकं** – निरर्थक, व्यर्थ

**हियं** – हित लाभ

**तण्हा** – तहानलेल्या

**पिउणो** – पिताच्या

**वड्ढीए** – वृद्धी, वाढीसाठी

**समीवं** – समवेत, जवळ

**कहिं** – कोठे

**अण्णत्तं** – अन्यत्र

**इत्थीए** – स्त्रीने

**अहियं** – अधिक

**वत्तमाण** – वर्तमानकाळातील

**कहं** – कशी

**इयराओ** – इतरांपासून

**बोहि** – बुद्धी

**इमा** – अशी, ही

**बीओ** – दुसरे

**इव** – प्रमाणे, समान, सारखे

**हियय** – हृदय, मन

**विहवं** – वैभव

**पाविस्सइ** – प्राप्त होऊ दे

**एण्हिं** – आता

**संबोहइ** – संबोधने, उच्चारणे

**सत्तुस्स** – शत्रूचे

**तव** – तुझी

**सिग्घं** – ताबडतोब

**विस्स** – विश्व, जग

**आयार** – आचार

**तरइ** – तरणे, चालणे, अस्तित्वात असणे

**सक्कईए** – संस्कृतीत

**मण्णइ** – मान्यता असणे

**असइं** – असती, चारित्र्यहीन

**मयवं** – मृतवत

**मए** – मला, माझी

**संभासणम्मि** – बोलण्यात

**जियसि** – जिंकलेस

**वसणं** – संकट

## स्वाध्याय

### कृती करा

**1 एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) सावित्री कोणाची मुलगी होती?

2) यमाने सावित्रीस मृत शरीराचे काय करावयास सांगितले.?

3) सावित्रीने प्रथम वरदानासाठी कोणती इच्छा व्यक्त केली?

4) यमाने इच्छित वरप्राप्तीसाठी सावित्रीस कोणती अट घातली होती?

5) सावित्रीने स्वत:साठी कोणता वर मागितला?

6) भारतीय स्त्रीचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते?

**2 प्राकृतातील शब्द लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1) | मार्ग | | 5) | दुसरे | |
| 2) | मृत्यू | | 6) | अन्यत्र | |
| 3) | सोडून | | 7) | शिवाय | |
| 4) | सासरे | | 8) | आता | |

**3 वर्ण बदल स्पष्ट करा**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | पइ | 5) | सत्तू |
| 2) | सावित्ती | 6) | सव्व |
| 3) | जमराय | 7) | सहाव |
| 4) | विहव | 8) | पाण |

**4 रूपे ओळखा.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | पाविस्सइ | 5) | होउ |
| 2) | ससुरस्स | 6) | अत्थि |
| 3) | हियं | 7) | होइ |
| 4) | सुणिऊण | 8) | गच्छसि |

**5 व्यक्तिचित्रण रेखाटा.**

1) सावित्री 2) यमराज

**6 खालील शब्दांसाठी पाठातील शब्द शोधा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1) | स्त्री | | 3) | दुसरा | |
| 2) | वैभव | | 4) | मृत्यू | |

**7 उपक्रम :- प्रस्तुत पाठाप्रमाणे एखादी कथा नाट्यात रूपांतरित करा.**

# 6. अयहारय-दिट्ठंतं



'अयहारय-दिट्ठंतं'हा पाठ अर्धमागधी जैन आगम ग्रंथातील 'रायपसेणिय-सुत्तं' या दुसऱ्या उपांग ग्रंथामधून घेतलेला आहे. रायपसेणिय ग्रंथ म्हणजे आगम शैलीचे एक खास वैशिष्ट्यच होय.

प्रदेशी राजा आपला पारंपरिक दृष्टिकोण सोडण्यास तयार नसल्यामुळे त्याचा विकास खुंटलेला होता. म्हणून केसीकुमार मुनी त्याला उपदेशातून समजावून सांगतात हे राजा, काळानुसार आपल्या आचार-विचारामध्ये परिवर्तन केले तर आपली प्रगती होऊन सुखाची प्राप्ती होते. परंतु काळानुसार स्वत:मध्ये परिवर्तन केले नाही तर दु:ख भोगावे लागते शिवाय पश्चातापही करण्याची वेळ येते. थोडक्यात काळानुसार परिवर्तन करणे कसे आवश्यक आहे ते लोखंडाचे ओझे वाहणाऱ्या मनुष्याच्या उदाहरणातून येथे स्पष्ट केले आहे.

प्राचीन काळातील चांगल्या घटकांचा स्वीकार करण्याबरोबर आधुनिक काळातील वैज्ञानिक प्रगतीचाही स्वीकार केला तर जीवन सुखकर होण्यास कशी मदत होते ते या पाठात पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे. त्याचा विद्यार्थ्यांना भावी जीवनात निश्चितच उपयोग होईल असे वाटते.

तए णं पएसी राया केसिकुमार-समणं एवं वयासि, एवं खलु भंते, मम अज्जगस्स एसा सन्ना जाव समोसरणे जहा तं जीवो तं सरीरं नो अन्नो जीवो अन्नं सरीरं। तयणंतरं च णं मम पिउणो वि एसा सन्ना। तयणंतरं मम वि एसा सन्ना जाव समोसरणं। तं नो खलु अहं बहु-पुरिस-परंपरागय-आगया कुल-निस्सियं दिट्ठिं छंडेस्सामि।

तए णं केसी -कुमार-समणे पएसिं रायं एवं वयासी- एए णं तुमं, पएसी, पच्छाणुताविए भवेज्जासि जहा से पुरिसे अयहारए। के णं भंते, से अयहारए?

तओ केसीकुमार-समणे वयासी, 'भो पएसी, से जहानामए केइ पुरिसा अत्थत्थी, अत्थ-गवेसी, अत्थ-पिवासिया, अत्थ-गवेसणयाए विउलं पणिय-भंडमायाए सुबहुं भत्त-पाण-पत्थयणं गहाय एगं महं अगामितं दीहमद्धं अडविं अणुपविट्ठा'। तए णं ते पुरिसा तीसे अगामियाए अडवीए कंचि देसं अणुपत्ता समाणा एगं महं अयागरं पासंति तं अएणं सव्वओ समंता आइण्णं वित्थिण्णं गाढं परिपुण्णं अयागरं पासिऊण हट्ठतुट्ठा परोप्परं एवं सद्दावेंति, 'भो देवाणुप्पिया, अहं अयभारए बंधित्तए त्ति कट्टु अन्नं अन्नस्स एवं अट्ठं पडिसुणेंति। अयभारं बंधिऊण अहाणुपुव्वीए संपत्थिया'।

तए णं ते पुरिसा अगामियाए जाव अडवीए कंचि देसं अणुपत्ता समाणा एगं तउ–आगरं पासंति। तओ अन्नं अन्नं सद्दावेंति, 'एस णं देवाणुप्पिया तउ–भंडे जाव मणामे। अप्पेण चेव तउएणं सुबहुं अए लब्भइ। तओ एयं सेयं खलु, देवाणुप्पिया अय–भारयं छड्डेत्ता तउयभारए बंधित्तए' त्ति कट्टु अन्नमन्नस्स एवं अट्ठं पडिसुणिऊण अयभारं छड्डेंति। तउभारं बंधंति।

किंतु तओ तत्थ णं एगे पुरिसे नो संचाएइ अयभारं छड्डित्तए तउयभारं बंधित्तए। तए णं ते पुरिसा तं पुरिसं एवं वयासी, एस णं, देवाणुप्पिया, तउय–भंडे जाव सुबहुं अए लब्भइ। तं छड्डेहि णं देवाणुप्पिया अय–भारगं, तउभारगं बंधाहि।

तए णं से पुरिसे एवं वयासी, 'दूराहडे मे देवाणुप्पिया अए; तेण अइगाढ–बंधण–बद्धे मे देवाणुप्पिया अए नो संचाएमि अयभारगं छड्डेत्ता तउय–भारगं बंधित्तए।

तए णं पुरिसा तं पुरिसं जाहे नो संचाएंति बहुहिं आघवणाहि य पन्नवणाहि य तया अहाणुपुव्वीए संपत्थिया। एवं पयारे तम्बागरं, रुप्पागरं, सुवण्णागरं, रयणागरं, वेडूरागरं पासंति। पच्चेग–वेलाए सव्वे लोगा निय–भारं परिवत्तणं करेन्ति। कमेण ते पुरिसा जेणेव सया जणवया, जेणेव सया नयराइं तेणेव उवागच्छंति। वेडूय–विक्कयणं करिऊण सुबहु–दव्वं पावंति। तं दव्वं पभावेहिं सुबहु–दासी–दास–गो–महिस–गवेलगं गिण्हंति। अट्ठतलसियवडिंसगे कारावेंति। नाडएहिं वर–तरुणी–संपउत्तेहि इट्ठे सद्द–फरिसं विहरंति।

तए णं से अय–भार–वहंतो पुरिसो जेणेव निय–नयरे तेणेव उवागच्छइ। अय–भारेण गहाय अय–विक्किणणं करेइ। तओ तस्स अच्चंतं अप्प–मोल्लं पावइ। झीण–परिव्वए से पुरिसो ते पुरिसाणं उप्पिं पासायवरगए दट्ठूण एवं चिंतेइ, 'अहो णं अहं अधन्नो, अपुण्णो, अकयत्थो अकय–लक्खणो हिरि–सिरि–वज्जिए हीण–पुण्ण–चाउद्दसे दुरंत–पंत–लक्खणे । जइं णं अहं मित्ताण वा नाईण वा नियगाण वा सुणेंतओ, तो णं अहं पि एवं चेव उप्पिं पासाय– वरगए जाव विहरंतो। से तेण अट्ठेणं पएसी एवं वुच्चइ, मए णं तुमं, पएसि पच्छाणुताविए भवेज्जासि जहा व्व से पुरिसे अयहारए'।

**(रायपसेणियसुत्त– 'अयहारयदिट्ठंतं')**

## शब्दार्थ

**अय** – लोखंड

**अयहारय** – लोखंडाचे ओझे वाहणारा

**अज्जग** – आजोबा

**अत्थत्थी** – अर्थार्थी, द्रव्यासाठी

**अगामिय** – अग्रामिक, गावरहित

**अयागर** – लोखंडाची खाण, साठा

**अइ–गाढ** – अतिशय, अधिक

**आघवणा** – प्रतिपादन करणे, समजाविणे

**अकयत्थ** – अकृतार्थ, दुर्दैवी

**अत्थ** – अर्थ, द्रव्य, पैसा

**दीहमद्ध** – लांबच लांब, दूर

**दूराहडे** – दूरहून आणणे

**दुरंत** – दूरपासून,ज्याचा परिणाम वाईट होतो असे

**तउ** – शिसे

**तंब** – तांबे

**मण** – मानणे

**पणिय** – विक्रीलायक वस्तू

**पत्थयण** – भोजन, शिदोरी

**पडिसुय** – स्वीकारणे

**पंत** – (प्रांत) शेवटपर्यंत

**ऊसिम** – उंच

**उवच्छडं** – काठोकाठ भरलेले

**छड्डु** – सोडणे, त्यागणे

**दिट्ठंत** – दृष्टांत, उदाहरण

**सण्णा** – संज्ञा, श्रद्धा, समजूत

**रुप्प** – रूपे, चांदी

**गो** – गाय

**वेडूर** – वैडूर, रत्न, हिरा

**वडिंसग** – भूषण, वसंतक

**सच्छडं** – परिपूर्ण

## स्वाध्याय

### कृती करा

**1 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) तं जीवो तं सरीरं नो अन्नो जीवो अन्नं सरीरं।

2) के णं भंते से अयहारए?

3) मा णं तुमं, पएसी, पच्छाणुताविए भवेज्जासिं जहा व से पुरिसे आयरए।

4) दूराहडे मे देवाणुप्पिया अए तेण अइगाढ-बंधण-बद्धे मे।

**2 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) केशीकुमार मुनींनी प्रदेशी राजास उपदेश का केला?

2) द्रव्यार्जनासाठी गेलेल्या पुरुषांनी काय केले?

3) लोखंडाचे ओझे वाहणाऱ्या पुरुषाने आपल्या ओझ्यामध्ये बदल का केला नाही?

4) ओझ्यामध्ये परिवर्तन केलेल्या पुरुषांना कोणते लाभ झाले?

5) लोखंडाचे ओझे वाहणाऱ्या पुरुषाला पश्चाताप का करावा लागला?

**3 प्राकृतात रूपांतर करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रदेशी राजा | तांबे | नाटक | पैशासाठी | स्नान |
| नातेवाईक | लोखंडाचे ओझे | पुण्यरहित | मृदंग | |


**4 रूपे ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पासन्ति | वयासि | करिऊण | नाडएहिं | नयरे |
| छडेस्सामि | पुरिसे | पुरिसं | | |

**5 समानार्थी शब्द लिहा.**

1) राया – ______ 2) अत्थ – ______

# पज्ज – विभागो



# 1. रट्ठभत्ती



भारत हे महान राष्ट्र आहे. येथील संपूर्ण राष्ट्रीय समाज हेच आपल्या सर्वांचे एकमेव श्रद्धास्थान आहे. राष्ट्रधर्म ही एक संजीवन शक्ती आहे. यातच सर्व समाजाची उन्नती, संपूर्ण राष्ट्राचा उत्कर्ष अभिप्रेत आहे.

जात, पंथ, भाषा, प्रांत अथवा पक्ष यासारख्या अन्य कोणत्याही गोष्टींचा विचार या राष्ट्रभक्तीच्या आड येऊ न देता आपले राष्ट्र उत्कर्षाला कसे जाईल याचाच प्रत्येकाने ध्यास घेतला पाहिजे. आज दुबळ्या व अशक्त समाज घटकांना राष्ट्रभक्तीचे धडे देण्याची गरज वाटते. त्यासाठी सर्व राष्ट्रधर्माच्या प्रणेत्यांनी केलेले कार्य आज तरुणांच्या पुढे ठेवले पाहिजे. कारण यातून तरुण वर्गाला मोठी प्रेरणा मिळेल.आजच्या तरुण पिढीला राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्रधर्म म्हणजे काय? हे कळलेच पाहिजे.

'स्वर्गादपि गरीयसी' अशा आपल्या राष्ट्राबद्दल श्रद्धाभाव व आदर राखून आपले राष्ट्र जगात सर्वश्रेष्ठ आहे. ते चिरंतन रहावे म्हणून सतत आपण प्रयत्नशील असणे ही खऱ्या राष्ट्रभक्तीची गरज आहे. असे महान विचार सांगणारी ही कविता श्री फूलचन्द जैन प्रेमी, (वाराणसी) यांनी लिहिली. या कवितेत शौरसेनी प्राकृत भाषेची वैशिष्ट्ये पहायला मिळतात.

एसो मे अइ-गारवो जं भारहे जम्म मे जादो।
वीर! मम दिंतु सत्ति जेसिं रट्ठुत्थाणं सआ होमि तप्परो ।।1।।

वीर! रट्ठभत्ति-समप्पिदो होदि सदा मम हिद्दो।
होदु सुही लहदु संति विणसदु सआ अण्णाणतिमिरो।।2।।

अहिंसा-समदा-खंति, विस्सबंधुत्त-पयासओ ।
समिद्धो-पियदेसो मे सदा सो जयदु भारदो ।।3।।

गंगा च गोदावरी, कण्हा, कावेरी तु सुसोभिदा सदा।
हिमालयादो विंज्झप्पदेसं विट्ठो जयेदु मे भारदभूमि-भागो ।।4।।

राम-किण्ह-बुद्ध-वीरा जाआ अस्सिं अइ-पवित्त-देसम्मि ।
समदा भाव-पुव्वं उ वसिदव्वं अत्थ परप्परोवयारम्मि ।।5।।

एगो अम्ह भारदो अत्थि कम्हीराओ च कण्णाकुमारीओ ।
जं पसिद्धो विस्स-गुरुणो वसुहेव कुडुंबणत्तणं ।।6।।

आदंकवाद-दलिदुं सस्सदो होदुं च सो मुक्को ।
होऊ सुही सब्भावो य लहेंतु कआवि ण किलसो ।।7।।

मम पिय भारहमाया जम्मदाई अम्ह जणणी य भारिदी ।
पणमामि तं सभत्तिं अणुकंपा होदुं तं गुणादु ।।8।।

## शब्दार्थ

**गारवो** – गौरव

**सत्ति** – शक्ती

**रट्ठुत्थाणं** – राष्ट्राचे उत्थान (विकास)

**विणसदु** – विनाश होऊ दे

**हिद्दो** – ह्रदय

**कण्हा** – कृष्ण

**कम्हीर** – काश्मीर

**दलिदुं** – दारिद्र्य

**समप्पिदो** – समर्पित

## स्वाध्याय

### कृती करा

**1 पुढील शब्द अर्धमागधीत लिहा.**

काश्मीर – ____

कृष्ण – ____


पवित्र – ____

विश्वबंधुत्व – ____

राष्ट्रभक्ती – ____


**2 आकृती पूर्ण करा.**

अ)




ब) पव्वय नाम –

क) आकृती पूर्ण करा.




**3 समानार्थी (अर्धमागधीत) शब्द लिहा.**

1) जणणी 2) अणुकंपा

**4 विरुद्धार्थी शब्द लिहा.**

अहिंसा, पसिद्धो, दुही

**5 उपक्रम :– राष्ट्रभक्तीपर गीतांचा संग्रह करा.**

# 2. अभयदाणं




हा पद्यपाठ 'सुदंसणा-चरियं' या प्राकृत काव्यग्रंथातून घेतला आहे. या ग्रंथाची रचना देवेंद्रसूरी यांनी केली. त्यांचा काळ साधारणपणे 13 व्या शतकाचा मानला जातो. देवेंद्रसूरी हे संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश इ. भाषा जाणणारे होते.

'अभयदाण' ही कथा संस्कृत कथासाहित्यातही शिबी राजाची कथा म्हणून प्रसिद्ध असलेली दिसून येते. अहिंसेचे व दानाचे श्रेष्ठत्व स्पष्ट करण्यासाठी प्राकृत साहित्यातही कथा प्रसिद्‌ध आहे.

परमेश्वराने विश्वातील प्रत्येक प्राणी हे पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्देशानेच निर्माण केलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक प्राण्याला जगण्याचा अधिकार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक प्राणिमात्राचा सहभाग असलेला दिसून येतो. प्रत्येक प्राण्याच्या निर्मितीमागे निसर्गाचा कोणता ना कोणता उदात्त हेतू असलेला दिसून येतो. म्हणून या विश्वातील प्रत्येक जीव पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे सर्व प्राणिमात्रांचे रक्षण करणे कसे आवश्यक आहे ते या पद्य पाठात मेघरथ राजाच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे.

अह सो मेहरह-निवो उज्जाणाओ गिहागओ कइया।
पोसहिओ पोसहसाल-संठिओ कहेइ जिणधम्मं।।1।।

अह गयणमंडलाओ भयसंभंतो पकंपिरो दीणो ।
पारेवओ रडंतो पडिओ रायस्स उच्छंगे ।।2।।

अभयं च जायमाणं माणुस-भासाइ तं खगं राया ।
करुणारस-नीरनिही मा भाहि पुणो पुणो भणइ ।।3।।

एवं वुत्तो रण्णा पसंतमुत्ती विहंगमो एसो ।
पिउउच्छंगे बालु व्व निब्भओ चिट्ठए जाव ।।4।।

ममं भक्खं मुंच इमं राय! न जुत्तं इमं त्ति जंपंतो ।
तप्पिट्ठीए  सेणो पत्तो सप्पस्स गरुड व्व ।।5।।

तो भणइ भूमिनाहो सेण, 'इमं तुह कहं समप्पेमि ।
एस न खत्तियधम्मो सरणाऽऽगय-अप्पणं जमिह' ।।6।।

किं च न तुज्झ वि जुत्तं जुत्ताऽजुत्तोवएस-कुसलस्स ।
पर-पाण-पहाणेण सप्पाण-परिपोसणं एवं ।।7।।

जह उक्खणिज्जमाणे पीडा पिच्छे  वि हुज्ज तुह गरुई।
अण्णस्स वि किं न तहा? मारिज्जंतस्स का वत्ता? ।।8।।

अण्णं च भक्खिएणं खणमित्तमणेण तुह भवे तित्ती ।
एयस्स पुणो जम्मो  वच्चइ सयलो वि एमेव ।।9।।

पंचिंदिय-घाएणं नरए जं नूणं गम्मए तम्हा ।
खणमित्त-सुह-निमित्तं  को जीवे हणइ छुहिओ वि? ।।10।।

सा पुण छुहा समिज्जइ अवरेण वि भोयणेण जह पित्तं ।
पवरसिया-समणिज्जं पि किं न पयसा उवसमेइ? ।।11।।

न उ उवसमंति केण वि जिय-वह-पभवाउ नरयवियणाओ ।
ता मुंचसु जीववहं कुणसु दयं सयल-सुह-जणयं ।।12।।

सेणो वि भणइ नरवर! 'सरणं तुह एस आगओ भीओ ।
किमहं करेमि सरणं कहसु महाभाग! छुहगहिलो' ।।13।।

जह रक्खसि दुक्खत्तं एयं करुणाइ तह ममं पि न किं?
अइभुक्खियस्स पाणा नूणमिमो मज्झ वच्चंति ।।14।।

धम्माऽधम्मविचिंता वि चिट्ठए सुट्ठिए सरीरम्मि।
तं नत्थि न कुणइ बुभुक्खिओ कूरमवि कम्मं ।।15।।

तद्धम्मवत्तया अलं अप्पसु मह भक्ख-भूयं इणं अइरा ।
को धम्मो जं इक्को रक्खिज्जइ हम्मए अवरे?।।16।।

न य मज्झ हुज्ज तित्ती कहं वि भुज्जंतरेहिं जं सययं।
सज्जो सयं हयं जिय-फुरंत-मंसाऽसणो अहयं ।।17।।

भणइ निवो, 'जइ एवं ता तुह वियरेमि सेण! नियमंसं।
पारेवएण तुलियं होसु सुही मा तुमं मरसु' ।।18।।

आमं त्ति परे सेणे तुलाइ एगत्थ ठावइ कवोयं ।
अण्णत्थ खिवइ राया छित्तुं छित्तुं नियमंसं ।।19।।

जह जह खिवेइ मंसं राया उक्कत्तिऊण निय-तणुणो।
तह तह भारेण इमो वड्ढइ पारेवओ अहियं ।।20।।

भारेण वड्ढमाणं तं पक्खिं पिक्खिऊण अक्खुहिओ ।
सयमेवाऽऽरुहइ तहिं तुलाइ राया अतुलसत्तो ।।21।।

इय निच्छयमवगच्छिय निवस्स एगो अमच्छरो अमरो ।
वर-मउड-कुंडल-धरो पयडी होउं भणइ एवं ।।22।।

'इक्को चिय तं धण्णो सुपुरिस-चूडामणी तिहुयणम्मि ।
चालिज्जसि? न सुरेहिं वि सट्ठाणाओ सुरगिरि व्व ।।23।।

इय ईसाणिंदेणं वि वणिज्जंतं तुमं णिसुणिऊण ।
तुह सत्त-परिक्खत्थं इहाऽऽगओ असहमाणोऽहं ।।24।।

तुह उवसग्गमकाहं तं सव्वं खमसु पसिऊण ।
इय भणिय निवं सज्जं काउं नमिउं सुरो गओ सग्गं ।।25।।

## शब्दार्थ

**पोसहिय** – (पौषधिक) अष्टमी, चतुर्दशी या पर्वतिथींना पाळावयाचे आहारादिचे व्रत

**पोसहसाला** – पौषधशाळा (पौषध–उपास व्रत करण्याचे ठिकाण)

**पकंपिर** – थरथर कापणारा

**नरयवियणा** – नरकातील यातना

**छुहगहिलो** – भुकेने व्याकूळ झालेला

**अइरा** – ताबडतोब

**अमच्छर** – दयाळू, कृपाळू

**ईसाणिंदेण** – ईशान्य स्वर्गातील इंद्र

**पारेवय** – पारवा, कबूतर

**सेण** – बहिरी ससाणा

**उक्खण** – उखडणे, उपसणे

**पिच्छ** – पीस

**पवरसिया** – उत्कृष्ट खडीसाखर, द्राक्षरस

**पय** – दूध

**आमं** – होय

**अमरो** – मृत्यू नसलेले, देव

**वराय** – बिचारा, गरीब, क्षुद्र

**अक्खुहिओ** – प्रक्षोभित न होता, न रागवता

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) मेघरथ राजा कोठे बसला होता?

2) मेघरथ राजाजवळ कोण अभयदान मागत होते?

3) पारव्याच्या पाठीमागून कोण आले?

4) मेघरथ राजा काय म्हणाला?

**2 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

1) 'मम भक्खं मुंच इमं राय।'

2) 'किमहं करेमि सरणं कहसु महाभाग! छुहगहिलो।'

**3 समानार्थी शब्द लिहा.**

1) राया → ______

2) पयं → ______

3) पारेवय → ______

4) सुरो → ______

5) पिच्छ → ______

**4 कोण ते लिहा.**

1) पौषधशाळेत चिंतन करणारा ______

2) भयभीत होऊन थरथर कापणारा ______

3) पारव्याच्या पाठोपाठ येणारा ______

4) स्वत:च्या मांडीचे मांस कापून देणारा ______

5) राजाला उपसर्ग देऊन क्षमा मागणारा ______

6) अभयदान देणारा ______

**5 उपक्रम :– दानशूर कर्ण व राजा हरिश्चंद्र यांच्या कथा वाचा.**

# 3. नीइवज्जा



'नीइवज्जा' ही कविता 'वज्जालग्गं' या प्राकृत सुभाषित ग्रंथातून घेतलेली आहे. 'वज्जालग्गं' हा प्राकृत साहित्यातील अत्यंत श्रेष्ठ ग्रंथ असून कवी जयवल्लभांनी या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथात विविध विषयांवरील निवडक गाथांचा संग्रह केलेला दिसून येतो.

'वज्जा' म्हणजे पद्धती, मालिका, रांग होय. 'लग्गं म्हणजे समूह, संग्रह. 'वज्जालग्गं' हा ग्रंथ म्हणजे प्राकृत भाषेतील सुभाषितांचा संग्रह होय. आकर्षक व मोजक्या शब्दातील मौलिक विचारांचा संग्रह म्हणजे सुभाषिते होत.

समाजातील लोक संस्कारक्षम, आचार-विचाराने निकोप व गतिमान होण्यासाठी सुभाषितांचे अध्ययन महत्त्वपूर्ण आहे. या सुभाषितांचा परिचय होण्यासाठी 'नीइवज्जा' हा पद्य पाठ येथे दिला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात त्याचा उपयोग केल्याने विद्यार्थ्यांचेही जीवन विकसित होण्यास मदत होईल.

जं जस्स मम्म-भेयं चालिज्जंतं च दूमए हिययं ।
तं तस्स कण्ण-कडुयं कुलेसु जाया न जंपन्ति ।।1।।

संतेहि असंतेहि य परस्स किं जंपिएहिं दोसेहिं ।
अत्थो जसो न लब्भइ सो वि अमित्तो कओ होइ।।2।।

अप्प-हियं कायव्वं जइ सक्कइ पर-हियं च कायव्वं ।
अप्प-हियं पर-हियाणं अप्प-हियं चेव कायव्वं ।।3।।

पुरिसे सच्च-समिध्दे अलिय-पमुक्के सहाव-संतुट्ठे ।
तव-धम्म-णियम-मइए विसमा वि दसा समा होइ।।4।।

सीलं वरं कुलाओ, दालिद्दं भव्वयं च रोगाओ ।
विज्जा रज्जाउ वरं, खमा वरं सुट्ठु वि तवाओ ।।5।।

सीलं वरं कुलाओ, कुलेण किं होइ विगय-सीलेण ।
कमलाइ कद्दमे संभवंति न हु हुंति मलिणाइं ।।6।।

जं जि खमेइ समत्थो, धणवंतो जं न गव्वं उव्वहइ ।
जं च सविज्जो नमिरो तिसु तेसु अलंकिया पुहवी ।।7।।

छंदं जो अणुवट्टइ मम्मं रक्खइ गुणे पयासेइ ।
सो नवरि माणुसाणं देवाणं वि वल्लहो होइ ।।8।।

छण-वंचणेण वरिसो नासइ, दिवसो कुभोयणे भुत्ते।
कुकलत्तेण य जम्मो नासइ धम्मो अधम्मेण ।।9।।

छन्नं धम्मं, पयडं च पोरिसं परकलत्त-वंचणं।
गंजण-रहिओ जम्मो राढाइत्ताणं संपडइ ।।10।।

**(वज्जालग्गं- 'नीइवज्जा')**

## शब्दार्थ

**अणुवट्टइ** - आचरण करणे, वागणे
**अप्पहिय** - स्वत:चे हित
**अलिय** - खोटे
**असंतेहि** - नसलेलेही
**कद्दम** - चिखल
**कलत्त** - पत्नी
**खमा** - क्षमा
**छण** - सण, उत्सव
**छन्नं** - झाकून, गुप्तपणे
**छंदं** - इच्छेप्रमाणे
**जाया** - जन्म होणे

**दूमय** - दु:ख देणे
**पयासेइ** - प्रकटपणे
**पुहवी** - पृथ्वी
**पोरिस** - पौरुष, पुरुषार्थ
**भुत्ते** - खाणे
**विगयसील** - शीलभ्रष्ट
**सक्कय** - शक्य होणे
**संतेहि** - असणे, असणारे
**समिद्ध** - समृद्ध
**सुट्ठु** - चांगले, उत्तम
**वंचणेण** - रहित, नसणे

## कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) दुसऱ्यांचे दोष प्रकट केल्याने कोणते परिणाम होतात?

2) स्वत:चे हित केंव्हा करावे?

3) श्रेष्ठ आचरण कोणते?

4) पृथ्वीला शोभा कशामुळे प्राप्त होते?

5) मनुष्य कोणत्या गुणामुळे सर्वांना प्रिय होतो?

**2 वर्णविषयक बदल स्पष्ट करा.**

| | |
|---|---|
| 1) खमा | 4) संतुट्ठ |
| 2) कण्ण | 5) वल्लभ |
| 3) सच्च | 6) पुहवी |

**3 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

1) कमलाइं कद्दमे संभवंति न हु हुंति मलिणाइ।

2) विज्जा रज्जाउ वरं, खमा वरं सुट्ठु वि तवाओ।

**4 खालील सुभाषितांच्या ओळी पूर्ण करा.**

1) संतेहि असंतेहि य परस्स किं जंपिएहिं .......। (दोसेहिं, पुहवी)

2) सीलं वरं कुलाओ दालिद्दं भव्वयं च ........। (रोगाओ, तवाओ)

3) अप्प-हिय-पर-हियाणं अप्प-हियं चेव .......। (कायव्वं, पढेव्वं)

4) विज्जा रज्जाउ वरं, खमा वरं सुट्ठु वि .......। (तवाओ, धम्माओ)

**5 आकृती पूर्ण करा.**

1)

ग्रंथ — नीइवज्जा — ग्रंथकार

2)

| | |
|---|---|
| राज्यापेक्षा श्रेष्ठ → | |
| कुलीन घराण्यापेक्षा श्रेष्ठ → | |
| तपश्चर्येपेक्षा श्रेष्ठ → | |

**6 खालील शब्दांसाठी कवितेतील शब्द शोधा.**

1) तप → [ ]  3) राज्य → [ ]

2) क्षमा → [ ]  4) विद्या → [ ]

**7 उपक्रम :- 'नैतिक मूल्ये' या विषयावर अर्धमागधी-प्राकृतमध्ये 10-12 ओळींपर्यंत निबंध लिहा.**

# 4. पुत्ताण-परिक्खा



'पुत्ताण-परिक्खा' हा पद्यपाठ अंबदेवसूरींनी लिहिलेल्या 'आख्यानकमणिकोशवृत्ति' या प्राकृत ग्रंथातून घेतलेला आहे. विविध गुणाने युक्त व्यक्ती जेथे जाईल तेथे पूजनीय होते. शिवाय समाजाकडून त्यांचा आदरही केला जातो.

श्रेष्ठपदासाठी योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी आजही विविध प्रकारे परीक्षा घेतल्या जात असलेल्या दिसून येतात. प्राचीन काळीही प्रसेनजित राजाने आपल्या राजकुमारांची धैर्याची, साहसाची, उदारतेची, बुद्धिमत्तेची परीक्षा कशी घेतली ते या कवितेत स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणे वर्तमानकाळातील पालकांनीही आपल्या मुलांची परीक्षा घेऊनच कुटुंबाची जबाबदारी सोपवावी. अन्यथा कुटुंबातील सर्वांना दुःख, कष्ट सहन करावे लागते. तेव्हा या कवितेतील श्रेणिक कुमाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मुलांनी आचरण करावे असे या कवितेतून स्पष्ट केलेले आहे.

अह अन्नया कयाई पच्छिमम्मि जामम्मि।
सुह-संबुद्धो चिंतिउं आरद्धो नरवई एवं ।।1।।

मज्झ कुमराण मज्झे होही को धर-धुरा-धरण-धीरो ।
सेसो व महाभोगो चूडामणि-रंजिय-सिरग्गो ।।2।।

इय चिंतिऊण सिंधुर-तुरंग-आउज्ज-रह-वर-आइण्णं।
पज्जालावइ सयलं चउद्दिसिं जिण्ण-साल-गिहं।।3।।

तं नियवि जलण-जाला-करालियं भणइ भूवई कुमरे ।
'रे रे ! जो जं गिण्हह दिन्नं तं तस्स सव्वं पि' ।।4।।

रायाएसं निसुणिउं तडयड-फुट्टंत-वंस-संदोहे।
कड्ढंति पलित्ते पविसिऊण कुमरा गइंदाई ।।5।।

जाला-जडाल-जलणाओ कड्ढिओ केण वि तुरंगो ।
केण वि करिंदो कड्ढिओ, केण वि रहवरो रायकुमरेण ।।6।।

सेणिय-कुमरेण पुणो पविसिय पजलंत-मंदिरस्संतो ।
गहिया भिंभऽभिहाणा दक्खेण झडत्ति जयढक्का ।।7।।

तं दट्ठूण नरिंदेण चिंतियं, 'सेणिएण साहु कयं।
पढमं इणं रज्जंगं संगहिया जेण जयढक्का ।।8।।

अह अन्नया परक्कम-चाय-परिक्खण-कए कुमाराण ।
कारविय परमन्नं भोएइ निवो नियकुमारे ।।9।।

परमन्नं परिवेसिय निवेण लिलिक्किओ सुणय-वग्गो ।
सम्मुहं आगच्छंतं तं नियवि पलाइया इयरे (कुमारा) ।।10।।

सेणियकुमरो इयराणं उभय-पास-ट्ठिए गहिय-थाले।
सुणयाण खिवइ जमेइ अप्पणा भय-विमुक्क-मणो ।।11।।

तव्वइयरं अवलोइय चिंतेइ पमोइओ पुहइपालो ।
एसो उदारवीरो' त्ति कायरा इयर-कुमरा मे ।।12।।

अवर समयम्मि राया बुद्धि-परिक्खण-कए कुमाराण।
मुद्देइ गणिय-लड्डुय-करंडए सलिल-कलसे य ।।13।।

हक्कारिउं तओ ते भणइ, 'वच्छ! सबुद्धि-विहवेण।
मुद्दं अभंजिय भुंजेह मोयगे, पियह सलिलं पि' ।।14।।

एवं वुत्ता निय-बुद्धि-गव्विया वि य उवायं अलभंता।
ते छुह-पिवास-सोसिय-गत्ता दीणत्तं अणुपत्ता।।15।।

सेणिय-कुमरेण पुणो घेत्तुं पगलंत-कलस-बिंदु-जलं।
धुणिउं करंडए मोयगाण चूरीए भोयविया ।।16।।

तयणंतरं कुमारे विविह-विणोय-प्पसंग-अवक्खित्ते।
पासित्तु नरवरिंदो वाहरिउं पुच्छइ एवं ।।17।।

मुद्दा अभंग काऊण मोयगा भक्खिया कह-कहेह।
एवं वुत्ता राएणं कुमरे कहेह जहवत्तं वुत्तंतं।।18।।

जह भिंभसार-कुमरेण भोइया नियय बुद्धीए।
राया चिंतेइ जहा 'जुत्तो एसो रज्जाहि' सेयस्स।।19।।

रज्ज-समयम्मि नियमा इमस्स काहामि अहिसेयं।
चिंतिऊण उवायं करेइ तस्स रक्खणकए ।।20।।

**(अंबदेवसूरी – 'आख्यानकमणिकोशवृत्ति' गाथा नं 23 ते 48)**

## शब्दार्थ

**संबुद्ध** – जागृत होणे
**जिण्ण** – जीर्ण
**करिंदो** – श्रेष्ठ हत्ती
**धरण** – धारण करणारा
**सेसा** – बाकीचे
**पलित्तं** – जळत असलेले
**जलण-जाला** – जळणाऱ्या ज्वाला
**जयढक्का** – विजय डंका, एक वाद्य
**लिलिक्किओ** – चुचकारणे
**अवक्खित्ते** – आकर्षित करणे
**अहिसेय** – अभिषेक
**धर-धुरा-धरण-धीर** – जबाबदारी सांभाळण्यास समर्थ
**सिंधुर** – हत्ती
**आरद्धो** – आरंभ, प्रारंभ
**आउज्ज** – वाद्य
**पच्छिमम्मि** – शेवटी
**पज्जालावइ** – प्रज्वलित करणे
**गइंदाई** – हत्ती इ.
**तुरंग** – घोडा
**सलिल** – पाणी
**सुणयाण** – कुत्र्यांचा
**मोयग** – लाडू
**वंस** – बांबू

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) प्रसेनजित राजाने राजकुमारांची परीक्षा घेण्याचे का ठरविले?

2) प्रसेनजित राजाने जीर्ण आयुधशाळा का जाळली?

3) श्रेणिक कुमारास 'भिंभसार' या नावाने का संबोधले जाऊ लागले?

4) राज्याभिषेकास कोण, कसे पात्र ठरले?

## 2 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) रे रे! जो जं गिण्हइ दिन्नं तं तस्स सव्वं पि।

2) वच्छा, सबुद्धि-विहवेण, मुद्दं अभंजिय भुंजेह मोयगे पियह सलिलं पि ।

3) भिंभसार कुमरेण भोइया नियय-बुद्धिए ।

## 3 कोण ते लिहा.

1) जयडंका बाहेर काढणारा — 

2) जीर्ण आयुधशाळा पेटवणारा — 

3) राजकुमारांची परीक्षा घेणारा — 

4) 'भिंभसार' नावाने संबोधला जाणारा — 

## 4 आकृती पूर्ण करा.

1)




2)





## 5 वर्णविषयक बदल स्पष्ट करा.

1) परिक्खा 3) मुद्दा

2) परक्कम 4) जिण्ण

# 5. कूड-नीई





‘ कूटनीती’ ही एक मानवी बुद्धिचातुर्याचे श्रेष्ठत्व स्पष्ट करणारे आचरण मानले जाते. जेंव्हा एखादा शत्रू किंवा विरोधक बलशालीअसेल तेव्हा कूट-नीतीचा उपयोग करून शत्रूवर किंवा विरोधकावर मात केली जाते. या कूटनीतीचा उपयोग प्राचीन  काळापासून भारतात केला जात असलेला दिसून येतो. या कूटनीतीलाच ‘गनिमी कावा’ या नावानेही ओळखले जाते. या कूटनीतीचा, गनिमीकाव्याचा उपयोग करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या शत्रूवर मात केलेली दिसून येते.

या कूटनीतीविषयी आर्य-चाणक्यांनी विस्तृतपणे ग्रंथरचनाही केलेली आढळून येते. या कूटनीतीमध्ये केवळ पुरुषांचाच समावेश नव्हता तर स्त्रियाही कूटनीतीमध्ये निपुण होत्या. त्याची अनेक उदाहरणे प्राकृत साहित्यात आढळून येतात.

सदर पाठामध्ये अभयकुमार आणि गणिका आपल्या बुद्धिचातुर्याच्या प्रभावाने कूटनीतीचा उपयोग करून बलाढ्य प्रद्योत राजास युद्धभूमीतून कसे पळवून लावतो. ते स्पष्ट केलेले आहे.

विद्यार्थ्यांनीही अभयकुमाराची प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात यश प्राप्त करावे असे या पाठातून स्पष्ट केले आहे.

सदर पाठ अंबदेवसूरींनी लिहिलेल्या ‘आवश्यकसूत्रटीका’ ग्रंथामधून घेतला आहे.

एत्तो वि हु अणुवरिसं रोहइ रोसेण रायगिह-नयरं ।
निय-बल-गव्विय-चित्तो सु-पयंडो चंडपज्जोओ ।।1।।

तो सेणिएण भणिओ अभय-मंती किं पि चिंतसु उवायं ।
नयरस्स जेण खेमं संजायइ तयणु अभएण ।।2।।

पुर-परिसर-पुहईए तेण निहाणी-कया कणय-कलसा ।
समयं मुसंढि-मोग्गर-तोमर-झस-निसीय-सत्थेहिं।।3।।

पुण्णरवि कम्मि वि वरिसे पुव्व-पओगेण रोहियं नयरं ।
तो अभएण भणिओ 'सामंता तुज्झ सव्वे वि ।।4।।

मह पिउणा धण-दाणेण भेइया जइ न पच्चओ तुज्झ।
ता परिसर-धरणिवीढं खणिउं निस्संकियं कुणसु' ।।5।।

तो तत्थ चंडपज्जोय-नरवइ जा खणावए खोणिं ।
ता नियइ कणय-कलसे निसाय-धण-पहरण-गणे य ।।6।।

पेच्छिय अतुच्छ-उच्छलिय-कंप-परिगलिय-सेय-सलिलोहो ।
निय-खंधवार-विरइय-सरक्खणो नासिऊण गओ ।।7।।

नासंतस्स असेसं पि लूडियं सेणिएण तस्स बलं ।
जीवंतो उज्जेणिं पत्तो किच्छेण पुण राया ।।8।।

हक्केइ निए ते वि हु भणंति एयस्स कारणो न वयं।
ता देव एत्थ अत्थे अभय-पवंचेण होयव्वं ।।9।।

अवगय-सब्भावो भणइ, 'नत्थि सो कोइ मज्झ अत्थाणे ।
जो कूड-कवड-बुद्धिं बंधिय आणेइ इह अभयं' ।।10।।

तं निसुणिऊण विन्नवइ, 'नरवइं चमर-हारिणी गणिया ।
आइससु देव, मं झत्ति जेण बंधिऊण तं आणेमि हं ।।11।।

तो नरवइणा मज्झिम-वयाओ इयराओ सत्त-गणियाओ ।
तीए सह थविर-परियण-पायाओ पेसियाओ लहुं ।।12।।

तत्तो समुणि-सयासम्मि सिक्खिउं सव्वमेव गिहधम्मं।
पत्ता परिपूयंती तित्थाणि कमेण रायगिहं ।।13।।

तत्थ पूयंती गिहपडिमा संपत्ता अभयस्स भवणम्मि ।
आगयाओ पुच्छइ अभएणं, 'इह कओ तुब्भे' ।।14।।

मज्झिम-वयाण मज्झाओ तस्स एगा कहेउं आढत्ता ।
निसुणसु सावय, एईए भव-विरत्ताए सुह-चरियं ।।15।।

उज्जेणीए इब्भस्स भारिया तस्स आसि मण-इट्ठा ।
पुव्व-कय-कम्म-परिणइ-वसेण विहवत्तं अणुपत्ता ।।16।।

भव-उव्विग्गा काऊण तित्थ-जत्ताओ निय-नयरिं।
गंतूणं पव्वज्जं घेत्तुं करेइ तव-च्चरणं ।।17।।

बीय-दिणे अभओ गंतूण ताओ आमंतए सगिहे ।
भणिओ य ताहिं, तुमं चिय कुण एत्थ भोयणं।।18।।

सम्मोह-कारि-बहु-विह-वत्थु-जुयं पाइओ पयं ताहि ।
तेण पसुत्तो संतो अवहरिओ रहवरेण अभओ ।।19।।

नीओ उज्जेणीए तीए निय-राय-पाय-पासम्मि ।
पक्खित्तो य नरिंदेण तयणु बोल्लाविओ एवं ।।20।।

'रे कत्थ गया बुद्धी महिला-मेत्तेण जं इह-आणिया ।
धम्म-च्छलेण छलिओ पावाए इमाए सो भणइ ।।21।।

इय भणिए नरणाहेण नियलिओ तह स-वयण-नियलेहिं।
जह न अमुक्को सक्कइ निय-नयरे गंतुं एत्तो य ।।22।।

**(अंबूदेवसूरि-विरइय ''आख्यानकमणिकोशवृत्ति' गाथा 183-210)**

## शब्दार्थ

**अणुवरिसं** - प्रत्येक वर्षी
**असेसं** - बाकीचे, राहिलेले
**अवगय** - अवगत, जाणीव होणे
**आइससु** - आदेश देणे
**अणुपत्ता** - प्राप्त होणे
**अत्थाण** - राजदरबार

**भव** - संसार, जन्म
**भुत्त** - भोजन करणे
**मुसंढि** - एक प्रकारचे शस्त्र
**मोग्गर** - एक प्रकारचे शस्त्र
**सुपयंड** - अत्यंत, प्रचंड, भयंकर
**सावय** - श्रावक

**उव्विग्ग** – वैराग्य, उद्‌विग्न होणे
**तित्थजत्ता** – तीर्थयात्रा
**धम्मच्छल** – धर्माच्या नावाने फसवणूक
**पाइओ** – पाजणे, पिण्यास देणे
**पायाओ** – पायी, पायदळ
**सक्कइ** – शक्य
**नियलिय** – बंदिस्त करणे
**पयं** – दूध
**समयं** – एकत्र, समूह

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) अभयकुमाराने प्रद्योत राजाचा पराभव कसा केला?
2) गणिकेने अभयकुमाराचे अपहरण कसे केले?
3) अभयकुमाराच्या बुद्धिचातुर्यावर परिच्छेद लिहा.

**2 कोण ते लिहा.**

1) दरवर्षी राजगृह नगरावर आक्रमण करणारा — [ ]
2) धर्माच्या बहाण्याने अभयकुमारास फसविणारी — [ ]
3) श्राविकांना घरी भोजनासाठी आमंत्रण देणारा — [ ]

**2) आकृती पूर्ण करा.**

ग्रंथ — कूड-नीइ — ग्रंथकार

**3 समानार्थी शब्द लिहा.**

1) राया — [ ]
2) महिला — [ ]
3) पय — [ ]
4) धण — [ ]


**4 रूपे ओळखा.**

1) खणिउं 2) पलिऊण 3) चिंतसु 4) भणंति 5) गंतूणं 6) काऊण

**5 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

1) 'तुमं चिय कुण एत्थ भोयणं ।'
2) 'रे! कत्थ गया बुद्धी महिला-मेत्तेण जं इह-आणिया ।'
3) 'धम्म-च्छलेण पावाए इमाए ।'

# 6. किसिवालस्स जीवणं



वर्तमानकालीन शेतकऱ्यांचे जीवन दिवसेंदिवस संकटग्रस्त आणि दु:खदायक होत आहे. शेती व्यवसाय न परवडणारा होत आहे. त्यामुळे निराश झालेला शेतकरी आत्महत्येकडे वळत आहे हे अत्यंत दु:खदायक आहे.

प्राकृत साहित्यातील शेतकरी मात्र संकटास न घाबरता मोठ्या धैर्याने संकटावर मात करत असलेला दिसून येतो,परंतु आत्महत्येचा अवलंब करत नाही. उलट जमीन कितीही कठीण, खडबडीत असली तरीही नांगर धरणाऱ्याच्या हातात शक्ती असेल तर खडबडीत जमीनही सुपीक होते. या विचारांचेच शेतकरी गाथासप्तशती ग्रंथात आढळतात, परंतु आत्महत्या केल्याचे एकही उदाहरण दिसत नाही.

तेव्हा आजच्या शेतकऱ्याने गाथा सप्तशतीमधील शेतकऱ्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून धैर्याने शेती केल्यास नैराश्य येणार नाही. तसेच आत्महत्या केल्याने संकट तर टळत नाही उलट ते वाढते. हे लक्षात घेऊन शेतकऱ्याने आत्महत्येचा मार्ग सोडून धैर्याने शेती करावी असा या पाठाचा उद्देश आहे. सदर गाथा ह्या हालकवींनी लिहिलेल्या 'गाथासप्तशती' या प्राकृत ग्रंथातून घेतल्या आहेत.

1. पंक-मइलेण, छीरेक्क-पाइणा दिण्ण-जाणु-वडणेण ।  
   आणंदिज्जइ हलिओ पुत्तेण व्व सालि-छेत्तेण ।।567।।

2. फलही-वाहणं पुण्णाह-मंगलं लंगले कुणंतीए ।  
   सईअ मणोरह-गब्भिणीअ हत्था थरहरन्ति ।।165।।

3. कढिण-खरवीर-पेल्लण-हल व्व पत्थर-विणिग्गय-अग्गिकणे  
   धचलो-आयरिय-पहे कस्स वि सुहेण वच्चंति ।।795।।

4. तह परिमलिया गोवेण तेण हत्थं पि जा ण ओल्लेइ।  
   सा च्चिअ धेणू एण्हिं पेच्छसु! कूड-दोहिणी जाआ ।।637।।

5. धवलो जिअइ तुह कए, धवलस्स कए जिअन्ति गिट्ठीओ।
जिअ तंबे! अम्ह वि जीविएण गोट्ठं तुमाअत्तं ।।638।।

6. एत्थ मए रमिअव्वं कुटुंब-समं चिंतिऊण हियएण।
पामर-कर-सेअ-उल्ला णिवअइ तुवरी वविज्जन्ति ।।358।।

7. अप्पत्तं पत्तअं पाविऊण णव-रंगअं हलिअ-सोण्हा ।
उअह! तणुई ण माअइ रुंदासु वि गाम-रच्छासु ।।241।।

8. पेम्म-उम्मइयाइ मए उवऊढो हलिअ-पुत्त-बुद्धीए।
फंसेमि जाव, फरुसो तण-पुरिसो गाम-सीमाए ।।745।।

9. णव-कम्मिएण उअ-पामरेण दट्ठूण पाउ-हारीओ ।
मोत्तव्वे जोत्तअ-पग्गहम्मि अवहासिणी मुक्का ।।692।।

10. अलिहिज्जइ पंकअले हलालि-चलणेण कलम-गोवीए ।
केआर-सोअ-रूंभण-तंस-ट्ठिअ कोमल-चलणो ।।690।।

11. अंतोहुत्तं डज्झइ, जाआ-सुण्ण-घरे हलिय-पुत्तो ।
उक्खाअ-णिहाणाइं व्व रमिअ-ट्ठाणाइं पेच्छंतो ।।373।।

12. णिक्कम्माहिं वि छेत्ताहिं पामरो णेअ वच्चइ वसइं।
मअ-पिअ-जाआ-सुण्णइअ-गेह-दुक्खं परिहरन्तो ।।169।।

13. गहवइणा मुअ-सेरह-डुंडअ-दामं चिर वहेऊण।
वग्ग-सआइं णेऊण णवरिअ अज्जाघरे बद्धं।।172।।

14. सुह-पुच्छिआइ हलिओ मुह-पंकअ-सुरहि-पवण-णिव्वविअं।
तह पिअइ पअइ-कडुअं पि ओसहं जह ण णिट्ठाइ ।।317।।

15. किं रुअसि ओणअ-मुही धवलाअन्तेसु सालि-छित्तेसु।
हरिआल-मंडित-मुही णडि व्व सण-वाडिआ जाया ।।9।।

16. गाईउ पंच-खीरं भरिउ, चत्तारि पक्कल-बइल्ला ।
संपण्णं वालावल्ल-रअं, सेवा सिवं कुणउ ।।806।।

**पंक-मइलेण** – चिखलाने माखलेले.
**हलिओ** – शेतकऱ्यास.
**छीरेक्क-पाइण्ण** – चिखलाने माखलेले.
**सालि-छेत्तेण** – साळीचे शेत.
**जाणु** – गुडघा,
**आणंदिज्जइ** – आनंद देणे.
**वडणेण** – वाढलेले.
**फलही-वाहणं** – पेरणी करण्याचे साधन.
**लंगले** – नांगर.
**सईअ** – सती, पत्नी, स्त्री.
**गब्भिणीअ** – मनात. हृदयात असणे.
**कढिण** – कठीण.
**खरवीर** – खडबडीत.
**पेल्लण** – पेलने. सांभाळणे
**अग्गिकणे** – अग्निच्या ठिणग्या.
**धचले** – धैर्य नसलेले, दुबळे.
**पहे** – मार्ग.
**वच्चंति** – जाणे .
**परिमलिया** – हाताळणे, धार काढणे.
**गोवेण** – गवळ्याने.
**ओल्लेइ** – ओले होणे.
**एण्हिं** – आता.
**कूड** – कौशल्य, चातुर्य.
**दोहिणी** – द्रावविणे, हाताळणे, पाना घालणे.
**जाआ** – होणे, झाले, देणे.
**जिअइ** – जगते.
**कए** – करिता.
**तंबे** – तांबडी, तांबी.
**गोट्ठ** – गोठा.
**तुमाअत्तं** – आमच्यासाठी.
**मए** – मी.
**हिअएण** – मनात, मनाने.
**पामर** – गरीब शेतकरी.
**कर** – हात.
**सेय** – घाम.
**उल्ला** – ओले.
**णिवअइ** – पेरणे.
**वविज्जन्ति** – वाढल्यानंतर.
**अप्पत्तं** – न मिळणारे.
**पत्तअं** – मिळणे.
**सोण्हा** – सून.
**उअह** – पहा.
**तणुई** – कृश, सडपातळ.
**रच्छासु** – रस्त्यात.
**उम्मइयाए** – उन्माद, उत्कट, आतूर.
**उवऊढो** – वाढणे, निर्माण होणे.
**बुद्धीए** – विचाराने.
**फंसेमि** – स्पर्शाने.
**जाव** – जेव्हा.
**फरुसो** – कठीण.
**तणपुरिसो** – गवताने तयार केलेले बुजगावणे (पुरुष).
**कम्मिएण** – कर्म करणाऱ्याने.
**पामरेण** – गरीब, बिचाऱ्याने.
**उअ** – पहा.
**पाउ-हारीओ**– शिदोरी, भोजन, आणणाऱ्या पत्नीस.
**मोत्तव्वे** – सोडणे, मोकळे करणे.
**जोत्तअ** – जू.
**पग्गहम्मि** – घेणे, दोरी.
**अवहासिणी** – वेसण.
**मुक्का** – सोडणे, मुक्त करणे.
**आलिहज्जिइ** – लिहिलेले, ठसे, पाऊलखुणा.
**हलालि** – नांगरणे.
**कलम-गोवीए** – राखण करणारी स्त्री.
**केआर-सोआ**– जोराचा प्रवाह स्त्रोत.
**रुंभण** – अडथळा.
**तंस** – त्रस्त होणे, वक्र होणे.
**अंतोहुत्तं** – मनात.
**डज्झइ** – जळणे.

**जाआ** – पत्नी.
**उक्खाअ** – उखडून टाकणे.
**णिहाणाइं** – पुरलेली संपत्ती.
व्व– प्रमाणे, समान.
**णि–कम्माहिं** – काम नसतानाही.
**णेअ** – नसणे.
**मअ** – मरणे, मृत होणे.
**परिहरन्तो** – कमी होणे, नष्ट होणे.
**गहवइणा** – गृहपती, मालक.
**मुअ** – मृत, मेलेल्या.
**सेरह** – रेड्याचे.
**डुंडअ–दामं** – घुंगरांची माळ.
**चिर** – चिरकाळ.
**वहेऊण** – वाहून.
**वग्ग** – समूह.
**खीर** – दूध.
**पक्कल** – पक्व, प्रौढ, तरुण, पुष्ट.
**संपण्ण** – समृद्ध, सुपीक.
**इअ** – माती.
**सिवं** – आकर्षण
**पुच्छिआइ** – विचारपूस. चौकशी करण्यासाठी.
**पंकअ** – कमळ.
**सुरहि** – सुगंधित,
**पवण** – वाऱ्याने.
**णिव्वविअं** – थंड केलेले.
**पिअइ** – पिणे.
**पअइ** – स्वभाव, मुळातच.
**णिट्ठाइ** – न ठेवणे, संपविणे.
**ओणअ** – खाली.
**सण** – तागाचे.
**धवला–अन्तेसु** – पांढरे झालेले.
**मंडिय** – लावले, विभूषित झालेले.
**णडि**–नटी,
**वाडिआ** – वाढलेले.
**सआइं** – शेकडो.
**णेऊण** – नेऊन.
**णवरिअ** – योग्य न वाटल्याने.
**अज्जाघरे** – आर्याघर, देवतेच्या देवळात.
**बद्धं** – बांधणे.
**सुह** – सुखाची.

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) शेतकऱ्यास शेतातील पीक कोणाप्रमाणे वाटते?
2) बलवानांनी अवलंबलेल्या मार्गाचा कोणाला लाभ होतो?
3) गवळ्याच्या कौशल्याचा परिणाम कोणता होतो?
4) नवीन वस्त्र प्राप्त झालेल्या शेतकऱ्याच्या सुनेवर कोणता परिणाम झाला?
5) नववधूस पाहून गोंधळलेल्या शेतकऱ्याच्या मुलाने काय केले?
6) पत्नीच्या निधनाने, (दु:खाने) दग्ध झालेला शेतकरी आपले दु:ख कसे कमी करतो?
7) प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आलेल्या शेजारच्या स्त्रीचा शेतकऱ्यावर कोणता परिणाम झाला?
8) सामान्य माणसांना कोणत्या गोष्टींचे आकर्षण असते?

## 2 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

1) पत्नीच्या निधनाने व्याकूळ झालेल्या शेतकऱ्याची अवस्था स्पष्ट करा.

2) शेतकऱ्याचे शेतावरील प्रेम स्पष्ट करा.

3) कुशल व बलवान शेतकऱ्याचे वर्णन करा.

## 3 खालील शब्दांना प्राकृतातील शब्द सांगा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1) | नांगर — | | 5) | शेतकरी — | |
| 2) | गवळी — | | 6) | आत — | |
| 3) | दूध — | | 7) | पत्नी — | |
| 4) | सून — | | | | |

## 4 रूपे ओळखा.

1) पेच्छंतो
4) वच्चइ
2) ओसहं
5) छेत्तेसु
3) पामरेण

## 5 वर्णबदल स्पष्ट करा.

1) छेत्त
4) कम्म
2) गोव
5) मुक्का
3) अप्पत्त
6) सुरहि

# परिसिट्ठं

(अ) व्याकरण विभाग

(ब) लेहण-कोसल्लं

(क) सट्टय-परिचयं



# (अ) व्याकरण विभाग



व्याकरण हे प्रत्येक भाषेचा प्राण आहे. म्हणून व्याकरण समजून घेतल्याने भाषेमध्ये कसे परिवर्तन होत जाते किंवा भाषेचे तुलनात्मक अध्ययन करण्यास कशी मदत होते हे समजते.

कोणत्याही भाषेचे अध्ययन करण्यासाठी त्या व्यक्तीस कमीत कमी एका भाषेचे तर ज्ञान असणे आवश्यक असते.

प्राकृत भाषा ही संस्कृत भाषेप्रमाणे एक प्राचीन भारतीय भाषा आहे. म्हणजे या दोन्ही भाषा समकालीन भाषा होत. त्यामुळे या दोन्ही भाषांचा उपयोग नाट्य साहित्यात झालेला दिसून येतो. त्यातूनच या दोन्ही भाषांच्या तुलनात्मक अध्ययनास प्रारंभ होऊन प्राकृत व्याकरण ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. प्रारंभीचे जे प्राकृत भाषेच्या व्याकरणाचे ग्रंथ निर्माण झाले त्यामध्ये प्राकृत भाषेच्या विद्वानांपेक्षाही संस्कृत भाषेच्या विद्वानांचे मोठे योगदान असलेले दिसून येते. त्यामुळेच संस्कृत भाषेशी तुलना करत करत प्राकृत व्याकरण ग्रंथाची रचना झालेली दिसून येते. त्यामुळे प्राकृत भाषेचे व्याकरण समजून घेण्यासाठी संस्कृत भाषेची मदत होते.

व्याकरण समजल्याने त्या-त्या भाषेत वाक्यरचना करणे किंवा संभाषण करण्यास मदत होते. वाक्यरचना करण्यासाठी सर्वनामे, काळ, अर्थ, विभक्ती प्रत्यय, शब्दसंग्रह, प्रयोग इ. चे ज्ञान असणे आवश्यक आहे. तर संधी, समासाच्या ज्ञानाने मोठमोठ्या वाक्यांचे लहान-लहान वाक्यांत रूपांतर करता येते. त्यामुळे वाक्यरचना सुलभ होण्यास मदत होते. म्हणून व्याकरणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या पाठ्यपुस्तकात प्राकृतातील वर्णबदल कसे होतात ते दिलेले आहेत.

प्रारंभी प्राकृत भाषेतील वर्णांचा परिचय दिलेला आहे. त्यानंतर संस्कृत आणि मराठी भाषेतील वर्णाचा प्राकृतात कसा बदल होतो तेही स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर वर्तमान, भूत, भविष्यकाळाचे प्रत्यय, अर्थ, विभक्ती, सर्वनामे इ. चे प्रत्यय दिलेले आहेत. त्यांचा परिचय करून विद्यार्थी वाक्यरचना तसेच निबंध लेखन, संभाषण करण्याचा प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे.

**वर्णमाला –**

**स्वर –** (स्वतंत्रपणे उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे स्वर)

**ऱ्हस्व स्वर –** अ, इ, उ, ए, ओ


**दीर्घ स्वर –** आ, ई, ऊ, ऐ, औ

**टीप –**

संस्कृत वर्णमालेतील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ हे स्वर अर्धमागधी प्राकृतात नाहीत.

## (1) प्राकृत वर्णमाला

प्राकृत भाषा ही एक प्राचीन भाषा आहे. यामध्ये अर्धमागधी, मागधी, शौरसेनी, पैशाची, चूलिका-पैशाची, महाराष्ट्री, अपभ्रंश इत्यादी १८ विविध बोलीभाषांचा समावेश होतो. या भाषेच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय संस्कृतीचे, समाजाचे, बोलीभाषांचे तसेच राजकीय घडामोडींचेही दर्शन होण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर आधुनिक भारतीय भाषा कसकशा विकसित होत गेल्या याचाही परिचय होण्यास मदत होते. म्हणून प्राकृत भाषेतील वर्णमालांचा विद्यार्थ्यांना प्रथम परिचय व्हावा या अपेक्षेने प्राकृत भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे दिलेली आहे.




## 1. प्राकृत भाषेतील स्वर

1. प्राकृत भाषेत अ, आ, इ. ई, उ, ऊ, ए, ओ एवढेच स्वर आहेत.
2. ऐ, औ, अः, ऋ, ॠ, लृ, लॄ हे संस्कृतातील स्वर उच्चारण्यास सुलभ व्हावेत म्हणून काही बदल करून ते प्राकृत भाषेत आलेले दिसतात.
3. स्वरांची ऱ्हस्व, दीर्घ आणि सजाती – विजाती स्वर अशी विभागणी केलेली दिसून येते.
4. अ, इ, उ, ए, ओ या स्वरास ऱ्हस्व स्वर म्हणतात तर आ, ई, ऊ (ऐ, औ) यांना दीर्घ स्वर म्हणतात.
5. अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ह्या जोड्या सजातीय (समान) स्वरांच्या आहेत, तर अ, इ, उ इत्यादी स्वरांना विजातीय (वेगळ्या प्रकारचे) स्वर म्हणतात.
6. ऐ, औ, अः ऋ, लृ हे स्वर प्राकृतात नसले तरी त्याचे सुलभीकरण करून ते प्राकृतात पुढीलप्रमाणे आलेले दिसून येतात.

## (अ) स्वरांचे बदल

**1) ऐ – ए, अइ असा बदल होतो.**

कैलास = केलास, कइलास
वैकुंठ = वेकुंठ (वेगुंठ), वइकुंठ
वैरी = वेरि, वइरी
कैकयी = केगइ, कइकयी
मैत्री = मेत्ती, मइत्ती
सैन्य = सेन्न, सइन्न, सेना
दैव = देव, दइव

**2) औ = ओ, अउ होतो.**

गौरी = गोरी, गउरी
गौतम = गोयम
कौशांबी = कोसंबी, कउसंबी
नौ = नोव, नउ
गौड = गोड, गउड
कौतुक = कोउय, कउउय
नौका = नोका, नउका
गौरव = गोरव, गउरव
यौवन = जोवण्णं
औषध = ओसह, अउसह
पौर = पोर, पउर
कौमुदी = कोमुई, कउमुई

**3) आ, ई, ऊ या आद्य स्वरांवर अनुस्वार आल्यास ऱ्हस्व होतो.**

पांसु = पंसु
वांछिय = वंछिय
मांस = मंस
पांडव = पंडव
पांडित्य = पंडिच्च
क्षांत = खंत

**4) आ, ई, ऊ या स्वरांपुढे जोडाक्षर आल्यास त्याचे ऱ्हस्वमध्ये परिवर्तन होते.**

धान्य = धन्न
भार्या = भज्जा
परीक्षा = परिक्खा
पूर्णिमा = पुण्णिमा
तीव्र = तिव्व
दीक्षा = दिक्खा
पूर्व = पुव्व
कीर्ति = कित्ति
राज्य = रज्ज

**5) प्राकृतमध्ये (अः) विसर्गाऐवजी 'ओ' चा उपयोग केला जातो.**

रामः = रामो
देवः = देवो
नृपः = निवो

**6) ऋ = अ, इ, उ, ए, रि होतो.**

**1) ऋ = अ**

मृत = मय
घृत = घय
मृदु = मउ
कृष्ण = कण्ह
कृत = कय
तृण = तण
मृत्यु = मच्चु
तृष्णा = तण्हा

2) **ऋ = इ**

| | | | |
|---|---|---|---|
| ऋषी = इसी | मृषा = मिसा | गृह = गिह | कृष्ण = किसन |
| मृग = मिग | दृढ = दिढ | नृप = निव | कृश = किस |

3) **ऋ = उ**

| | | | |
|---|---|---|---|
| ऋतु = उतु,उउ. | मृषा = मुसा. | वृद्ध = वुड्ढ | मातृ = माउ |
| प्रावृष = पाउस. | भ्रातृ = भाउ. | पितृ = पिउ | वृष्टि = वुट्ठि |

4) **ऋ = ए होतो.**

गृह = गेह

5) **ऋ = रि**

ऋण = रिण    ऋद्धि = रिद्धि    वृषभ = रिसह    ऋषि = रिसि

## (ब) प्राकृतातील व्यंजन

**व्यंजने (स्वरांच्या मदतीने उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे व्यंजन)**

**टीप –**

1) संस्कृतमधील 'ङ्' आणि 'ञ्' या व्यंजनाचा अर्धमागधीत उपयोग केला जात नाही. त्यांचे अनुस्वारात रूपांतर होते.

2) संस्कृतमधील विसर्ग अर्धमागधीत नाही. त्याऐवजी 'ओ' होतो.

3) अनुनासिकापुढे व्यंजन आल्यास त्याचा अनुस्वार करण्याची प्रथा आहे. उदा. वंक, संख, अंजलि, कंप पयंड

4) मराठी वर्णमालेतील ळ, क्ष, ज्ञ ही व्यंजने अर्धमागधीत नाहीत. तरीही त्यांचे रूपांतर होऊन ते प्राकृतात येतात.

**1) प्राकृतात 'श', 'ष' ऐवजी 'स' वापर केला जातो.**

| | | |
|---|---|---|
| शशी = ससी | शत = सय | भूषण = भूसण |
| कृषी = किसी | महिषी = महिसी | मूषक = मूसक, मूसय |

**2) प्राकृतात ळ, क्ष, ज्ञ ही व्यंजने उच्चारण्यास कठोर असल्याने त्यांच्याऐवजी 'ळ' = ल, क्ष = क्ख, च्छ, छ, ख आणि ज्ञ = ण चा वापर केला जातो.**

1) ळ = ल,    कमळ = कमल,    नळ = नल,    फळ = फल

2) ज्ञ = ण, ज्ञान = णाण, ज्ञात = णात,णाय, ज्ञानेश्वर = णाणेसर

3) क्ष = च्छ, क्ख वृक्ष = रूक्ख, रूच्छ वक्षस्थल = वच्छत्थल, वक्खत्थल
क्षीर = खीर क्षण = खण,

| उच्चार स्थान | वर्ग | व्यंजने |
|---|---|---|
| कंठ | क | क्, ख् ग्, घ्, ङ् |
| तालव्य | च | च्, छ्, ज्, झ्, ञ् |
| मूर्धन्य | ट | ट्, ठ्, ड्, ढ्, ण् |
| दन्त्य | त | त्, थ्, द्, ध्, न् |
| ओष्ठ | प | प्, फ्, ब्, भ्, म्, |
| (कंठ, तालव्य, मूर्धन्य, दंत) | अन्तस्थ | य्, र्, ल्, व् |
| | उष्म वर्ण | स् |
| | महाप्राण | ह् |

अ) 'क ते प' वर्गातील पहिल्या चार व्यंजनांना **स्पर्श व्यंजने** म्हणतात.

1) स्पर्श व्यंजने बलाने सर्वांत अधिक असतात.

2) त्यांच्या बलाचा क्रम उतरता आहे 'क्' हे सर्वांत लहान आणि 'भ्' हे सर्वांत बलवान आहे.

ब) 'ङ्, ञ्, ण्, न्, म्' या व्यंजनांचा उच्चार काही प्रमाणात नाकातून होतो. म्हणून त्यांना **अनुनासिके** म्हणतात.

1) अनुनासिके बलाने दुसऱ्या क्रमांकाची म्हणजे स्पर्श व्यंजनाहून कमी बलाची असतात.

क) 'य्, र्, ल्, व्' या व्यंजनांना **अन्त्य व्यंजने** म्हणतात.

1) प्रत्येक अन्त्यस्थ व्यंजनांचे उच्चार, स्थान भिन्न भिन्न असून सर्व **अन्त्यस्थ** व्यंजने बलाने तिसऱ्या क्रमांकाची म्हणजे बलाने सर्वांत कमी बलाची आहेत.

2) याच्यामध्ये 'व्, ल्, र्, य्'म्हणजे 'व्' सर्वांत बलवान आणि य् हे सर्वांत कमी बलाचे आहे.

ड) 'स्' हे **उष्म व्यंजन** आहे. याच्या उच्चारामध्ये इतर व्यंजनांच्या तुलनेने फुप्फुसातील हवा अधिक बाहेर पडते.शिवाय घर्षण प्रक्रियाही होते. म्हणून याला **उष्म वर्ण** म्हणतात. उष्म वर्ण बलाने कमी आहे. (तरीही अंतस्थ व्यंजनापेक्षा अधिक बलवान असल्याचे मानले आहे.)

ई) 'ह्' या व्यंजनांचा उच्चार करत असताना फुप्फुसातील हवा अधिक प्रमाणात बाहेर पडते म्हणून यास **महाप्राण** म्हटले जाते. (प्राण म्हणजे हवा) 'ह्' चे द्वित्व केव्हाच होत नाही.

## 1. असंयुक्त व्यंजनांचे बदल

व्यंजनांच्या बदलामध्ये प्रामुख्याने असंयुक्त आणि संयुक्त असे दोन प्रकार आहेत. त्यामध्येही आद्य, मध्य, अन्त्य असे विभाग दिसून येतात. आद्य म्हणजे अगोदरचे, अनाद्य म्हणजे अगोदर नसलेले (मध्य, अन्त्य, ठिकाणी असलेल्यांना अनाद्य असेही म्हटले जाते.)

1) शब्दांच्या आरंभी 'य' असेल तर प्राकृतात त्याचे 'ज' होते.

यात्रा = जत्ता यादव = जादव यथा = जहा

योगी = जोगी यमुना = जमुणा यम = जम

2) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'क' चे केव्हां 'ख' होते.

कीला = खीला कुब्जा = खुज्जा, खुजा कुळ = खुल कर्पर = खप्पर

3) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'प'चे केव्हा 'फ' होते.

पुरुष = फरुस परशु = फरसु परिखा = फलिहा परिघ = फरिह

4) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'य'चे केव्हा 'त' होते.

युष्मद = तुम्हे

5) शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'श' 'ष' 'स' चे केव्हा 'छ' होते.

शाव = छाव सुधा = छुहा षण्मुख = छम्मुह षष्ठ = छट्ठ

6) आद्य 'क्ष' चे केव्हा 'ख' होते.

क्षीर = खीर क्षण = खण क्षेत्र = खेत्त क्षत्रिय = खत्तिय

7) केव्हा केव्हा आद्य 'गृ' = घ होते

गृह = घर

8) केव्हा केव्हा ज = झ होते.

जटिल = झटिल, झडिल

9) केव्हा आद्य च = त होते.

चिकित्सक = तिगिच्छग

10) केव्हा केव्हा आद्य त = च, छ होते.

तुच्छ = चुच्छ, छुच्छ, त्याग = चय, छय

11) केव्हा केव्हा आद्य त = ट होतो.

तगर = टगर

12) केव्हा केव्हा आद्य द = ड होते.

दाह = डाह दह = डह दंश = डंस

13) केव्हा केव्हा आद्य न = ण होतो.

नदी = णई नर = णर नमो = णमो

नाम = णाम नारी = णारी नूणं = णूणं

1) **'य' श्रुती =** केव्हा केव्हा अनाद्य (मध्य अन्त्य) ठिकाणी असलेल्या क, ग, च, ज, त, द असंयुक्त व्यंजनांचा लोप करून 'अ, किंवा य लिहिले जाते. यालाच 'य' किंवा 'अ' श्रुती असे म्हणतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | क = य | कणक = कणय | उदक = उयय | शोक = सोय |
| | | जनक = जणय | नरक = नरय | नाक = नाय |
| | | सकल = सयल | लोक = लोय | काक = काय |
| 2) | ग = य | नगर = नयर | सागर = सायर | मृग = मिय |
| | | मगर = मयर | आगर = आयर | साग = साय |
| 3) | च = य | आचार = आयार | उपचार = उवयार | वचन = वयण |
| | | कवच = कवय | नीच = नीय | काच = काय |
| 4) | ज = य | सुजण = सुयण | गज = गय | पूजा = पूया |
| 5) | त = य | शीतल = सीयल | गीत = गीय | पिता = पिया |
| 6) | द = य | पाद = पाय | ह्रदय = हियय | वेद = वेय |

2) **‘ह’ –श्रुती** = ख, घ, थ, ध, फ, भ’ ही व्यंजने अनाद्य असंयुक्त ठिकाणी असतील तर त्या व्यंजनाचा लोप होऊन त्या ठिकाणी ‘ह’ लिहिले जाते. यालाच ‘ह’ श्रुती म्हटले जाते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | ख = ह | मेखला = मेहला | सुख = सुह | मुख = मुह |
| | | नख = नह | शाखा = साहा | सखी = सही |
| 2) | घ = ह | मेघ = मेह | राघव = राहव | लघु = लहु |
| | | संघ = संह | | |
| 3) | थ = ह | रथ = रह | नथ = नह | कथा = कहा |
| | | नाथ = नाह | यथा = जहा | |
| 4) | ध = ह | मधु = मह‍ु | मगध = मगह | बधिर = बहिर |
| | | मधुर = महुर | दधि = दहि | विधि = विहि |
| 5) | फ = ह | विफल = विहल | मुक्ताफल = मुत्ताहल | सफल = सहल |
| 6) | भ = ह | स्वभाव = सहाव | लोभ = लोह | नभ = नह |
| | | त्रिभुवन = तिहुयण | शुभ = सुह | प्रभू = पहू |

3) केव्हा केव्हा अनाद्य असंयुक्त ‘ठ, थ, म = ढ’ होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ठ | पाठ = पाढ | पीठ = पीढ | कठोर = कढोर |
| थ | प्रथम = पढम | शिथिल = सिढिल | पृथ्वी = पुढिवी |
| ट | शकट = सयढ | विकट = वियढ | |
| म | विषम = विसढ | | |

## असंयुक्त व्यंजनांचे बदल

प्राचीन काळापासून प्राकृत भाषेस सामान्यांची बोलीभाषा म्हणून संबोधले जाते. कारण सामान्य लोकांना कठोर किंवा संयुक्त व्यंजनाचे उच्चार करणे कठीण होते. त्यामुळे उच्चारण्यास सोप्या व्यंजनांचाच प्राकृत भाषेत अधिक वापर केला जात असलेला दिसून येतो. थोडक्यात उच्चारण्यास कठोर असलेल्या व्यंजनांचा प्राकृत भाषेत सोप्या वर्णांमध्ये बदल केला जातो. त्यालाच **व्यंजनांचे बदल** म्हटले जाते. यामध्ये व्यंजनांचे द्वित्व करणे, सोपेकरण, सुलभीकरण करणे, अनुनासिकीकरण करणे, वर्णागम, वर्णलोप, वर्णबदल, वर्णविपर्यय, स्वरविभक्ती आदी अनेक प्रकारे संयुक्त व्यंजनांचा बदल केला जातो.

### 1) आद्य संयुक्त व्यंजनांचा लोप :

प्राकृत भाषेत शब्दांच्या प्रारंभी केव्हाच जोडाक्षर येत नाही. त्यामुळे जोडाक्षरातील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप केला जातो.

क्रम = कम भ्रमण = भमण प्रभात = पहाय प्रथम = पढम

प्रभा = पहा व्रत = वय ध्वज = धय व्रण = वण

2) केव्हा केव्हा अनाद्य संयुक्त व्यंजनातील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप करून अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व केले जाते. (म्हणजेच अधिक बलाचे व्यंजन दोन वेळा लिहिले जाते.)

भक्त = भत्त भग्न = भग्ग धर्म = धम्म चक्र = चक्क

रक्त = रत्त लग्न = लग्ग कर्म = कम्म कर्ण = कण्ण

3) केव्हा केव्हा अनाद्य संयुक्त व्यंजनातील अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व न करता त्या वर्गातील प्रथम वर्णास द्‌वितीय आणि तृतीय वर्णास चतुर्थ व्यंजन जोडले जाते.

व्याघ्र = वग्घ अर्थ = अत्थ अर्ध = अद्‌ध

पथ्य = पत्थ मूर्ख = मुक्ख प्रस्तर = पत्थर

4) **अनुनासिकीकरण** :- प्राकृतात केव्हा केव्हा संयुक्त व्यंजनातील कमी व्यंजनाचा लोप करून (द्‌वित्व न करता) अनुस्वाराचा वापर केला जातो. याला अनुनासिकीकरण म्हणतात.

(अश्रु) = (अस्सु) अंसु वक्र = (वक्क) वंक वयस्स = वयंस

5) **तालव्यीकरण** :- केव्हा केव्हा दंत्य (त, थ, द, ध) व्यंजनाऐवजी तालव्य (च, छ, ज, झ) व्यंजनाचा उपयोग केला जातो. त्यास तालव्यीकरण म्हणतात.

सत्य = (सत्त) सच्चं, विद्या = विज्जा, पथ्य = पच्छ (पत्थ)

6) **मूर्धन्यीकरण** :- संयुक्त व्यंजनामध्ये दंत (त, थ, द, ध) व्यंजने असतील तर त्याच्या जागी मूर्धन्य व्यंजनाचा (ट, ठ, ड, ढ) वापर केला जातो. त्यास मूर्धन्यीकरण म्हणतात.

प्रतिमा = पडिमा प्रथम = पढम अर्ध = अड्‌ढ, अदध

प्रतिपन्न = पडिवन्न कृत = कड, कट ऊर्ध्व = उड्‌ढ

7) **वर्णागम** :- संयुक्त व्यंजनाच्या उच्चार सुलभतेसाठी एखाद्या वर्णाचा लोप करून एखाद्या बाह्य अ, इ, उ आदीचे आगमन होते.. त्यास वर्णागम म्हणतात.

स्त्री = इत्थी विय = इव उक्त = वुत्त

8) **सवर्णलोप :-** केव्हा केव्हा उच्चार सुलभतेसाठी समान उच्चारण असलेल्या वर्णातील (एकापुढे एक असतील तर) एकाचा लोप केला जातो. त्याला सवर्णलोप म्हणतात.

हृदय = (हियय) हिय    नववरा = नवरा    नववरी = नवरी

उदुंबर = (उउंबर) उंबर    गुरराखी = गुराखी

9) **वर्णलोप :-** मानवी स्वभावामुळे घाई गडबडीने बोलत असताना केव्हा केव्हा (अनाद्य, आद्य) अनावश्यक व्यंजनाचा लोप केला जातो.

देवकुल = (देवउल) देउल    अरण्य = रण्ण    राजकुल = (रायउल) राउल

नूनं = नूणं, णूणं

10) **वर्ण-विपर्यय :-** केव्हा केव्हा बोलण्याच्या गडबडीत शब्दांतील वर्णांचा क्रम बदलला जातो. त्याला वर्ण-विपर्यय म्हणतात.

वाराणसी = वाणारसी    नुकसान = नुसकान    निडळ = निढळ

ढणाल = ढलाण    आलाण = आणाल    चिकटणे = चिटकणे

ढपल्या = ढलप्या    मरहट्ठ = महरट्ठ    डिसकळ = डिकसळ

11) **स्वरभक्ति :-** काही कठोर व्यंजनांचे उच्चारण करणे कठीण होते तेव्हा त्याच्या सोपेकरणासाठी संयुक्त व्यंजने विभक्त केली जात. त्यास स्वरभक्ती म्हणतात.

रत्न = रयण    भार्या = भारिया    धर्म = धरम

सूत्र = सूतर    छत्रपती = छतरपइ    कर्म = करम

12) **प्राकृतात केव्हा केव्हा ज्ञ = न्न, ण्ण होते.**

संज्ञा = सन्ना, सण्णा    सर्वज्ञ = सव्वण्णु    प्रज्ञा = पन्ना, पण्णा.

13) **केव्हा केव्हा प्राकृतात 'श्न, स्न, ष्ण, त्स्न, न्ह = ण्ह' होतो**

प्रश्न = पण्ह    स्नान = ण्हाण    मध्यान्ह = मज्झण्ह

उष्ण = उण्ह    जोत्स्ना = जोण्हा

14) **केव्हा केव्हा प्राकृतात 'श्म, ष्म, स्म, क्ष्म = म्ह' होतो.**

काश्मीर = कम्हीर    ऊष्म = उम्ह    लक्ष्मण = लम्हण

विस्मय = विम्हय    ब्राम्हण = बम्हण

15) **प्राकृतमध्ये र्य, द्य = ज्ज होते.**

आर्य = अज्ज  कार्य = कज्ज  विद्या = विज्जा

भार्या = भज्ज  मद्य = मज्ज  आद्य = अज्ज

16) **प्राकृतात क्म, त्म = प्प होते.**

रुक्मिन = रुप्पिण  आत्मा = अप्पा

17) **प्राकृतात त्स, प्स = च्छ होतो.**

वत्स = वच्छ  उत्सव = उच्छव  अप्सरा = अच्छरा

## (2) सर्वनामे

**प्राकृत, संस्कृत व मराठीतील तुलनात्मक अशी सर्वनामे पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | अहं, हं (अहम्) मी | वयं, अम्हे (वयम्, आवाम्) आम्ही |
| द्वि. पु. | तुं, तुमं (त्वम्) तू | तुम्हे, तुज्झे (युवाम्) तुम्ही |
| तृ. पु. | सो (सः) तो | ते (तौ) ते |
| | सा (सा) ती | ता (ताः) त्या |
| | तं (तत्) ते | ताणि (तानि) ती |

को = कोण (पुं.)  काइं = कोणती  का = कोण (स्त्री), के = कोणते

तव = तुझा, तुझी, तुझे  मम = माझा, माझी, माझे  केरिसं = कशा प्रकारे

इमो, एसो = हा (पुं.)  इमं = हे (न.पुं.)  एए = (पुं.) हे

इमा, एसा = (स्त्री) ही  इमाइं = ही (स्त्री)

एयस्स = याचा (पुं.)  अम्हाणं = आमचा, आमची, आमचे

एयाए = हिचा (स्त्री.)

## (1) दर्शक सर्वनामे व विभक्ती

1) एय (एतद) = हा, ही, हे    2) इम (इदम्) = हा, ही, हे    3) अमु (अदस्) = हा, ही, हे

### एय (एतद्) हा (पु.)

| कारक | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | एस, एसो | एए |
| कर्म (द्वि.) | एयं | एए |
| करण (तृ.) | एएण, एएणं | एएहि, एएहिं |
| संप्रदान (च./ष.) | एयस्स | एयाण, एयाणं |
| अपादान (पंचमी) | एयाओ | एएहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | एयंसि, एयम्मि | एएसु, एएसुं |

### एय (एतद्) स्त्री (ही)

| कर्ता (प्र.) | एसा | एया, एयाओ, एईओ |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | एयं | एयाओ, एईओ |
| करण (तृ.) | एयाए | एयाहि, एयाहिं |
| संप्रदान (च./ष.) | एयाए | एयाण, एयाणं |
| अपादान (पंचमी) | एयाओ | एयाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | एयाए | एयासु, एयासुं |

### इम (इदम्) पु. (हा)

| कर्ता (प्र) | अयं, इमो, मे | इमे |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | इमं | इमे, इमा |
| करण (तृ.) | इमेणं, इमिणा, | इमेहि, इमेहिं |
| संप्रदान (च./ष.) | इमाए | इमाण, णं |
| अपादान (पंचमी) | इमाए | इमाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | इमाए | इमासु, सुं. |

### इम (इदम्) स्त्री (ही)

| कर्ता (प्र) | इयं, इमा | इमा, इमाओ, इमी |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | इमं | इमा, इमाओ, इमी |
| करण (तृ.) | इमाए, इमीए | इमाहि, हिं, इमीहि |
| संप्रदान (च./ष.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासिं, इमाणं, इमं |
| अपादान (पंचमी) | इमाओ, इमीओ | इमाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | इमाए, इमीए, इमीसे | इमासु, इमासुं, इमं |

**टीप :-** 'अमु' या दर्शक सर्वनामाची रूपे प्राकृतात विशेष आढळत नाहीत. 'साहु' या उकारान्त पुलिंगी नामाप्रमाणे 'अमु' ची रूपे होतात. तरीही प्रथमा, द्‌वितीया आणि सप्तमीची रूपे खालीलप्रमाणे होतात.

| कर्ता (प्र.) | अह, अमू, असो | अमुणो, अमू |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | अमुं | अमुणो, अमू |
| अधिकरण (सप्तमी) | अयम्मि, इअम्मि, अअुम्मि | अमूसु , अमु |

## (2) संबंधदर्शक सर्वनामे

1) ज (यद्) = जो, जी, जे

### ज (यद्) पु. (संबंधदर्शक सर्वनामे)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जो | जे |
| कर्म (द्वि.) | जं | जे, जा |
| करण (तृ.) | जेण, जेणं | जेहि, जेहिं |
| संप्रदान (च./ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अपादान (पंचमी) | जाओ | जेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | जंसि, जम्मि | जेसु, जेसुं |

## ज (यद्) स्त्री. (जी)

| कारक | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जा | जाओ, जीओ |
| कर्म (द्वि.) | जं | जाओ, जीओ |
| करण (तृ.) | जाए, जीए | जाहि, जाहिं, जीहि |
| संप्रदान (च./ष.) | जाए, जाओ, जीए, जीसे | जासिं, जाण |
| अपादान (पंचमी) | जाओ, जीओ | जाहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | जाए, जीए, जीसे | जासु, सुं |

# (3) प्रश्नार्थक सर्वनामे

## 1 क (किम्) पु. (कोण)

| कर्ता (प्र.) | को, को | के |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | कं | के, का |
| करण (तृ.) | केण, केणं | केहि, केहिं |
| संप्रदान (च./ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अपादान (पं.) | काओ | केहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | कंसि, कस्सिं, कम्मि | केसु, केसुं |

## क (किम्) स्त्री (कोण)

| कर्ता (प्र.) | का | काओ, कीओ |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | कं | काओ, कीओ |
| करण (तृ.) | काए | काहि, हिं |
| संप्रदान (च./ष.) | काए | काण, णं |
| अपादान (पं.) | काए, काओ | काहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | काए, कीसे | कासु, सुं |

## (4) सर्वनामांचे विभक्ती प्रत्यय

### अहं (अस्मद्, युष्मद्) = मी, आम्ही

| कर्ता (प्र.) | अहं, हं | अम्हे, वयं |
|---|---|---|
| कर्म (द्वि.) | मं, ममं, मे | अम्हे, वयं, णे |
| करण (तृ.) | मइ, मए, मे | अम्हेहि, अम्हेहिं |
| संप्रदान (च./ष.) | मम, मे, मह, मज्झ | अम्हाणं, णं, णो |
| अपादान (पं.) | ममाओ, मत्तो | अम्हाओ, अम्हेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | मइ, मए, ममंसि | अम्हेसु, अम्हेसुं |

### तुं, तुमं (त्वम् – यूयम्) = तुम्हे, तुज्झे

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता | तुं, तुमं, तुमे | तुब्भे, तुम्हे, तुज्झे |
| कर्म | तुमं, ते | तुब्भे, तुम्हे, तुज्झे, भे |
| करण (तृ.) | तुए, तुमे, तए, तुमए | तुब्भेहि, तुम्होहि, तुज्झेहि |
| संप्रदान (च./ष.) | तव, ते, तुह, तुम्ह, तुज्झ | तुम्हाण, णं, तुब्भाण, णं |
| अपादान (पं.) | तुमाओ, तुमंतो | तुब्भेहिन्तो, तुम्हेहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | तुमंसि, तुमम्मि, तइ | तुब्भेसु, तुम्हेसु, तुज्झेसुं |

### (तृतीय पुरुषी सर्वनामे)

### सो (सः तद्) = तो (पु.)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| कर्ता | सो, से, स | ते |
| कर्म | तं | ते, ता |
| करण (तृ.) | तेण, तेणं | तेहि, तेहिं |
| संप्रदान (च./ष.) | तस्स, से, ते | तेसिं, ताण, ताणं |
| अपादान (पं.) | ताओ | तेहिंतो |
| अधिकरण (सप्त.) | तंसि, तम्मि | तेसु, तेसुं |

सा (त- तद्) = स्त्री (ती)

| कर्ता | सा | तीओ, ताओ |
|---|---|---|
| कर्म | ते | तीओ. ताओ |
| करण (तृ.) | ताए, तीए | ताहि, ताहिं, तीहि |
| संप्रदान (च./ष.) | ताए, तीए, तीसे, ताओ | तासिं, ताण, णं, |
| अपादान (पंचमी) | ताओ, तीओ | ताहिन्तो |
| अधिकरण (सप्त.) | ताए, तीए, तीसे | तासु, तासु |

## (3) काळ (Tense)

प्रत्येक भाषेत वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळ असले तरीही प्राकृतमध्ये वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचाच अधिक वापर होत असलेला दिसून येतो. प्राकृत भाषेत भूतकाळ फार कमी प्रमाणात वापरला जात असलेला दिसून येतो.

### 1) वर्तमानकाळाचे प्रत्यय (Present Tense)

1) अर्धमागधी - प्राकृत भाषेत मूळ क्रियांना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाची विविध रूपे तयार केली जातात. त्याला धातुसाधिते म्हणून संबोधले जाते.

2) धातूचे (1)अ, (2) आ, ए, ओकारांत असे दोन गट, विभाग आलेले दिसून येतात.

3) धातूच्या अन्त्य अक्षराच्या उच्चारामधून कोणत्या स्वराचा उच्चार होतो त्यावरून त्या धातूचे वर्गीकरण, गट पाडलेले दिसून येतात. उदा. सुण (यातील अंत्य 'ण'च्या उच्चारातून 'अ' स्वराचा उच्चार होतो म्हणून) हा धातू अकारान्त आहे.

**भण** 'अ'कारान्त धातू आहे.

**गा** (याच्या उच्चारात 'आ'स्वर आहे म्हणून) आकारान्त धातू आहे.

**जा** - आकारान्त धातू

**दे** - एकारान्त धातू

**ने** - एकारान्त धातू

**हो** - ओकारान्त धातू

वरील धातूंना वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप तयार केले जाते.

## 1) वर्तमानकाळाचे प्रत्यय

**नियम –**

1) फक्त अकारान्त धातूलाच वर्तमानकाळाचे प्रथम पुरुषाचे प्रत्यय जोडतेवेळी अकारान्ताचे आकारान्तामध्ये (अ = आ) रूपांतर करून नंतर वर्तमानकाळाचे प्रत्यय जोडले जातात. (मात्र इतर धातूंना नाही)

उदा. पास = पासा = पासामि

**वर्तमानकाळाचे प्रत्यय (परस्मैपदी)**

| पुरुष | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मि (आहे) | मो (आहोत) |
| द्वितीय पुरुष | सि (आहेस) | ह (आहात) |
| तृतीय पुरुष | इ (आहे) | अन्ति/न्ति (आहेत) |

**पास (अकारान्त धातू चालविणे)**

| प्र. पु. | पासामि (पहातो) | पासामो (पहातो) |
|---|---|---|
| द्वि. पु. | पाससि (पहातोस) | पासह (पहाता) |
| तृ. पु. | पासइ (पहातो) | पासन्ति (पाहतात) |

**सूचना :–** भण, सुण, खण, पढ, गच्छ, रम, इ. सर्व अकारान्त धातू वरील पास या धातुप्रमाणे चालतात.

| जा (आकारन्त धातू) | | | | दे (एकारन्त धातू) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्र. पु. | जामि | जामो | | | देमि | देमो |
| द्वि. पु. | जासि | जाह | | | देसि | देह |
| तृ. पु. | जाइ | जायन्ति | | | देइ | देन्ति |

## 2) भविष्यकाळाचे प्रत्यय

**नियम –**

1) भविष्यकाळाच्या प्रत्ययामध्ये 'स्स' चा वापर केलेला असतो.

2) वर्तमानकाळाच्या प्रत्ययाच्या अगोदर 'स्स'चा वापर केला की भविष्यकाळाचे प्रत्यय तयार होतात. (उदा. स्सामि, स्सामो)

3) फक्त अकारान्त धातूला भविष्यकाळाचे प्रत्यय लावण्यापूर्वी 'अ'चे इकारांतामध्ये रूपांतर केले जाते. (परंतु इतर धातूंना कोणताही बदल न करता प्रत्यय जोडले जातात.)

4) भविष्यकाळाचे प्रत्यय दोन प्रकारचे आहेत.

| 1) पहिल्या गटाचे प्रत्यय | | | पास धातू चालविणे. | |
|---|---|---|---|---|
| पुरुष | ए.व. | अ.व. | ए. व. | अ.व. |
| प्र.पु. | स्सं, स्सामि | स्सामो | पासिस्सं, पासिस्सामि | पासिस्सामो |
| द्वि.पु. | स्ससि | स्सह | पासिस्ससि | पासिस्सह |
| तृ. पु. | स्सइ | स्सन्ति | पासिस्सइ | पासिस्सन्ति |

**सूचना :–** भण, सुण, खण, पढ, रम, कर इ. धातू वरीलप्रमाणे चालतात.

| 'जा' आकारन्त धातू चालविणे. | | | 'दे' एकारन्त धातू चालविणे. | |
|---|---|---|---|---|
| प्र.पु. | जास्सं, जास्सामि | जास्सामो | देस्सं, देस्सामि | देस्सामो |
| द्वि.पु. | जास्ससि | जास्सह | देस्ससि | देस्सह |
| तृ. पु. | जास्सइ | जास्संति | देस्सइ | देस्संति |

**सूचना :–** (गा, खा,ने, घे, दे, हो या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

**दुसऱ्या गटाचे भविष्यकाळाचे प्रत्यय**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | हामि, हिमि | हामो,हिमो |
| द्वि.पु. | हिसि | हिह |
| तृ. पु. | हिइ | हिन्ति |

(**सूचना :–** फक्त अकारान्त धातूचे इकारान्तामध्ये रूपांतर करून प्रत्यय जोडले जातात.)

## 3) भूतकाळाचे प्रत्यय

1) अर्धमागधी– प्राकृतमध्ये भूतकाळाचा अत्यंत कमी प्रमाणात उपयोग केला जातो.

2) भूतकाळाऐवजी बऱ्याच वेळा वर्तमानकाळाचाच अधिक वापर केलेला दिसून येतो.

3) भूतकाळ एकवचनामध्ये सर्व पुरुषांमध्ये 'इत्था' आणि अनेक वचनातील सर्व पुरुषांमध्ये 'इंसु' हे दोन प्रत्ययच आहेत.

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | इत्था | इंसु |
| द्वि.पु. | इत्था | इंसु |
| तृ. पु. | इत्था | इंसु |

उदा. – भासित्था, गच्छित्था, गच्छिंसु, भक्खिंसु

1) वरील प्रत्यया शिवाय 'ईअ'हा प्रत्यय अकारांत धातूला लावूनही भूतकाळाची रूपे तयार करतात.

उदा. पुच्छ + ईअ = पुच्छीअ  पास = पासीअ

हण = हणीअ  खाण = खणीअ

2) अकारान्तेतर म्हणजे आ, ए, ओ या धातूंना 'सी, ही. हीअ' इत्यादी प्रत्यय लावून भूतकाळी रूपे तयार करतात.

उदा. जा = जासी, जाही, जाहीअ  खा = खासी, खाही, खाहीअ

दे = देसी, देही, देहीअ  हो = होसी, होही, होहीअ

3) भूतकाळाची अनियमित रूपे : आसि, आसी

उदा. वय = वयासि, वयासी

## 4) आज्ञार्थाचे प्रत्यय

1) आज्ञा, हुकूम, विनंती करतेवेळी आज्ञार्थाचा उपयोग केला जातो.

2) आज्ञार्थाच्या प्रत्ययात 'उकार' जास्त असतो.

3) फक्त अकारान्त धातूला 'मु, मो, हि,' हे आज्ञार्थाचे प्रत्यय लावतेवेळी अकाराचे आकारान्तमध्ये रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात.

4) केव्हा केव्हा द्वि, पु. ए. वचनामध्ये अकारान्त धातूचे मूळरूप वापरले तर चालते. ते समजण्यासाठी द्वि. पु. ए. वचनामध्ये o या चिन्हाचा उपयोग करतात.

**आज्ञार्थाचे प्रत्यय**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | मु | मो |
| द्वि. पु. | o, सु,हि, | ह |
| तृ. पु. | उ | अन्तु |

### 'पास' अकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | पासामु | पासामो |
| द्वि. पु. | पास, पाससु, पासहि | पासह |
| तृ. पु. | पासउ | पासन्तु |

(**सूचना :-** भण, सुण, खण, रम, कर, हस इ. अकारान्त धातूंची रूपे वरीलप्रमाणे चालतात.)

### 'जा' आकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | जामु | जामो |
| द्वि. पु. | जा, जासु, जाहि | जाह |
| तृ. पु. | जाउ | जायन्तु, जान्तु |

## 5) ल्यबन्ताचे प्रत्यय (संबंध कृदन्त)

1) जेव्हा वाक्यात करून, घेऊन, खाऊन, येऊन, अशा क्रियापदाचा उपोयग करून दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा ल्यबन्ताचा (संबंधकृदन्ताचा) उपयोग केला जातो.

2) ल्यबंतामध्ये एकवचन, अनेकवचन, तसेच प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष, तृतीय पुरुष यांचाही वापर केला जात नाही.

3) फक्त अकारांत धातूलाच 'इऊण' हा प्रत्यय लावून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

उदा. पास + इऊण = पासिऊण भण = भणिऊण

सुण = सुणिऊण. खण = खणिऊण पढ = पढिऊण

उदा. राम आंबा खाऊन घरी गेला.

रामो आमं भक्खिऊण (खाऊण) गेहं गच्छइ।

4) 'आ, ए, ओ' या धातूंनाच फक्त 'ऊण' प्रत्यय जोडून ल्यबन्ताचे रूप तयार केले जाते.

जा + ऊण = जाऊण खा = खाऊण, गा = गाऊण,

दे = देऊण, घे = घेऊण, ने = नेऊण,

हो = होऊण

5) वरील प्रत्ययाशिवाय 'इत्ता, एत्ता, इत्ताण, एत्ताण'या प्रत्ययांचाही उपयोग केला जातो.

## 6) तुमंताचे प्रत्यय (हेत्वर्थ कृदन्त)

1) तुमंताचा उपयोग 'साठी, करिता' इत्यादी अर्थाने केला जातो.

2) तुमंतामध्येही वचन आणि पुरुष नाहीत.

3) पास +इउं = पासिउं, भण= भणिउं, सुण = सुणिउं, कर = करिउं, पढ = पढिउं, खण = खणिउं

4) 'आ, ए, ओ या धातूंना 'उं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप तयार केले जाते.
जा =जाउं, गा = गाउं, खा= खाउं, दे = देउं, घे = घेउं, ने = नेउं, हो = होउं
उदा. राम आंबा खाण्यासाठी बागेत गेला.
रामो आमं भक्खिउं उज्जाणे गच्छइ।

## (4) विभक्ती प्रत्यय

**नियम –**

1) विभक्ती प्रत्यय हे फक्त नाम आणि सर्वनामालाच लावले जातात.

2) विभक्ती प्रत्यय हे धातूंना (क्रियांना) लावले जात नाहीत.

3) प्राकृतात चतुर्थी / षष्ठी चे प्रत्यय समानच आहेत. म्हणून प्राकृतामध्ये चतुर्थी विभक्ती नसते. चतुर्थी ऐवजी षष्ठी विभक्ती प्रत्ययाचा उपयोग करतात.

4) गच्छ (जाणे, येणे) या धातूसाठी मराठीभाषेत सप्तमीचा वापर केला जातो. परंतु प्राकृतात त्यासाठी द्वितीया विभक्ती एकवचन वापरले जाते.

### 1) विभक्ती प्रत्ययांचा उपयोग

**1) प्रथमा (कर्ता) विभक्ती :–** वाक्यातील कर्ता प्रथमा विभक्तीने दर्शविला जातो. (कर्म द्वितीया असते)
उदा. 1) **रामो** आमं खाइ। 2) **लया** पोत्थयं पढइ।

**2) द्वितीया (कर्म) विभक्ती :–** वाक्यातील कर्म द्वितीया विभक्तीने दर्शविले जाते. (कर्माची द्वितीया वापरतात) उदा. रामो **आमं** खाइ।

**3) तृतीया (करण) विभक्ती :–** वाक्यातील क्रिया कोणाकडून घडली ते दर्शविण्यासाठी तृतिया विभक्तीचा वापर केला जातो. उदा. – **रामेण** आमो खाइ।

**4) चतुर्थी / षष्ठी (संप्रदान) विभक्ती :–** संबंध दर्शविण्यासाठी षष्ठीचा उपयोग करतात.
उदा. 1) रामो दसर**हस्स** पुत्तो। 2) रामो सीया**ए** पइ अत्थि।

**5) पंचमी (अपादान) विभक्ती :–** वाक्यांमध्ये 'पासून, ऊण – हून' असे असले तेव्हा पंचमीचा उपयोग करतात.
उदा. 1) रामो एगं गा**माउ** बिअं गामं गच्छइ। 2) माला (गिहाउ) **गिहाओ गच्छइ।**

**6) सप्तमी (अधिकरण) विभक्ती :–** ठिकाण, स्थल (मध्ये, आत) दर्शविण्यासाठी सप्तमीचा उपयोग केला जातो.
उदा. 1) रामो **उज्जाणे** कीलइ। 2) रामो **उज्जाणम्मि**। (**उज्जाणे**) चिट्ठइ। 3) सीमा **मंदिरम्मि** गच्छइ।

7) **संबोधन विभक्ती :-** हाक मारणे, निमंत्रण देणे, बोलावणे इ. साठी संबोधन विभक्तीचा उपयोग करतात. उदा. हे राम, हे माला, हे माले.

## II) प्राकृत वाक्य रचनेसाठीचे घटक

1) अर्धमागधी – प्राकृतभाषेत वाक्यरचना करण्यासाठी काळाचे प्रत्यय, सर्वनामाचे प्रत्यय विभक्तीचे प्रत्यय आणि प्राकृत शब्दांचा संग्रह अत्यंत आवश्यक आहे.

2) कोणत्याही भाषेतील वाक्यरचना करते वेळी कर्त्याचे जे लिंग, वचन, असेल त्याप्रमाणे क्रियापदाचे लिंग, वचन वापरणे आवश्यक असते.

3) कर्त्याच्या लिंग वचनानुसार कर्माला विभक्ती प्रत्यय जोडण्यात येतात.

4) वाक्यात व्यक्तीचे, वस्तूचे नाव असेल तेव्हा तृतीय पुरुषी क्रियापदाचा वापर केला जातो. उदा. राम अत्यंत शक्तीशाली योद्धा आहे. (रामो अच्वंतसत्तीसाली जोद्धं अत्थि।)

   1) या वाक्यात 'राम'हा प्रमुख कर्ता आहे. त्याची प्रथमा विभक्ती (प्रत्यय) आहे.

   2) कर्माची (जोद्धा) द्वितीया वापरली आहे.

   3) राम हे नाव असल्याने वर्तमानकाळाच्या तृ. पुरुषी एक वचनी क्रियापदाचा वापर केलेला आहे.

### विभक्ती प्रत्यय (प्राकृत आणि मराठी)

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | ओ (कर्ता) | आ |
| द्वितीया | (अनुस्वार) (कर्म) | आ |
| तृतीया | एण, एणं (ने, कडून, च्या करवी) | एहि, एहिं |
| पंचमी | आउ, आओ (पासून, ऊण, हूण) | हिंतो |
| चतुर्थी/षष्ठी | अस्स (चा, ची, चे) | आण, आणं |
| सप्तमी | ए, म्मि, अंसि (मध्ये, आत) | एसु, एसुं |
| संबोधन | अ | आ |

### (i) 'देव' आकारान्त पुलिंगी नाम चालविणे

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | देवो, देवे | देवा |
| द्वितीया | देवं | देवे, देवा |
| तृतीया | देवेण, देवेणं | देवेहि, देवेहिं |

| | | |
|---|---|---|
| पंचमी | देवाउ, देवाओ | देवाउ, देवाओ, देवाहिंतो |
| चतुर्थी/षष्ठी | देवस्स | देवाण, देवाणं |
| सप्तमी | देवे, देवम्मि देवंसि | देवेसु, देवेसुं |
| संबोधन | देव | देवा |

(**सूचना :–** राम, शाम, गोविंद, चंद इ. सर्व अकारान्त पुल्लिंग नामे 'देव' याप्रमाणे चालतात.)

### (ii) 'वणं' अकारान्त नपुसकलिंगी नाम चालविणे

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | वणं | वणाइं, वणाणि |
| द्वितीया | वणं | वणाइं, वणाणि |
| संबोधन | वणं | वणाइं, वणाणि |

(**सूचना :–** 1) बाकीच्या विभक्ती 'देवा'प्रमाणे चालतात 2) 'वणं'या नपुसकलिंगी नामाप्रमाणे इतर सर्व नपुसकलिंगी नामे चालतात.)

### (iii) 'माला' आकारान्त (स्त्रीलिंगी) नामे चालविणे.

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | माला | माला, मालाओ |
| द्वितीया | मालं | माला, मालाओ |
| तृतीया | मालाए | मालाहि, मालाहिं |
| पंचमी | मालाए, मालाओ | मालाहिन्तो |
| चतुर्थी/ षष्ठी | मालाए | मालाणं, मालाण |
| सप्तमी | मालाए | मालासु, मालासुं |
| संबोधन | माला, माले | माला, मालाओ |

(**सूचना :–** सर्व आकारान्त स्त्रीलिंग नामे 'माला'प्रमाणे चालतात.)

### (iv) इकारान्त व उकारान्त पुल्लिंगी नाम चालविणे

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | मुणी | मुणिणो, मुणीओ |
| द्वितीया | मुणिं | मुणिणो, मुणीओ |

| | | |
|---|---|---|
| तृतीया | मुणिणा | मुणीहि, मुणीहिं |
| पंचमी | मुणिणो, मुणिओ | मुणिहिन्तो |
| चतुर्थी/षष्ठी | मुणिणो, मुणिस्स | मुणिण, मुणिणं |
| सप्तमी | मुणिंसि, मुणिम्मि | मुणीसु, मुणीसुं |
| संबोधन | मुणि | मुणिणो, मुणीओ |

### (v) 'साहु'(पु. नाम)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | साहू | साहूणो, साहूवो |
| द्‌वितीया | साहूं | साहूणो, साहूवो |
| तृतीया | साहूणा | साहूही, साहूहिं |
| पंचमी | साहूणो, साहुओ | साहुहिन्तो |
| चतुर्थी/षष्ठी | साहूणो, साहुस्स | साहूण, साहूणं |
| सप्तमी | साहुंसि, साहुम्मि | साहुसु, साहुसुं |
| संबोधन | साहु | साहुणो, साहुणे |

### (vi) अनियमित नामे

संस्कृतमधील ऋकारान्त व इतर व्यंजनात शब्दांवरून अर्धमागधी-प्राकृतमध्ये जी रूपे (शब्द) नामे येतात त्यांना अनियमित शब्द म्हणतात. यामध्ये संबंधदर्शक गट आणि कर्तृत्ववाचक शब्दांचा गट असे दोन प्रकार आहे.

उदा. 1) पितृ = पिउ, मातृ = माउ    2) कर्तृ = कत्तु, दातृ = दाइ, दाउ

### (i) 'राया' (पु. नाम)

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | राया | रायाणो, राइणो |
| द्‌वितीया | रायाणं, रायं, राइणं | रायाणो, राइणो, रन्नो |
| तृतीया | राइणा, रन्ना, राएण | राईहि, राईहिं |
| पंचमी | राइणो, रन्नो | राईहिन्तो |
| चतुर्थी/षष्ठी | राइणो, रन्नो, रायस्स | राईण, राईणं |
| सप्तमी | राइम्मि, रायास | राईसु, राईसुं |
| संबोधन | राया, राय, रायं | रायाणो, राईणो |

## (ii) माया (स्त्री) नाम

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | माया | मायरो |
| द्वितीया | मायरं | मायरो |
| तृतीया | मायाए, माऊए | मायाहि, मायाहिं |
| पंचमी | माऊए, मायाउ | माऊहिन्तो, माईहिन्तो |
| चतुर्थी/षष्ठी | मायाए, माउए | माऊणं, माईणं |
| सप्तमी | मायाए, माउए | माउसुं, माईसुं |
| संबोधन | माया | मायरो |

## (iii) पिया (पिता) पु. नाम

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | पिया, पियरो | पियरो |
| द्वितीया | पियरं | पियरो, पियरे, पियरा |
| तृतीया | पियरेण, पियरेणं, पिउणा | पियरेहि, हिं, पिउहि, पिइहिं |
| पंचमी | पियराओ, पिउणो | पियरेहिन्तो, पिउहिन्तो, पिइहिन्तो |
| चतुर्थी/षष्ठी | पियरस्स, पिउस्स, पिउणो | पियराण, णं, पिउणं, पिईणं |
| सप्तमी | पियरे, पियरम्मि | पियरेसु, सुं, पिऊसुं, पिईसुं |
| संबोधन | पिय, पियर | पियरो |

(भाऊ, जामाउ, अम्मपिउ, मायापिउ, इ शब्द 'पिउ' प्रमाणे चालतात.)

## 'कत्ता'(कर्ता) पु. नाम चालविणे

| कारक | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथमा | कत्ता, कत्तारो | कत्तारो, कत्तारा, कत्ता |
| द्वितीया | कत्तारं | कत्तारो, कत्तारा, कत्ता |
| तृतीया | कत्तारेण, कत्तारेणं | कत्तारेहि, कत्तारेहिं |
| चतूर्थी/षष्ठी | कत्तारस्स, कत्तुणो | कत्ताराण, कत्ताराणं |
| पंचमी | कत्तराओ | कत्तारेहिन्तो |
| सप्तमी | कत्तारे, कत्तारम्मि | कत्तारेसु, कत्तारेसुं |
| संबोधन | कत्ता | कत्तारो, कत्तारो |

## (5) संख्या

### संख्या वाचक शब्दांचा विभक्तीमध्ये उपयोग

1) 'एग' या शब्दाचा उपयोग अनेकवचनी केला जातो तेव्हा याचा अर्थ थोडेसे, किंचितसे, काही असा होतो. उदा. एगे, एगेहि, एगेहिन्तो, एगेसिं, एगेसु

2) दो, ति, चउ यांची बहुवचनी रूपे होतात. शिवाय तिन्ही लिंगाची रूपे समानच असतात.

3) 'पंच'पासून 'दस' पर्यंतच्या अंकांची बहुवचनातील ही तिन्ही लिंगाची रूपे समानच असतात.

4) 11 ते 99 पर्यंत जे सामासिक संख्यावाचक शब्द तयार होतात. त्यासंबंधीचा नियम –

| | | |
|---|---|---|
| दो = दु | – | दुवालस |
| बे = बा | – | बावीस, बायालीस, बावन्न, बासट्ठि, बावत्तरि, बासीइ, बेणउइ |
| ति = ते | – | तेरस, तेवीस, तेत्तीस |

5) चउ = चो होऊन पुढील व्यंजनाचे द्वित्त्व होते. चोइस, चोत्तीस, चोयालीस

6) पंच = पण, पण्ण होते – पण्णरस, पणवीस, पणतीस

7) 'छ' चे स्वरापुर्वी छल होते. परंतु व्यंजन आल्यास व्यंजनाचे द्वित्व होते.

छव्वीस, छत्तीस, छप्पण्ण, छन्नउइ

8) 'सत्त' मध्ये कोणताही बदल न होता तसाच राहातो.

सत्तरस, सत्ततीस, सत्तचालीस, सत्तहत्तरी, सत्तासीइ

9) अट्ठ = अट्ठा होते. केव्हा केव्हा 'अट्ठ'आहे तसेच राहते.

अट्ठारस, अट्ठावीस, अट्ठतीस, अट्ठचत्तालीस, अट्ठसटिठ, अट्ठासीए

10) 'नव'मध्ये बदल न होता तसेच राहते. नवणउइ, 29, 39, 49 इ. संख्यावाचक शब्द मराठीप्रमाणे 'एकोण किंवा एगूण' इ. शब्द लावून तयार करतात.

11) 11 ते 18 याची रूपे तिन्ही लिंगात सारखीच होतात. तसेच त्यांची रूपे बहुवचनी असतात.

12) 19 ते 48 यांची रूपे एक वचनात असतात. प्रथमा व द्वितीया विभक्ती 'वण' प्रमाणे आणि बाकीच्या विभक्तीत आकारांत किंवा इकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

13) 49 ते 58 याची रूपे बहुवचनी रूपे होऊन ते पंच प्रमाणे चालतात. प्रथमा व द्वितीया विभक्ती व्यतिरिक्त बाकीच्या विभक्तीत आकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे होतात.

14) 59 ते 99 हे शब्द फक्त एकवचनातच असतात. प्रथमा, व द्वितीया विभक्तीत इकारांत नपुसकलिंगी नामाप्रमाणे चालतात. बाकी ईकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात.

15) पहिला दुसरा या अर्थाची विशेषणे 1 ते 6 पर्यंत खालीलप्रमाणे होतात. ही सर्व विशेषणे आकारान्त विशेषणाप्रमाणे चालतात.

1) पहिला = पढम, पढमो दुसरा = बीय, बिइय, दोच्च

तिसरा = तइय, तच्च चौथा = चउत्थ

पाचवा = पंचम, पंचमो सहावा = छट्ठ, छट्ठं

चारांचा समूह = चउक्क सहांचा समूह = छक्

16) 6 च्या पुढील संख्यावाचक शब्दांना, 'इस व अम' लावून विशेषणे तयार होतात.

सातवा = सत्तम अट्ठम, नवम, दसम. अकरावा = एगारस

20 वा = वीसइम. 80 वा = असीइम / असीअम 100 वा = सयअम

1000 वा = सहस्सअम

वरील विशेषणांची स्त्रीलिंगी रूपे त्यांना 'ई' लावून होतात.

उदा. - सत्तमी, तेरसमी, बीसइमी

17) संख्यावाचक शब्दांपासून 'खुत्तो, हा, सो' हे प्रत्यय लावून अव्यये बनतात.

उदा. एकदा = सइं, दोनदा = दुक्खुत्तो

सातवेळा = सत्तक्खुत्तो, शंभर वेळा = सयसो

पहिल्या वेळी = पढम, दुसऱ्या वेळी = बीय, चार वेळा = चउहा, हजार वेळा (प्रकारे) सहस्ससो

18) पहिल्या वेळी, दुसऱ्या वेळी अशा प्रकारची अव्यये, नपुसकलिंगी एकवचनात अनुस्वार देऊन होतात.
उदा. पढम = पढमं

बीय = बीयं, बिइयं, तइयं, चउत्थं, पंचमी, दसम इत्यादी

19) 'एग' हा शब्द फक्त एकवचनात आढळतो. ते पुढीलप्रमाणे.

| पुरुष | पुल्लिंगी | | स्त्रीलिंग | नपुसकलींगी |
|---|---|---|---|---|
| प्रथमा | एगे | एगे | एका | एगे |
| द्वितीया | एगं | एगे | एगं | एगं |
| तृतिया | एगेण | एगेहि | एगाए | एगेण |
| पंचमी | एगाओ | एगेहिन्तो | एगाओ | एगेण |
| षष्ठी | एगस्स | एगेसि | एगाए | एगस्स |
| सप्तमी | एगम्मि | एगंसि, एगेसु | एगाए | एगम्मि, एगंसि |

| पुरुष | दो (पुल्लिंग) | ति (स्त्री.) | चउ (नपु.) |
|---|---|---|---|
| प्र. | दो. दुवे, देण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| द्वि. | दो, दुवे, देण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| तृ. | दोहिं | तीहिं | चउहिं |
| पं. | दोहिन्तो | तीहिन्तो | चउहिन्तो |
| ष. | दोण्हं | तिण्हं | चउण्हं |
| स. | दोसु | तीसु | चउसु, चउसुं |

(**टीप :** दो, ति, चउ ही संख्याविशेषणे फक्त अनेकवचनातच चालतात. एकवचनात चालत नाही.)

पंच (पाच हे तिन्ही लिंगी सारखेच चालते.)

| प्र. | पंच |
|---|---|
| द्वि. | पंच |
| तृ. | पंचहि |
| पं. | पंचहिन्तो |
| ष. | पंचण्ण |
| स. | पंचसु |

1) सर्व अकारांत संख्याशब्द 'पंच' प्रमाणे म्हणजेच 'देव' अकारांत पुल्लिंगी नामाप्रमाणे चालतात.

2) आकारांत संख्याशब्द 'माला' आकारांत स्त्रीलिंग नामाप्रमाणे चालतात.

# संख्यावाचक शब्द

| | अंक | अंक विशेषणे |
|---|---|---|
| 1) | एग / एक्क | पढम, पढमो |
| 2) | दो / दु / बे / बीअ | दोच्च / बीय / बिइय |
| 3) | ति / ते | तइय / तच्च / तिण्हं |
| 4) | चउ / चा / चो | चउत्थ / चउण्हं |
| 5) | पंच / पण्ण / पण | पंचम / पंचमी |
| 6) | छ / छल | छट्ठं |
| 7) | सत्त | सत्तम / सत्तमी |
| 8) | अट्ठ / अट्ठा | अट्ठं, अट्ठमी |
| 9) | नव / नवम | नवम, नवमी |
| 10) | दस / दह | दसम, दसमी |
| 11) | एक्कारस / एयारह /इक्कारस | एगारसमं |
| 12) | दुवालस / बारस | बारसमं |
| 13) | तेरस / तेरह | तेरसमं |
| 14) | चउदस / चोद्दस | चउरसमं |
| 15) | पंचरह / पन्नरस | पंचरसमं |
| 16) | सोलस | सोलसमं |
| 17) | सत्तरस | सत्तरसमं |
| 18) | अट्ठारस | अट्ठारसमं |
| 19) | एगूणवीस | एगूणरसमं |
| 20) | वीस | वीसइमं |
| 21) | एगवीस / एक्कवीस | |
| 22) | बाईस / बावीस | |
| 23) | तेईस / तेवीस | |
| 24) | चउवीस | |
| 25) | पणवीस | |

| | | |
|---|---|---|
| 26) | छव्वीस | 54) चउवन्न |
| 27) | सत्तावीस | 55) पणवन्न |
| 28) | अट्ठावीस | 56) छव्वण / छप्पण्ण |
| 29) | अउणतीस | 57) सत्तावन्न |
| 30) | तीस | 58) अट्ठावन्न |
| 31) | एगतीस/एक्कतीस | 59) एकूणसट्ठि / अउणसट्ठि |
| 32) | बत्तीस | 60) सट्ठि |
| 33) | तेत्तीस | 61) एगसट्ठि /एक्कसट्ठि |
| 34) | चोत्तीस | 62) बासट्ठि |
| 35) | पणतीस | 63) तेसट्ठि |
| 36) | छत्तीस | 64) चउसट्ठि |
| 37) | सत्ततीस | 65) पणसट्ठि |
| 38) | अट्ठतीस | 66) छावट्ठि |
| 39) | एगूणचत्तालीस/ एगूणचालीस | 67) सत्तसट्ठि |
| 40) | चालीस / चत्तालीस | 68) अट्ठसट्ठि |
| 41) | एक्क / एगचत्तालीस | 69) एगूणसत्तरि |
| 42) | बायालीस | 70) सत्तरि |
| 43) | तेयालीस | 71) एग / एक्कसत्तरि |
| 44) | चउयालीस / चोयालीस | 72) बावत्तरि |
| 45) | पणयालीस | 73) तेवत्तरि |
| 46) | छयालीस | 74) चोवत्तरि |
| 47) | सीयालीस | 75) पंचहत्तरि |
| 48) | अट्ठचत्तालीस /अट्ठयालीस | 76) छावत्तरि |
| 49) | एगूणपन्नास | 77) सत्तहत्तरि |
| 50) | पन्नास | 78) अट्ठहत्तरि |
| 51) | एगावन्न / एकावन्न | 79) एगूणासीइ |
| 52) | बावन्न /बावण्ण | 80) असीइ |
| 53) | तेवन्न | 81) एक्कासीइ /एगासीइ |

| | | |
|---|---|---|
| 82) | बासीइ | 93) तेणउइ |
| 83) | तेसीइ | 94) चउणउइ |
| 84) | चउसीइ | 95) पंचाणउइ |
| 85) | पंचसीइ | 96) छण्णउइ |
| 86) | छसीइ | 97) सत्तणउइ |
| 87) | सत्तासीइ | 98) अट्ठाणउइ |
| 88) | अट्ठासीइ | 99) नवणउइ |
| 89) | एगूणनउइ | 100) सययं |
| 90) | नउइ | 200) बे /दो सयाइं |
| 91) | एक्का / एगाणउइ | 300) तिसय / तिण्णिसयाइं |
| 92) | बेणउइ | 1000) सहस्सं |

# (6) प्राकृत संधी

**प्रस्तावना –**

प्रत्येक भाषेच्या व्याकरणामध्ये संधीस महत्त्वपूर्ण स्थान असलेले दिसून येते. संधीमुळे शब्दांचे आकार संक्षिप्त होण्यास मदत होते. तर संधी विग्रहामुळे शब्दोच्चारास सुलभता येते. संधी नियमानुसार संधीचे 1) स्वरसंधी 2) प्रकृतिभावसंधी 3) उद्‌वृत्तस्वरसंधी 4) अव्ययस्वरसंधी 5) व्यंजनसंधी असे पाच प्रकार (विभाग) पडतात.

संस्कृत भाषेत दोन स्वर किंवा एक स्वर, एक व्यंजन किंवा व्यंजन – व्यंजन एकत्रित आले तरीही संधी होतो. तसेच विसर्ग आणि स्वर किंवा व्यंजन, एकत्रित आले तरीही संधी होतात.

अर्धमागधी प्राकृतात विसर्ग नसल्याने प्राकृतात विसर्गसंधी येत नाही. तसेच प्राकृत ही बोलीभाषा असल्याने व सुलभीकरण हे बोलीभाषेचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याने संस्कृतप्रमाणे प्राकृतात बऱ्याच ठिकाणी संधी होतोच असे नाही. प्राकृतात थोडीफार शिथिलता असलेली दिसून येते म्हणून प्राकृतातील सर्व संधीनियमाचा परिचय असणे आवश्यक आहे.

## स्वर संधी

स्वर संधीचे 1) दीर्घ संधी 2) गुण संधी (3) ऱ्हस्व संधी (4) संधी निषेध (5) स्वरलोप संधी इ. प्रकार आहेत.

**1) दीर्घसंधी –** (अ) दोन सजाती स्वर एकत्र आले असता त्यांचे दीर्घ स्वरांमध्ये रूपांतर होते. म्हणजेच अ अथवा आ स्वरापुढे अ किंवा आ हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'आ' (दीर्घ) मध्ये होते. (अ + अ = आ/ आ + आ = आ)

| | | |
|---|---|---|
| जीव + अजीव = जीवाजीव | इह +आगमण = इहागमण | गाम +अणुग्गाम = गामाणुग्गाम |
| कला + आयरिय = कलायरिय | रयण +आगरो = रयणागरो | तहा + अवि = तहावि |
| राया + अभिसेओ = रायाभिसेओ | जहा + अवि = जहावि | दुह + आवहा = दुहावहा |
| जिण + आलय = जिणालय | धम्म + अधम्म = धम्माधम्म | गण + अहिवइ = गणाहिवइ |
| विज्जा + आलय = विज्जालय | | |

**अ + आ = होतो, परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर असेल तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व (अ) स्वरातच रूपांतर होते.**

| | | |
|---|---|---|
| भिक्ख + अट्ठा = भिक्खट्ठा | दव + अग्गि = दवग्गि | जीविय + अट्ठा = जीवियट्ठा |
| जम्म + अंतर = जम्मंतर | न + अत्थि = नत्थि | रत्त + अच्छ = रत्तच्छ |
| मरण + अंतर = मरणंतर | कोह + अग्गि = कोहग्गि | |

(ब) इ अथवा इ च्या पुढे इ किंवा ई आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ ई मध्ये होते.

उदा. मुणि + इसर = मुणीसर    नंदी + इसर = नंदीसर    पुहवी + इसर = पुहवीसर

मुणि + इणो = मुणीणो    दहि + इसर = दहीसर    कवि + ईसर = कवीसर

लच्छी + इसरो = लच्छीसरो

ई + ई = ई होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर आले तर त्यांचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व (इ) च होईल.

उदा. मुणि+ इन्द = मुणिन्द, कवि + इन्द = कविन्द, महि + इन्द = महिन्द

(क) उ अथवा ऊ या स्वरापुढे उ किंवा ऊ हे स्वर आले असता त्या दोन्ही (क) स्वरांचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्येच होते.

उदा.    साहू + ऊसव = साहूसव    वहू + ऊसव = वहूसव

महू + ऊसव = महूसव    बहू + उदगं = बहूदगं

धेणु + ऊसव = धेणूसवो    बहू + उवयार = बहूवयार

उ + ऊ = ऊ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरापुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरात न होता ऱ्हस्व स्वरात होते.

उदा. साहू + उत्तम = साहुत्तम

दुरू + उज्झिया = दुरुज्झिया

2) गुणसंधी – (अ) अ अथवा आ या स्वरांच्यापुढे 'इ' किंवा 'ई' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ए' मध्ये होते.

उदा. राया + इसी = राएसि    जहा + इव = जहेव    महा + इसि = महेस

नर + इसर = नरेसर    तेण + इव = तेणेव    दम + इसर = दमेसर

इह + इव = इहेव    खय + ईसर = खयरेसर

अ+इ = ए होतो परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर त्याचे रूपांतर 'ए' मध्ये न होता ऱ्हस्व (इ) स्वरामध्ये रूपांतर होते.

उदा. नर + इंद = नरिंद (नरेंद)    न + इच्छइ = निच्छइ (नेच्छइ)

महा + इंद = महिंद (महेंद)    जह + इच्छइ = जहिच्छइ

सुर + इन्द = सुरिंद    चरण + इंधण = चरणिंधण    देव + इन्द = देविंद

महा + इड्ढिय = महिड्ढिय    जिण + इन्द = जिणिंद

ब) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे 'उ' अथवा 'ऊ' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ओ' मध्ये होते.

उदा. तस्स + उवरि = तस्सोवरि
किस + उयरी = किसोयरी
जहा + उइयं = जहोइय
महा + उवयार = महोवयार
महा + ऊसव = महोसव
जहा + उचिय = जहोचिय
एग + ऊण = एगोण
नीसास + उसास = नीसासोसास
मास + उववास = मासोववास

**अ + उ = ओ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वरांच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर 'ओ' न होता ऱ्हस्व (उ) स्वरात रूपांतर होते.**

उदा. नयर + उज्जाण = नयरुज्जाण
पुरिस + उत्तम = पुरिसुत्तम
रयण + उज्जल = रयणुज्जल
कुल + उब्भव = कुलुब्भव
तेण + उत्तं = तेणुत्तं
भय + उव्विग = भयुव्विग
सव्व + उत्तम = सव्वुत्तम
रत्त + उप्पल = रत्तुप्पल

**क) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे 'ए'हा स्वर आल्यास त्याचे रूपांतर 'ए' मध्येच होते.**

उदा. जहा + एव = जहेव
च + एव = चेव
तहा + एव = तहेव
इह + एव = इहेव
एग + एग = एगेग
केण + एव = केणेव
न + एव = नेव
एक + एक = एकेक

**केव्हा केव्हा पहिल्या शब्दातील शेवटच्या वर्णावर अनुस्वार असेल तर प्रथम त्याचा 'म'बदल करून नंतर संधी नियमानुसार संधी केला जातो.**

उदा. एगं + एगं = एगमेगं
किं + एत्थ = किमेत्थ
एक्कं+ एक्कं = एक्कमेक्कं
तं + आसन्ने = तमासन्ने
किं + एस = किमेस
जुत्तं + एमं = जुत्तमेयं
तं + एव = तमेव
एवं + आइ = एवमाइ
जं + एव = जमेव
विवेगं + एउं = विवेगमेउं
अन्नं + अन्न = अन्नमन्न

**3) स्वरलोपसंधी – केव्हा केव्हा संधी करतेवेळी दुसऱ्या शब्दातील प्रथम स्वराचा लोप होऊन 'य, र, म' या बाह्य वर्णाचे आगमन होऊन संधी केला जातो. याला स्वरलोप संधी म्हणतात.**

अ) 'र' आगमन संधी

धि + अत्थु = धिरत्थु
पुण + अवि = पुणरवि
नि + अंतर = निरंतर
दु + चारिणी = दुराचारिणी
नि + आनंद = निराणंद
दु + अंगुल = दुरंगल
नि + अणुकंपा = निराणुकंपा
चउ + अंगुलं = चउरंगुल
नि + उपमा = निरुपमा

ब) 'य' आगमन संधी

दु + अंगुल = दुयंगुल    त + अणंतर = तयणंतर    त + आसन्ने = तयासन्ने

क) 'म' आगमन संधी

भवइ + आइणो = भवइमाइणो

### 4) अव्यय स्वर संधी - अव्ययापूर्वी स्वर आल्यास त्याचा लोप होतो.

केण + अपि = केणावि, केण वि,    (केणपि येथे 'अ' चा लोप झाला.)

किं + अपि = किमवि, किं पि    सुयणा + अपि = सुयणा वि

तं + अपि = तं पि    पुरिसो + इति = पुरिसो त्ति

पढमं + इति = पढमं ति    दिट्ठं + इति = दिट्ठं ति

किं + इति = किं ति    तहा + इति = तहत्ति

दीसइ + इति = दीसइ त्ति    नत्थि + इति = नत्थि त्ति

दिटठं + इति = दिटठं ति

### 5) द्वित्व संधी - केव्हा केव्हा दुसऱ्या शब्दातील पहिल्या वर्णाचे द्वित्व करून संधी केला जातो.

त + कम्म = तक्कम्मं    स + भिक्ख = सब्भिक्ख

नि + करुणा = निक्करुणा    त + खणं = तक्खणं

जाव + जीव = जावज्जीव    दु + जणो = दुज्जणो

नि + नेह = निन्नेह/निण्णेह

# (ब) लेहण–कोसल्लं



(i) अर्धमागधी – प्राकृत वाक्यरचना

(ii) अर्धमागधी – प्राकृतात निबंध लेखन

(iii) अपठित उतारे

## 1. अर्धमागधी–प्राकृतात कृती करा.

1. मी शाळेत जातो.
   अहं पाढसालं गच्छामि।
2. रामाने रावणाला मारले.
   रामेण रावणं हओ।
3. गुरूपासून ज्ञान लाभते.
   गुरुहिंतो णाणं लब्भइ।
4. सुंदरी का रडतेस?
   सुंदरि, किं रुयसि?
5. दुसऱ्याला हसू नका.
   मा हससु परं।
6. महावीराना नमस्कार
   नमो महावीरं।
7. कोल्हा वनात गेला.
   सियालो वणम्मि गओ ।
8. नदयांमध्ये गंगानदी श्रेष्ठ आहे.
   नईसु गंगानई सेट्ठं अत्थि।
9. मी प्राकृत भाषा शिकतो /शिकते.
   अहं पाइयं भासं सिक्खामि / पढामि।
10. तू नाच, तो गाईल.
    तुमं नच्च, सो गाइस्सइ ।
11. तुझ्या साडीचा रंग कोणता आहे?
    तव साडीए को वण्णो?
12. मांजर दूध पिते.
    मज्जारो दुद्धं पिबइ।
13. ब्रम्हदेवाने जग निर्माण केले.
    बंभदेवेण जयं निम्मियं ।
14. नीला बागेत आली.
    नीला उज्जाणं एइ।
15. तू तेथे जा.
    तुमं तत्थ गच्छसु।
16. रत्न समुद्रात पडले.
    रयणं समुद्दम्मि पडइ ।
17. विद्यार्थ्याने अभ्यास करावा.
    छत्तेण अज्झयणं कायव्वं।
18. ललिता भोजन करून झोपली.
    ललिया भुंजिऊण सुत्तइ।
19. क्रोधाने सर्वनाश होतो.
    कोहेण सव्वणासं होइ।
20. सर्व जीव सुखाची इच्छा करतात.
    सव्वे जीवा सुहं इच्छंति।
21. तुझा प्रिय मित्र कोण?
    तव को पिअं मित्तो?
22. तुम्ही इकडे या.
    तुम्हे एत्थ आगच्छह।
23. तो दुकानात गेला.
    सो आवणं गओ
24. पापकार्याचा धिक्कार असो!
    धिरत्थु! पाव कज्जस्स।
25. भारत माझा देश आहे.
    भारहो मम देसं अत्थि।
26. कावळा काळा असतो.
    कागो कण्हं अत्थि।
27. मी सत्य बोलेन.
    अहं सच्चं वइस्सामि ।
28. मी मोराचे चित्र पाहते.
    अहं मोरस्स चित्तं पासामि।
29. तू डोळ्यांनी बघतोस.
    तुमं नेत्तेहिं पाससि ।
30. बहिणीचा बहिणीला नमस्कार!
    भइणीए भइणिं नमोक्कारं।

# 2. निबंध लेखन

## 1. उज्जाणं

उज्जाणं पच्चेगनयरस्स गामस्स य सोहा अत्थि। नयरस्स मज्झठाणे उज्जाणं अत्थि। तत्थ विविहपयारस्स रुक्खासंति / उज्जाणे विविहपयारस्स लयावल्ली वि अत्थि। सव्वा लयावल्लीए उवरिं विविह-वण्णस्स फुप्पं अत्थि। तेण सव्वे उज्जाणं सुंदरं दिट्ठइ । नयराओ सव्वं इत्थि-पुरुसा पइदिणे उज्जाणे गच्छंति। को वि माया-पिया नियनिया बालका वि घेत्तूण उज्जाणे गच्छंति। तत्थ बाला विविहपयारेण कीला करेन्ति। जेट्ठ-लोगा रुक्खस्स छायाए चिट्ठंति।

उज्जाणस्स एगं भागे पाणिसंग्गालयं वि अत्थि। तम्मि पाणिसंग्गालयम्मि वग्घ-सीह-हत्ती-आस-वाणर-मिगाइ विविहपाणी संति। उज्जाणस्स बीअं भागे एगं सरोवरं वि अत्थि। तम्मि सरोवरस्स तीरे हंस-चक्कवाय-मोर-मऊरी-आइ पक्खी विहरंति.।

उज्जाणस्स एगं भागे कीलाखेत्तं अत्थि। तत्थ विविहपयारस्स किला-वत्थू वि अत्थि। ताओ वत्थूणि घेत्तूण सव्वे बालका कीलिऊण नियनियं मणोरंजणं करेन्ति। तेण कारणेण सव्वे जणा उज्जाणं पइदिणे गच्छन्ति।

## 2. पाउसकालो

पाउसकालो सव्वकालम्मि सेट्ठं अत्थि। तेण सव्वे जीवा पाउसकालो अईव पियं अत्थि। एयं पाउसकालो चउर-मासस्स अत्थि तेण एयं चातुरमास त्ति नामेण वि संबोहइ। रोहिणी नक्खत्ताओ पाउसकालस्स आरंभं होइ। एए चउरो मासे वि आगासाओ मेहा जलं वरिसंति। विज्जू वि एयम्मि काले आगासे नच्चंति । मेहा वि उच्चसरेण गज्जंति। पवणो वि सणियं सणियं सव्व-ठाणे मेहाणं नेइ। सव्व-ठाणे मेहा गच्छिऊण जलं वरिसन्ति। तेण सव्व-ठाणे जलेण परिपुण्णं होन्ति। नइ-सरोवराइं वि जलपुण्णं होऊण वहन्ति।

एए पाउस-काले किसिवालं वि बहुलं आणंदं होइ। किसिवालो निय-खेत्ते गच्छिऊण परिस्समं करिऊण पभूयं धन्नं पिक्कवइ। सव्व-पुहवी वि हरियं होइ। रुक्ख-लया-वल्ली वि पत्त-फुप्प-फलेण परिपुण्णं होइ। तेण सव्वे पाणी वि आणंदेण विहरंति। एवं पयारे पाउसकाले सव्वे जणा सुहेण चिट्ठन्ति। तेण कारणेण सव्वे कालम्मि पाउसकालो सेट्ठं अत्थि।

## 3. मम देसो

भारहो मम देसो अत्थि। भारहदेसे पाचीण-काले भरहो नाम एगं राया होत्था। तस्स नामेण मम देसं भारह-देसं त्ति नामेण संबोहइ। मम देसं ममं अईव पियं अत्थि। मम देसे विविह-धम्म-पंथ-जाइए लोगा वसन्ति। ते सव्वे लोगा निय-निय-धम्म-सक्कतीए पमाणं आणंदेण जीवणं जयन्ति। मम देसं विविह-धम्म-परंपरा अत्थि तं पि सव्वेसु एगता वि अत्थि। तेण कारणेण मम देसस्स सक्कतीए परंपराए ममं अहिमाणं अत्थि।

मम देसस्स उत्तर-दिसाए, हिमालय-पव्वयं अत्थि। दक्खिण-दिसाए हिंदमहासागरं अत्थि। पच्छिम-दिसाए अरबीसमुद्दं अत्थि। पुव्व-दिसाए बंगालस्स समुद्दं अत्थि।

मम देसे गंगा-जमुणा-बम्हपुत्ता-सतलज-किसणा-गोदावरी-कावेरी आइओ नइया अत्थि। इमाओ नईहिं भारहभूमी समिद्धं होइ।

मम देसे पाचीण-काले चंदगुत्त-मोरिय-समराट-असोग-सातवाहण-हरिस-जाधव-सिवराय-अकबराइ अणेगा सव्वसेट्ठ-रायपुरिसा होइंसु। एए सव्वेहिं रापुरिसेहिं भारहदेसं एग-छत्तं आणयणस्स महाकज्जं करिंसु।

भगवं महावीरं - भगवं बुद्ध-बसवेसर-गाडगे महाराओ, णाणेसरो, तुकाराम-जोतिबा फुले महप्पा गांधी आइया महापुरिसेहिं समाजस्स पबोहणं करिऊण सामाजिक-समता निम्माणं करन्ति। तेण कारणेण अज्ज देसस्स अखंडत्तं आबाहियं अत्थि। तेण कारणेण सव्वे लोगा सुहेण जीवणं जगन्ति। तस्स ममं देसस्स अभिमाणं अत्थि।

## 4. भगवं महावीरो

जिणधम्मो भारतीय-परंपराओ एगं धम्मं अत्थि। जिणधम्मो चउवीसा तित्थंकरा होन्ति। तम्मि तित्थयरम्मि भगवं महावीरो अंतिमो तित्थयरो अत्थि। तस्स तिसला-सिद्धत्थो माया-पिया अत्थि।

समाजम्मि विविहा अण्णाय-अच्चायार-हिंसाइ दट्ठूण महावीरस्स मणम्मि संसाराओ विरत्तं जाओ। तेण तीसम्मि वरिसे मुणिदिक्खं घेइ। दुवालस-वरिसे उग्ग-तवं करिऊण केवलणाणं पावइ।

गोयमाइ-एक्कारस-माहण-सीसा महावीरस्स गणहरा अत्थि। भगवं महावीरो गामाणुगामं विहारं करिऊण सामण्ण-जणा तस्स बोली-भासा-अद्धमागही-भासाए हिओवएसं करेइ।

भगवं महावीरो जणा उवएसं करेइ, 'भो भव्व जीवा ! निय-कम्मस्स अप्पा-कत्ता , अप्पा च्चिय विकत्ता य। नियं अप्पा च्चिय मित्तो अमित्तो य। जीवो जं कम्मं करेइ तस्स पभावेण सुह-असुहं च फलं भुंजइ। सव्वे जीवा सुहं इच्छन्ति न दुक्खं इच्छंति। तेण सव्वे जीवा सुहं कम्मं करेह। सुहं कम्मेण जीवा सुहं होइ।

एवं पयारे भगवं महावीरेण सव्वे जीवाणं कल्लाणकारकं अहिंसा-धम्मस्स उवएसं करिऊण जिण-धम्मस्स सेट्ठत्तं वड्ढवइ।

## 5. गणेस-उसवं

भारतीय-सक्कतीए छण-उस्सवाण अईवं महत्तं अत्थि। एयं छण- उस्सवाओ भारतीय सक्कतीए परंपराए य परिचयं होन्ति। छण-उस्सव-काले सव्वे जणा एकठाणे आगच्छिऊण परोप्परं अच्चंतं आयरपुव्वयं ववहारं करन्ति.

भारतीय-उस्सवम्मि गणेस-उस्सवं अईव महत्तपुण्णं उस्सवं अत्थि। एयं उस्सवं दस-दिणे अत्थि। टिलक-महोदएण एयं उस्सवस्स आरंभं करेइ ति कोवि जणा मण्णन्ति । को वि जणा महप्पा जोतिबा-

फुले महोदएण आरंभं करेइ ति मण्णन्ति।

एयं उस्सवं दुवे पयारा अत्थि। को वि जणा निय-निय गिहम्मि गणेस-मुत्तीए पइट्ठापणा करेन्ति। को वि जणा सव्वजणियं ठाणे गणेस-उत्सवस्स पइट्ठापणा करिऊण गणेस-उस्सवं करेन्ति।

एयं उस्सवस्स आरंभं भद्दपदे सुद्ध-चउत्थी दिणे होइ अणंतचउत्थी दिणे य समाप्पं होइ। एयम्मि दस-दिणे लोगा नियनिय-गिहे सद्धापुव्वयं पूजं करेन्ति। सव्वजणिय-गणेस-उस्सवे वि लोगा एक्क-ठाणे आगच्छिऊण गणेसस्स पूजं करेन्ति। सव्वजणियं ग़णेसउस्सवम्मि विविह कज्जकम्मं होन्ति। सव्वे जणा एयम्मि कज्जकम्मम्मि सहभागेहिं आणंदं घेन्ति। तेण कारणेण गणेसउस्सवं सव्वे जणा अईव पियं अत्थि।

## 6. सुपुरिसो

पाचीण-कालाओ भारहभूमी संत-सुपुरिसाण जम्मभूमी त्ति पसिद्धं अत्थि। एयम्मि भारहभूमीए तम्मि तम्मि काले अणेगाण संत-सुपुरिसाणं जम्मं होन्ति। तम्मि महापुरिसेसु भगवं महावीर-भगवं बुद्ध-णाणेसर-तुकाराम-रामदास-कबीर-बसवेसर-महाप्पा जोतिबा फुले-गाडगेमहाराज-आइआ अणेगा महापुरिसाण समावेसं होन्ति।

एयाणं महापुरिसाणं व्व अणेगा इत्थि-रयणा वि होन्ति। संत मीरा-जणाबाई-कण्होपत्ता-अहिल्यादेवी आइआ अणेगा इत्थि-महप्पावि होइत्था। एए सव्वे महप्पा समाजस्स आदरिस-हियचिंतग-मग्गदरिसगं अत्थि। ताण सव्वाण सहावं अच्चंतं संतं अत्थि। एए सव्वे सुपुरिसा सच्चमग्गस्स अवलंबं करेन्ति तेण ताणं सुप्पुरिसा त्ति नामेण संबोहइ ।

सुपुरिसस्स हिययं अईव दयाजुत्तं होइ। सुपुरिसो निच्चं महुरवयणं वयइ। सुपुरिसो सव्वपाणिमत्ताणं हियं चिंतेइ। अन्तिम-दसासु वि अप्पिय-वयणं ण बोल्लइ। सुपुरिसस्स मेत्ती पाहाण-रेह व्व दीह-कालं रेहेइ। सुपुरिसो जम्मि ठाणे वसइ तं ठाणं वि पवित्तं होइ। सुपुरिसस्स पासे को वि जाइ सो सुहं पावइ। एवं पयारे सुपुरिसो पुहवीए भूसणं अत्थि।

# 3. अपठित उतारे

## 1.

एगो विप्पो परदेसं गंतूण चउव्वेयं पारओ होऊण सदेसं आगओ। तस्स इड्ढिसंपन्नो त्ति नाऊण अन्न-विप्पेण निय-दारिगा दिन्ना। सो य लोएहिंतोवि दक्खिणाओ दव्वं लहइ। तेण सो अहियं इड्ढिसंपन्नो जाओ। तेण निय-भारियाए सुबहुं अलंकारा दिन्ना । सा भारिया तं अलंकारा निच्चमंडिया अच्छइ। विप्पेण भणइ 'एयं चोरगामो, ता तुमं एया आभरणाणि पव्वणी-तिहीसु धारेइ; कहिंचि चोरा आगच्छेज्जा तो सुहं गोविज्जन्ति।' सा भणइ 'अहं ताए वेलाए सिग्घमेवं अवणिस्सं' ति। अन्नया तत्थ चोराण धाडं पडियं। तमेव निच्च-मंडिया गिहं पविट्ठा। तेहिं तीए सालंकारा गहिया सा य पणीय-भोयणत्ताओ मंसोवचिय-पाणि-पाया न सक्कइ कडाईणि अवणेउं । तओ चोरेहिं तीसे हत्थे पाए छेत्तूण अवणीयाणि गिण्हिऊण च अवक्कंता।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) ब्राह्मणाने परदेशात जाऊन काय केले?
2) ब्राह्मण वैभव संपन्न कसा झाला?
3) ब्राह्मणाने पैशाचे काय केले?
4) ब्राह्मणाने पत्नीस अलंकाराविषयी काय सांगितले?
5. ब्राह्मणाच्या पत्नीस अलंकाराविषयी कोणती सवय होती?
6) ब्राह्मण पत्नीने पतीला कोणते उत्तर दिले?
7) चोरांनी चोरी कोठे केली?
8) अलंकार मिळवण्यासाठी चोरांनी काय केले?
9) योग्य शीर्षक द्या.

## 2.

जयंतीए नयरीए सुंदरो नाम सत्थवाहो अत्थि। अन्नया सो धणं अज्जिउं दूरदेसे कंचणपुरे नयरे गओ । तत्थ तेण विउलं धणं अज्जिओ। नियनयरे गंतुकामो वि आसण्णो पाऊसो त्ति ठिओ तत्थेव कंचणउरे, किंतु के वि सत्थिया पत्थिया। तत्थ मे जणणि-घरिणीणं इमाणि अप्पेज्जसु त्ति भणिऊण तेण दामोदर-विप्पस्स समीवे सत्त-रयणाइं समप्पिए। सो वि पत्तो जयंतीए । लोभ-दोसओ तेण अवलत्ताइं ताइं। अण्ण-वणिए पासे अप्पिओ लेहो। 'दामोयर-पासाओ सत्त-रयणाइं घेतव्वं' ति। दामोयरो रयणाणि न देइ। तेण भणइ, 'न मम हत्थे पेसियाणि।' एस पुण कओ केणावि कूड-लेहो। तओ धणसिरी विसण्णमणं आगया गिहं।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) सुंदर व्यापारी कांचनपुर नगरीस का गेला?
2) सुंदर व्यापारी आपल्या गावी का जाऊ शकला नाही?
3) सुंदर व्यापाऱ्याने आपल्या घरी रत्ने कशी पाठवली?
4) सुंदर व्यापाऱ्याने पत्र का पाठवले?

5) दामोदराने धनश्रीस कोणते उत्तर दिले?

6) धनश्री दु:खी मनाने घरी परत का आली?

7) योग्य शीर्षक द्या.

❍❍❍

## 3.

राइणा दिओ पुट्ठो – 'किं रुयसि'? सो भणइ – 'देव, एस एक्को चेव मम सुओ। अहिणा दट्ठो य इमं जाओ निच्चेट्ठा। ता काऊण करुणं जीवावेही इमं।' नरिंदेण य आणत्तो वेज्जो – 'कुणसु निव्विसमेयं।' वेज्जेण भणियं, जम्मि गोत्ते कुले वा कोइ न मओ ताओ गिहाओ भूई आणिज्जइ ता जीवावेमि इयं। मग्गिया दिएण भूई जाव सहस्सं घरे घरे ताव पच्चेगा घरे बंधु-आइयणं मरणाइं होइत्था तेण कारणेण वेज्जेण साहियं भूई न पावइ। तेण साहियं- 'देव, नत्थि वेज्जो व दिट्ठो भूईए लब्धो। राइणा भणियं 'जइ एवं ता किं' नियपुत्तं सोएसि? सव्व-तिहुयणस्स आहारं इमं मरणं।'

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) ब्राह्मण का रडत होता?

2) ब्राह्मणाने राजास कोणती विनंती केली?

3) वैद्याने कोणता उपाय सांगितला?

4) वैद्याने सांगितलेली (राख) विभूती का मिळाली नाही?

5) राजाने ब्राह्मणाचे सांत्वन कसे केले?

6) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

❍❍❍

## 4.

कोसंबी नाम नयरी। तत्थ चोद्दस्सविज्जाठाणं पारंगो कासवो बंभणो। राइणा बहुमओ । तस्स जसा नाम भारिया। तेसिं पुत्तो कविलो नाम। कासवो तम्मि कविलो खुड्डवए चेव कालगओ । ताहे तम्मि मए तं पयं राइणा अन्नस्स मरूयगस्स दिन्नं। सो य आसेण छत्तेण धरिज्जमाणेण वच्चइ। तं दट्ठूण जसा परुन्ना । कविलेण पुच्छिया। ताए सिट्ठं जहा- 'तव पिया विज्जासंपन्नो । तेण एवं विहाए इड्ढीए निग्गच्छियाइओ। कविलो भणइ 'अहं पि अहिज्जामि।' सा भणइ- 'इयं तुमं मच्छरेण न कोइ सिक्खावेइ । वच्च, सावत्थीए नयरीए। तत्थ पियमित्तो इंददत्तो नाम माहणो सो तुमं सिक्खावेइ। सो गओ सावत्थिं । इंददत्तस्स समीवं पत्तो। विणयपुव्वयं भणियं तेण 'भयवं, अहं विज्जत्थी ता करेह मे विज्जाए अज्झावणेण पसाओ।'

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) राजाने काश्यप ब्राह्मणाचा सन्मान का केला?

2) काश्यपाच्या पत्नीचे व मुलाचे नाव काय होते?

3) राजाने काश्यपाच्या मृत्यूनंतर त्याचे पद कोणाला दिले?

4) यशा का रडत होती?

5) कपिलास राजदरबारात मानाचे पद का मिळाले नाही?
6) आईने कपिलास श्रावस्तीस जाण्याचा सल्ला का दिला?
7) श्रावस्ती नगरीत कोण राहात होते?
8) कपिलाने इंद्रदत्तास कोणती विनंती केली?
9) योग्य शीर्षक द्या.

## 5.

अत्थि को वि दरिद्दो पुरिसो । किसी कम्माइं करेंतस्स वि किंचि वि धणं न लब्भइ। तओ वेरग्गेण घरस्स बाहिं निग्गिऊण अन्नठाणे भमइ। अन्नया मग्गे एगम्मि गामे सो एगं देवउले रत्तिं वसइ। तस्स दुक्खं जाणिऊण देवयाए हियए दया समुप्पन्ना । देवयाए चिंतेइ – 'अहो, एस वराओ दारिद्दं अक्कंतो। करेमि उवयारं त्ति। तीए भणिओ, 'भो पुरिस, अहं देवया, एयं विज्जामंतिय-घडेण तुज्झ दारिद्दं नासेमि। जं जं मग्गसि तं तं एसो घडो तुमं देइ। संतुट्ठ-मणेण तं घडं घेत्तूण सो नियगिहे एइ। तत्थ पभावेण विविह-भोगे भुंजंतो सुहेणं कालं गमेइ। कालंतरेण सो उम्मत्तो होइ। अन्नया उम्मत्तेण सो तं घडं खंधे ठविऊण नच्चइ। तस्स पमाएण सो घडो भूमियले पडिऊण भग्गो। तओ विज्जाकओ भोगा वि नट्ठा। तेण सो पुरिसो पुणो वि दरिद्दो होइ।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) दरिद्री मनुष्य घरातून बाहेर का पडला?
2) दरिद्री मनुष्य रात्री कोठे राहिला?
3) देवतेने कोणता विचार केला?
4) देवतेने दरिद्री मनुष्यास काय दिले?
5) दरिद्री मनुष्य पुन्हा दरिद्री का झाला?
6) योग्य शीर्षक द्या.

## 6.

अन्नया कयाइ को वुड्ढो अन्नं गामं गच्छंतो संतो भूओ। सो अंबरुक्खस्स छायाए गंतूण सुत्तो य उट्ठिओ समपरिहारिओ । सो तंसि अंबरुक्खस्स बहूणि पक्कफलाणि दट्ठूण तेसु मोहिओ । ताण आसाइत्तए इच्छियाणि । परं सो रुक्खोवरि आरोहिउं असमत्थो । तेण सो फलाणि असमत्थो। कालंतरेण कइया वाणरा तंसि रुक्खंसि आगया । ते महुराणि फलाणि खायन्ता ठिया । वाणराण दट्ठूण सो वुड्ढो संतुट्ठो होइ । तेण कइया उवला गिण्हिऊण वाणरेसु खित्ता । एएण वाणरा अईव कुद्धा । तेहिं वाणरेहिं रुक्खेहिन्तो फलाणि वुड्ढस्स सरीरे खित्ताणि, वुड्ढेण तं फलं संचिऊण सहरिसं भक्खिऊण सदेसं गओ।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) वृद्ध कोठे जात होता?
2) वृद्ध आम्रवृक्षाच्या सावलीत का गेला?

3) वृद्ध आंबे खाण्यास असमर्थ का झाला?

4) कालांतराने आम्रवृक्षावर कोण आले?

5) वृद्धाने फळे कशी मिळविली?

6) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

## 7.

अन्नया बलदेवो वि मासपारणाए भिक्खट्ठा एगम्मि नयरे पविसंतो । एगाए तरुणीए कूवतड-ट्ठियाए कूवजलं कड्ढिउं कामाए दिट्ठिगोयरं गओ । तओ तीए बलदेव-रूवाइसयक्खित्त-तग्गय-चित्ततणओ कूड-मंतीए निय-कडियलुत्तरिय-पुत्तस्स कंठे पासो दिन्नो। तओ ओयारिओ कूवे एयं च बलदेवेण दिट्ठं । तओ संवेगमुवगओ। अहो, मे देहो वि अणट्ठहेउ-पाणिणं ति चिंतियं। तं च बालयं-अणुकंपाए मोयावेऊण ता संपयं जइ तत्थट्ठिओ इत्थियाहिं अदिस्समाणो भिक्खं लभिस्सामि ताहे गेण्हिस्सं न अन्नहा । एवमभिग्गहं घेण्हियं तओ चेव नियत्तियं तं चेव वणं गओ ।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) बलदेवाने नगरात प्रवेश का केला?

2) विहिरीच्या काठावर असलेल्या स्त्रीची अवस्था कशी झाली?

3) बलदेव विरक्त का झाला?

4) बलदेवाने कोणते व्रत घेतले?

5) नंतर बलदेव कोठे गेला?

6) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

## 8.

तया अओज्झावई रिसहदेवो अत्थाणमंडवे सिंहासणे उवविट्ठो। मंतिसेट्ठीमहाजणाइ अप्पणो अप्पणो आसणे उवविट्ठा । नीलंजणा अच्छरा विविहभंगेहि नच्चिउं लग्गा। सव्वे चित्ते लिहियव्वं तं दिव्वं नच्चं पेच्छंति। नच्चंती नीलंजणा सहसा धसत्ति धरणीयले पडिया पाणेहिं मुक्का य। जीवियं अणिच्चं नाऊण रिसहदेवो विरत्तो जाओ । पंचमुट्ठिकेसलोयं काऊण सो पव्वइओ।

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) सिंहासनावर कोण विराजमान झाले?

2) सभागृहात कोण-कोण उपस्थित होते?

3) सभागृहात कोणता कार्यक्रम सुरू होता? अचानक कोणती घटना घडली?

4) ऋषभदेव विरक्त का झाले? त्यांनी काय केले?

5) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या?

# प्राकृत सट्टक (नाट्य ) साहित्य





✻ सट्टक – परिचय ✻

# प्राकृत सट्टक (नाट्य ) साहित्य परिचय

## प्रास्ताविक

लोकांचे मनोरंजन करण्यासाठी प्रत्येक जाती-धर्माच्या भाषा साहित्यामध्ये कथा-कथन, गायन, नृत्य तसेच विविध प्रकारच्या आवाजाची नक्कल करणे किंवा हावभाव, हालचालींच्या माध्यमातून एखाद्या विषयाचे स्पष्टीकरण करण्याची पद्धत प्राचीन काळापासून असलेली दिसून येते. यातूनच नाट्याची, नाटकाची निर्मिती झालेली असावी. त्यामुळे प्रत्येक भाषेच्या साहित्यात नाट्यसाहित्यास विशेष महत्त्व असलेले दिसून येते.

संस्कृत विद्वानांनी आपल्या नाटकांमध्ये प्रमुख पात्रांच्या तोंडी संस्कृतभाषा तर नायिका, स्त्रिया, बालक, नोकर, दास इत्यादी पात्रांच्या तोंडी प्राकृतातील विविध भाषांचा उपयोग केलेला दिसून येतो. अशा प्रकारची नाटके प्रारंभी राजदरबारात किंवा नगरातील लोकांच्यासाठीच मर्यादित होती.

परंतु राजदरबारापेक्षा किंवा नगरापेक्षाही ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन करण्यात नाट्याचे प्रयोग अधिक यशस्वी होत असलेले पाहून संस्कृत नाटकांत प्राकृतभाषेचे प्राबल्य वाढत गेले. शिवाय प्रमुख पात्रांच्या म्हणजेच राजा, मंत्री आदींच्याही तोंडी प्राकृतभाषेचा वापर होऊन कालांतराने प्राकृत भाषेतही संपूर्ण नाट्यग्रंथ लिहिले गेले. त्या नाट्यग्रंथालाच सट्टक असे संबोधण्यात येऊ लागले.

इ.स. 9 व्या शतकात होऊन गेलेले संस्कृत-प्राकृत भाषापंडित राजशेखर यांनी 'कर्पूरमंजरी' हे प्राकृत भाषेतील पहिले सट्टक लिहिले असे मानले जाते. कदाचित त्यांच्याही अगोदर सट्टके लिहिली असावीत परंतु दुर्दैवाने आज ती उपलब्ध नाहीत. कदाचित काळाच्या प्रवाहात ती नष्ट झालेली असावीत किंवा ती नाटके इतर भाषेत रूपांतरितही झालेली असतील.

## सट्टकाची वैशिष्ट्ये

प्रत्येक भाषेतील कथानकांची काव्यांची, नाटकांची काही खास वैशिष्ट्ये असतात. त्याप्रमाणे प्राकृत सट्टकांचीही काही वैशिष्ट्ये असलेली दिसून येतात. ती पुढीलप्रमाणे.

1) सट्टकाची रचना प्राकृतभाषेत असते.

2) सट्टकात संस्कृतातील प्रवेशक, विष्कंभक, अंक, संधी इ. चा अभाव असतो. सट्टकात अंकाऐवजी 'जवनिका' या शब्दांचा उपयोग केला जातो.

3) नाटिकेप्रमाणे सट्टकाचे कथानक काल्पनिक असते.

4) नायक व नायिका राजकुलोत्पन्न असतात.

5) सट्टकातील नायक हा विवाहित असूनही अविवाहित तरुण नायिकेवर गुप्तपणे प्रेम करत असलेला दिसून येतो.

6) नायकाची पत्नी (प्रमुख राणी) नायकावर सतत वर्चस्व गाजविणारी असते.

7) कथेमध्ये अद्‌भुत आणि शृंगार रसाचे प्राबल्य अधिक असले तरीही सट्टकात रौद्र, वीर, बीभत्स या रसांचा उपयोग केला जात होता.

8) सट्टकात पुरुषपात्रापेक्षाही स्त्री पात्रांची संख्या अधिक असते.

9) सट्टकाच्या कथानकाचा शेवट राजा व नायिका यांच्या प्रेमाचे रूपांतर विवाहात झालेले दिसून येते.

10) सट्टक हे चार जवनिकेने युक्त कथानक असते.

प्राकृतातील प्रमुख सट्टके पुढीलप्रमाणे

1) कर्पूरमंजरी (राजशेखर) 2) शृंगारमंजरी (विश्वेश्वर)

3) चंद्रलेखा (रुद्रदास) 4) आनंदसुंदरी (घनश्याम)

5) रंभामंजरी (नयचंद्र)

## 1. कर्पूरमंजरी (राजशेखर)

**प्रास्ताविक :**

संस्कृत साहित्याप्रमाणे प्राकृत साहित्यामध्येही जे नाट्यसाहित्य उपलब्ध असलेले दिसून येते. या नाट्य साहित्यासच सट्टक म्हटले जाते. प्राकृत साहित्यात आज चार-पाच सट्टकेच उपलब्ध आहेत. त्यामध्ये राजशेखरांचे 'कर्पूरमंजरी' हे पहिले प्राकृत सट्टक असल्याचे मानले जाते. त्याचा परिचय पुढीलप्रमाणे.

**1) सट्टककार राजशेखरांचा परिचय :**

कवी राजशेखर हे ब्राह्मण कुळात जन्मलेले असून विद्‌वत्ता त्यांच्या कुळात परंपरेने चालत आलेली होती. त्यांच्या कुळात अकालजलद नावाचे एक श्रेष्ठ कवी होऊन गेले. ते राजशेखरांचे आजोबा होते. त्यांना 'महाराष्ट्र चूडामणी' ही पदवी मिळालेली होती.

दुर्दुक (दुहिक) हे त्यांच्या पित्याचे आणि शीलवती आईचे नाव होते. ते गुर्जर राजाच्या दरबारातील एक मंत्री होते. त्यामुळे राजशेखरांनाही दरबारात मानाचे स्थान होते. राजशेखरांनी चौहान कुळातील अवंतीसुंदरीशी प्रेमविवाह केला होता. त्यांची पत्नीही संस्कृत, प्राकृतात निपुण होती. तिला प्राकृत भाषेविषयी अधिक आवड होती. तिच्या आग्रहानेच राजशेखरांनी 'कर्पूरमंजरी' हे सट्टक लिहिल्याचे तसेच विदर्भ व कुंतल देशाविषयी कवींच्या मनात अधिक आदरभाव असल्यानेच ग्रंथांत नमूद केलेले आहे. कर्पूरमंजरी ही कुंतलाधिपतीची कन्या असल्याचे तर विभ्रमलेखा ही दक्षिणाधिपतीची (विदर्भराजाची) कन्या असल्याचा उल्लेख केला आहे.

राजशेखरांनी कर्पूरमंजरी या सट्टकाशिवाय 'विद्धशाल-भंजिका, बालरामायण, बालभारत' इ.

संस्कृत नाटके लिहिली. याशिवाय अलंकारशास्त्रावरील 'काव्यमीमांसा' आणि 'हरविलास महाकाव्य' इत्यादी ग्रंथ लिहिले. भौगोलिक विषयावर माहिती देणारा भूवनकोश नावाचा ग्रंथ लिहिला. अशा प्रकारच्या विविध ग्रंथरचनांमुळे राजशेखरांना बालकवी, कविराज, भाषाचतुर इ. विशेषणांनी सन्मानित केले होते. तसेच गुजरातच्या महेंद्रपालराजांनी राजशेखरांना आपला गुरू मानून त्यांना दरबारात मानाचे स्थानही दिलेले होते. राजशेखरांचा काळ 9-10 व्या शतकाचा मानला जातो.

### कर्पूरमंजरी सट्टकाचा परिचय :

प्रस्तावनेनंतर राजाचंद्रपाल राणी विभ्रमलेखा, विदूषक आणि विचक्षणा दासी इत्यादी सर्वजण उद्यानात जाऊन वसंत उत्सव (ऋतू) आणि मलयपर्वताकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचे वर्णन करत असतात.तेव्हा तेथे अचानकपणे भैरवानंद नावाचा योगी येऊन स्वतःच्या शक्तीचे वर्णन करतो. शिवाय माझ्याकडून तुम्हास काय अपेक्षित आहे असे विचारतो, तेव्हा विदूषकाच्या सांगण्यावरून भैरवानंद योगी योगसामर्थ्याने विदर्भातील कुंतल देशाच्या वल्लभराज राजाच्या कर्पूरमंजरी नावाच्या तरुण सुंदर राजकन्येस घेऊन येतो.

विभ्रमलेखा राणी भैरवानंद योग्याची भक्त, शिष्या असल्याने त्याच्या सांगण्यानुसार कर्पूरमंजरीस आपल्याकडे ठेऊन घेते. परंतु कर्पूरमंजरीचे तारुण्य व सौंदर्य पाहून राजा तिच्याकडे आकर्षित होतो. कर्पूरमंजरीच्या मनामध्येही चंद्रपालराजाविषयी प्रेमभाव निर्माण होतात.

#### दुसऱ्या जवनिकेमध्ये :

राजा कर्पूरमंजरीच्या प्रेमात पडल्याने व्याकूळ झालेला आहे. तर इकडे कर्पूरमंजरीही राजाच्या प्रेमाने व्याकूळ होऊन विरह सहन करते. तेव्हा विदूषक व विचक्षणा दासी या दोन प्रेमिकांची भेट व्हावी म्हणून प्रयत्न करतात.

कर्पूरमंजरी आपले प्रेम प्रकट करण्यासाठी केवड्याच्या पानावर मजकूर लिहून राजाकडे पाठविते राजाही त्या प्रेमास आपली अनुकूलता दर्शवितो. परंतु हा सर्व प्रकार विभ्रमलेखाराणीच्या लक्षात आल्याने त्यांच्या भेटीवर बंदी घालते.

#### तिसऱ्या जवनिकेमध्ये :

विरहाने व्याकूळ झालेल्या दोघा प्रेमिकांची भेट घडवून आणण्यासासाठी विदूषक व विचक्षणा दासी उद्यानापासून राजवाड्यापर्यंत असलेल्या गुप्त मार्गाचा (भुयार) उपयोग करतात.

#### चौथ्या जवनिकेमध्ये :

विभ्रमलेखाराणी राजास वटसावित्रीचा उत्सव पाहण्याचे निमंत्रण देते. त्या निमंत्रणास मान देऊन राजा भैरवानंद, विदूषक आदी सर्व हजर राहतात. तेव्हा भैरवानंद योगी विभ्रमलेखा राणीस गुरुदक्षिणा म्हणून कर्पूरमंजरी आणि चंद्रपाल राजाच्या विवाहास राणीने मान्यता देण्याची अट घालतो. कारण या विवाहाने चंद्रपाल राजास चक्रवर्तीपदाचा मान मिळण्याचे भविष्य सांगतो. त्यामुळे राणी स्वतःहून राजा व कर्पूरमंजरी यांचा विवाह लावून देते. अशाप्रकारे कर्पूरमंजरी सट्टकाचे कथानक असलेले दिसून येते.

**भाषाशैली :**

'कर्पूरमंजरी' हे महाराष्ट्री प्राकृत भाषेतील सट्टक असले तरीही गद्यासाठी शौरसेनी प्राकृतचा तर पद्यासाठी महाराष्ट्री प्राकृत भाषेचा उपयोग केलेला दिसून येतो. राजा व कर्पूरमंजरी यांच्या प्रेमातून शृंगाररस स्पष्ट होतो. विदूषक आणि विचक्षणा दासी यांच्या भांडणातून विनोद व हास्यनिर्मिती झालेली दिसून येते.

पद्यामध्ये वसंततिलका अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा आदी विविध अलंकारांचा वापर केलेला दिसून येतो. सूर्योदय, चंद्रोदय, वसंतऋतू संध्याकाळ इ. मधून निसर्गवर्णनेही साकारलेली दिसून येतात. अशाप्रकारे कर्पूरमंजरी सट्टकाची भाषाशैली आकर्षक केलेली दिसून येते.

## 2. शृंगारमंजरी (विश्वेश्वर)

**प्रास्ताविक :**

प्राकृत सट्टकांपैकी शृंगारमंजरी हे एक महत्त्वपूर्ण सट्टक असल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे कर्पूरमंजरी हे प्राकृत साहित्यातील पहिले सट्टक आहे. त्याप्रमाणे शृंगारमंजरी हे प्राकृत साहित्यातील शेवटचे सट्टक असल्याने या सट्टकासही प्राकृत साहित्यात अधिक महत्त्व असलेले दिसून येते. या सट्टकाची रचना कवी विश्वेश्वरांनी केलेली आहे. या सट्टकाचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे.

**सट्टककार (कवी) विश्वेश्वर यांचा परिचय :**

कवी विश्वेश्वर हे अलमोडा (कर्नाटक) येथील असून ते भारद्वाज वंशात जन्मलेले होते. त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मीधर होते. लक्ष्मीधर हे काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, न्यायशास्त्र इ. विविध शास्त्रामध्ये निपूण होते. शिवाय ते संस्कृत-प्राकृत भोषेचे विद्वानही होते. विविध विद्या शिकविणारे गुरूही होते. त्यांच्याकडून विश्वेश्वरांना संस्कृत, प्राकृत भाषेचे ज्ञान मिळाले. त्यामुळे विश्वेश्वर वयाच्या 10 व्या वर्षांपासून ग्रंथरचना करत होते. विश्वेश्वरांनी काव्यशास्त्र, व्याकरणशास्त्र, धर्मशास्त्र, तंत्रशास्त्र, नाट्यशास्त्र इ. विषयावर ही ग्रंथरचना केलेल्या दिसून येतात.

शृंगारमंजरी हे सट्टक लिहिण्यापूर्वी कर्पूरमंजरी रत्नावली, मालविकाग्निमित्र इ. संस्कृत नाट्यग्रंथाचाही त्यांनी अभ्यास केलेला दिसून येतो.विश्वेश्वरांचा काळ अलिकडचा म्हणजे 18 व्या शतकाचा मानला जातो.

**शृंगारमंजरी सट्टकाचा संक्षिप्त परिचय :**

शृंगारमंजरी सट्टकाची रचना विश्वेश्वरांनी केलेली आहे. त्यांच्या या सट्टकावर राजशेखरांच्या कर्पूरमंजरी सट्टकाचा अत्यंत प्रभाव असलेला दिसून येतो. शृंगारमंजरी सट्टक म्हणजे कर्पूरमंजरी सट्टकाची दुसरी आवृत्ती असावी एवढे साम्य या दोन्ही सट्टकांमध्ये असलेले दिसून येते.

### प्रथम जवनिका :

शृंगारमंजरी सट्टकातील प्रथम जवनिकेमध्ये प्रारंभी नांदी असून यामध्ये सूत्रधार आणि नटी यांच्या संवादातून आज शृंगारमंजरी सट्टकाचा प्रयोग सादर केला जाणार असल्याची सूचना केली जाते. या सूचनेनुसार सट्टकास प्रारंभ होतो.

प्रारंभी राजा विदूषक उद्यानामध्ये जाऊन गप्पागोष्टी करत असताना राजा विदूषकास म्हणतो, 'हे मित्रा, आज माझ्या स्वप्नामध्ये एक सुंदरी आली होती, असे म्हणून राजा स्वप्नसुंदरीचे सौंदर्य वर्णन करतो. तेव्हा वसंततिलकादासी चोरून हा संवाद ऐकते व हे सौंदर्यवर्णन कोणाचे असेल?' असा विचार करत असता हे सौंदर्य आपली मैत्रीण शृंगारमंजरीचेच असल्याचे जाणून ती आनंदित होते.

### द्‌वितीय जवनिका :

या जवनिकेमध्ये विदूषकाचा प्रथम प्रवेश होतो. आपला मित्र व नायक असलेल्या राजाची त्याच्या स्वप्नसुंदरीशी कशी भेट घडून येईल? याचे चिंतन करत असतो. तेव्हा सुदैवाने मुख्यराणीकडून मदन उत्सवाच्या पूजेचे निमंत्रण येते. तेव्हा आनंदित होऊन मदन-उत्सव पाहण्यासाठी राजा व विदूषक जातात.

या मदनउत्सवाच्या वेळी विदूषक व  वसंतसेना हे दोघे आपापल्या बुद्धिचातुर्याने निसर्गाचे वर्णन करत असतात. या वर्णनातील श्रेष्ठ वर्णन कोणाचे आहे. याचा  निर्णय देण्यासाठी  विविध शास्त्रामध्ये निपुण असलेल्या शृंगारमंजरीस निमंत्रित करण्यात येते. अशाप्रकारे राजा व शृंगारमंजरीची भेट घडवून आणली जाते.

### तिसरी जवनिका :

या जवनिकेमध्ये नायक व नायिकेच्या परस्परांच्या भेटीगाठीमुळे प्रेमामध्ये वृद्‌धी झालेली दिसून येते. परंतु राणीस हे प्रेमप्रकरण न आवडल्याने राजा व शृंगारमंजरी यांच्या भेटीवर राणी बंदी घालते. परंतु विदूषक व वसंतसेना यांच्या मदतीने माधवीलता उद्यानामध्ये राजा व शृंगारमंजरी यांच्या गुप्त भेटी होत राहतात.

### चौथी जवनिका :

राजा व शृंगारमंजरी यांच्या गुप्त भेटीचा वृत्तांत समजल्याने शंकित झालेली राणी शृंगारमंजरीस अंधारकोठडीमध्ये बंदिस्त ठेवते. शिवाय विदूषक व वसंततिलका दासी यांच्या भेटीवरही बंदी घालते. कालांतराने राणी पार्वती देवतेच्या दर्शनासाठी गेली असता तेथे आकाशवाणी होते. 'पतीची सेवा करणे हाच पतिव्रतेचा श्रेष्ठ धर्म आहे. तसेच निरपराधी व्यक्तीस दु:ख देणे हे (अयोग्य) पापकर्म आहे.' ही आकाशवाणी ऐकल्याने राणीच्या मनामध्ये परिवर्तन होऊन शृंगारमंजरी व राजा यांचा स्वत:हून विवाह करून देते. अशाप्रकारे शृंगारमंजरी सट्टकाचे कथानक असलेली दिसून येते.

### भाषाशैली :

व्याकरण ग्रंथाच्या आधारे काही रूपे तयार करून त्याचा उपयोग केलेला दिसून येतो. पद्यामध्ये महाराष्ट्री प्राकृत असल्याने 'अ' श्रुतीचा अधिक वापर झालेला दिसून येतो. गद्यात शौरसेनी भाषा आढळते. प्राकृत साहित्यातील हे एक महत्त्वपूर्ण **सट्टक** आहे.

# 3. चंद्रलेखा सट्टक (रुद्रदास)

**प्रास्ताविक :**

'चंद्रलेखा' हे प्राकृतसाहित्यातील महत्त्वपूर्ण सट्टक होय. याची रचना कवी रुद्रदास यांनी केली. त्याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे

**सट्टककार रुद्रदासाचा परिचय**

कवी रूद्रदास यांनी चंद्रलेहा या सट्टकाची रचना केली. रूद्रदास हे केरळमधील पारासव जातीत जन्मले होते. रुद्रदासाचे आई-वडील केरळमधील एका मंदिरात स्वच्छता व इतर काम करत असत. रूद्रदासांचे संस्कृत भाषेवर चांगले प्रभुत्व होते.रूद्रदासांनी वररुचींच्या 'प्राकृत प्रकाश' या व्याकरण ग्रंथाचा सखोल अभ्यास करून प्राकृत भाषेवर चांगले प्रभुत्व मिळविले होते. त्यांनी इ. 1660 मध्ये कर्पूरमंजरी या सट्टकाच्या धर्तीवर 'चंदलेहा' या सट्टकाची रचना केली.

कवी रुद्रदास हे रुद्र व श्रीकंठ गुरूंचे शिष्य होते. शिवाय रुद्र म्हणजे शिव. ते शिवाचेही परमभक्त होते. त्यामुळे त्यांनी रुद्रदास हे नाव धारण केलेले असावे. त्यांचा काळ 17 व्या शतकाचा मानला जातो. इ. स. 1660 मध्ये त्यांनी 'चंद्रलेखा' या सट्टकाची रचना केली.

**चंद्रलेखा ग्रंथाचा परिचय :**

'चंद्रलेखा' हे प्राकृत साहित्यातील एक सट्टक होय. कवी रूद्रदास यांनी या चंद्रलेखा सट्टकाची रचना केली या सट्टकात चार जवनिका असून राजा मानवेंद्र आणि चंद्रलेखा राजकुमारीच्या प्रेमाची कथा वर्णिलेली आहे.

**'चंद्रलेखा' सट्टकाचा विषय –** चंद्रलेखा या सट्टकात चिंतामणिरत्नाच्या सामर्थ्याने मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखा नायिकेची भेट घडून येते. या पहिल्या भेटीतच नायक मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखा नायिका परस्परांवर आकर्षित होऊन परस्परांच्या प्रेमात पडून भेटीस आतुर होतात.

चंद्रलेखा संगीतकलेत निपुण असते. हे जाणून महाराणी चंद्रलेखेचे गायन ऐकण्याच्या उद्देशाने चंद्रलेखेच्या संगीत-गायनाच्या कार्यक्रमाचे नियोजन करते. त्या कार्यक्रमाचा राजाकडून मनमुराद आस्वाद घेतला जातो. त्यामुळे राजा चंद्रलेखेच्या भेटीस अधिकच आतुर होतो.

त्यानंतर चंद्रलेखा आणि राजा यांच्या प्रेमाची राणीस शंका आल्याने राणी राजसभेतील एका मूर्तीच्या कंठात सारिका बसवते. त्यामुळे राणीस मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखाच्या प्रेमाचा वृत्तांत समजतो. त्यामुळे महाराणी अत्यंत क्रोधिष्ठ होते.

त्यानंतर राणीचा चंद्रकेतू मावसभाऊ अचानकपणे तेथे येऊन चंपावनातून आपली बहीण चंद्रलेखा अचानकपणे नष्ट झाल्याचा वृत्तांत सांगतो. ते ऐकून महाराणी आपल्याकडे असलेल्या चिंतामणी रत्नास विनंती करते. आपल्या चंद्रलेखा बहिणीचा शोध घेऊन ताबडतोब येथे आणावे. त्याप्रमाणे चंद्रलेखा ताबडतोब तेथे हजर होते. त्यामुळे सर्वजण आनंदित होतात.


त्यानंतर त्या चिंतामणिरत्नाची देवता सर्वांच्या समोर स्पष्ट करते. ‘चंद्रलेखेशी विवाह करणारी व्यक्ती चक्रवर्ती सम्राट होईल’ ते ऐकून महाराणीच्या मनात ‘आपला पती चक्रवर्ती सम्राट व्हावा’ अशी तीव्र इच्छा निर्माण झाल्याने राजा मानवेंद्र आणि चंद्रलेखा यांच्या विवाहाला महाराणी स्वत: होऊन अनुमती देते. अशाप्रकारे दोन प्रेमिकांच्या प्रेमाची पूर्णता झालेली दिसून येते.

**भाषाशैली :**

‘चंद्रलेखा’ या सट्टकाची भाषा महाराष्ट्री प्राकृत आहे. कवीने मोजक्या शब्दांत सुंदर चित्रण केलेले दिसून येते. इतर सट्टकाप्रमाणे या सट्टकातही शृंगार रसाचा अधिक प्रभाव आहे. तसेच चिंतामणी रत्नाच्या प्रभावाने अद्‌भुत रसाचाही उपयोग झालेला दिसून येतो.

# ब्राम्ही लिपीतील स्वर आणि व्यंजने


## स्वर




## व्यंजने












































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

अर्धमागधी – प्राकृत, इयत्ता अकरावी

₹ 99.00